शनिवार । १७ मार्च १९७३ पन्नास पैसे

# माणूस

वात्स्यायनाच्या काळी आपला समाज
भौतिक उत्कर्षाला पोचला होता.



संपादक
श्री. ग. माजगावकर

१७ मार्च १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : एकेचाळीस

## सप्रेम नमस्कार...

११ मार्च, ७३

□ महाराष्ट्र राज्य दूध योजनेची संपूर्ण माहिती देणारा माणूसचा अंक आजच हातात पडला. सरकारी दूध योजनेतील योग्य उद्दिष्टांचा अभाव, चुकीचे नियोजन, अनावश्यक गोष्टींवरील खर्च, वगैरे गोष्टींवर श्री. करमरकर यांनी प्रखर असा प्रकाश टाकला आहे. परदेशातून येणारी मदतही अनेक वेळा आपल्या हिताची नसते हे " Operation flood "मध्ये फार उत्कृष्टपणे त्यांनी दाखवले आहे.

दूध योजनेच्या सरकारीकरणाबद्दल एक ग्राहक म्हणून माझे मत आपणास कळवीत आहे. ग्राहक व दुकानदार यांचे पारंपारिक जगात मान्य झालेले नाते या सरकारी योजनेत बरोबर उलट झाले आहे. त्यामुळेच दूध पुरवठ्यात अचानक कपात, दुधाच्या दर्जामध्ये अचानक बदल किंवा अचानक होणारी भाववाढ हे सर्व ग्राहकास मुकाट्याने सहन करावे लागत आहे. या सरकारी योजनेत ग्राहक हा कःपदार्थ असल्यामुळेच " स्निग्धांश कमी केला तरीही भाववाढ केली नाही " हे निर्लज्ज स्पष्टीकरण संबंधित मंत्री करू शकतात. पुणे दूध योजनेत हल्ली गायीच्या दुधाला टोंड दुधाची पांढरी बुचे लावण्याचा उपक्रम सुरू केला आहे, कारण पिवळी बुचे संपली आहेत म्हणे. गुपचुप स्निग्धांश कमी करण्याच्या मुंबईतील उपक्रमाचीच ही पुणेरी आवृत्ती तर नाही ना, अशी शंका आली तरी सरकारला त्याची फिकिर करण्याचे मुळीच कारण नाही.

" Democracy is Government by discussion " असे म्हणतात. आमच्या देशात याची जाणीव अभावानेच लक्षात येते. त्यामुळे आपली कैफियत म्हणजे अरण्यरुदनच ठरणार याचे वाईट वाटते. सरकारने एखाद्या योजनेसंबंधी निर्णय घेतला म्हणजे सरकारचे मत कोणीही बदलवू शकत नाही हा आपला अनुभव आहे. उदा. जुळी मुंबई योजना. अशा निराशाजनक परिस्थितीत श्री. करमरकर यांनी दूधयोजना सुधारण्यासाठी जे प्रयत्न केले ते खरोखरीच अभिनंदनीय आहेत.

गोपाळ जोशी, पुणे

मुखपृष्ठ : प्राचीन भारतीयांचा कामदेव

# लोकशाही खरी आणि खोटी

सुनिल देशपांडे : अनिल खांडेकर

माणूसच्या दि. १७ फेब्रुवारीच्या अंकातील श्री. चंद्रशेखर मराठे यांनी श्री. अनिल बर्व्यांच्या 'बारा जाहीर सवालांना' दिलेले उत्तर वाचले. लेख संपूर्णपणे वाचत असताना कुठेतरी मनात पाल चुकचुकत होती. श्री. बर्वे यांच्या ज्ञानाबद्दल संशय घेत, स्वतः ज्ञानी असल्याचा बहाणा व बुजुर्गांच्या भावनेतून व सरकारी प्रचारकी थाटातून स्वतःला महत्त्व प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणारा हा लेख वाचून श्री. मराठे यांना लवकरच कॉंग्रेसतर्फे निवडणुकीचे तिकीट, अथवा पद्मश्री मिळण्याची शक्यता असावी असे वाटणे अगदीच अतार्किक नाही. श्री. बर्वे यांना राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व या देशाचा इतिहास यांची तोंडओळखही नाही, हा सूर काढताना त्यांनी कशाचा आधार घेतला हे सांगणे त्यांनाही जड जाईल.

त्यांच्याच विधानात त्यांनी म्हटले आहे. 'या बारा जाहीर सवालात आहे तरी काय? थोडीफार आत्मश्लाघ्य, पोलीस, न्यायखाते, सरकार यांची विसंगत निंदास्तुती व ज्या गोष्टींवर बर्वे यांची श्रद्धा नाही त्या गोष्टींच्या नावाने सरकारला घातलेल्या चलाख अशा कोंड्या' आता राज्यशास्त्राची अजिबात तोंडओळख नसलेला माणूस सरकारला 'चलाख' अशा कोंड्या घालू शकेल काय? श्री. अनिल बर्वे यांच्या लेखावरून त्यांना राजकीय हुतात्मा बनण्याचा लोभ सुटला आहे असे वाटण्याची जेवढी शक्यता आहे, तेवढीच शक्यता श्री. मराठे यांना त्यांच्या लेखावरून 'मंत्री वा पुढारी होण्याचा मोह सुटला आहे' असे वाटण्याची आहे. सरकारी धोरणावर टीका करणारा माणूस ज्या देशात जिवंत रहातो तो लोकशाही देश असे समीकरण मांडायचे झाल्यास, कम्युनिस्ट राष्ट्रे सोडून सर्वच राष्ट्रात लोकशाही गुण्यागोविंदाने नांदते आहे असे मराठे

यांना म्हणायचे आहे काय ?

लोकशाहीत राजकीय समता, बहुसंख्यांकांचे राज्य, कायद्याचा अम्मल या मूलतत्त्वांचा समावेश आहे असे मराठे म्हणतात. भारतात सध्या राजकीय समता आहे काय ? राज्य-केंद्र सबंधातील तणातणी, दुर्बळ विरोधी पक्ष, पैशाच्या जोरावर माजलेला राजकारणी पक्ष हे राजकीय समतेचे द्योतक आहेत काय ? या बहुसंख्यांकांच्या राज्यात राष्ट्रीय अस्थिरता माजविणाऱ्या अराष्ट्रीय अल्पसंख्यांकांना बाजवीपेक्षा जास्त संरक्षण व सवलती देऊनसुद्धा त्या गटाचा एक प्रमुख–" Is Pakistan our last demand ? I cannot answer the question, but it is our latest demand." (संदर्भ : 'मुस्लिम जातीयतेची कारणे स्वरूप व उपाय' ले. हमीद दलवाई) असे उद्‌गार काढू शकतो व तरीसुद्धा ती संघटना निधर्मी, विजातीय ठरते हे कसे ?

कायद्याचा अम्मल हे लोकशाहीचे तिसरे सूत्र सांगताना ते पोलिसांचे हप्ते, वशिलेबाजी; लातूर, सोलापूर, मालेगाव येथील निरपराध्यांवर झालेले भयानक लाठीहल्ले यांचे समर्थन लोकशाहीच्या कायद्याद्वारे करू शकतील काय ? एखाद्या इंजिनियरच्या घरी फीज हवा असतो म्हणून हजारो मजुरांना अर्धपोटी रहावे लागते, मरावे लागते. यालाच लोकांनी, लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य म्हणावे काय ? मोठमोठ्या धनिक लोकांकडून पैसे घेऊन निवडणूक फंड उभारणे व त्यांच्या काळ्या व्यवहाराला डोळ्यांआड करणे, मंत्री होण्यापूर्वी स्वतःचे एखादे घर असणारा माणूस मंत्री झाल्यानंतर थिएटरे पेट्रोलपंप, जमीनजुमला, गाड्या वगैरे इस्टेट करून ठेवतो, यालाच समाजवादी आर्थिक परिवर्तन म्हणायचे काय ? का या सर्व गोष्टींची मराठे यांना आपल्या चार भिंतीच्या आड कल्पना नाही ? का कोणाचे मिंधे राहून हे आंधळे बनले आहेत ? मराठेंनी वर्णन केलेली लोकशाही ही आज खरोखर आवश्यक आहे. शुद्ध लोकशाहीवर श्रद्धा असणाराच मीही एक माणूस आहे. परंतु या देशात लोकशाही आहे हे सांगण्यासाठी ते ज्या गोष्टींचा आधार घेतात त्या फसव्या आहेत.

येथे हिंसाचाराने कोणी कोणाचे मतपरिवर्तन करीत नाही हा फारतर येथे कम्युनिझम नसल्याचा पुरावा म्हणता येईल. परंतु हा शुद्ध लोकशाही असल्याचा पुरावा म्हणता येणार नाही. नाहीतर विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांचे खून, पुराव्या अभावी 'फाईल' झालेच नसते.

लोकशाही विचारधारेचा संदेश येथील जनतेने अचूक ओळखला आहे, म्हणूनच 'लाच दिल्याशिवाय काम होणार नाही' 'वशिल्याशिवाय नोकरी मिळणार नाही' वगैरे मंत्र ओळखून येथील जनता वागत असते. हाच लोकशाही विचारधारेचा मूलसंदेश मराठे यांना अभिप्रेत आहे काय ?

पृष्ठ ५६ वर

गुंतागुंत वाढत आहे

# आंध्र तेलंगण वाद

भारत देगलूरकर

गेले चार पाच महिने आंध्रप्रदेशात विभाजनासाठी जी चळवळ चालू आहे तिला आता तीव्र स्वरुप आलेले आहे. उपोषण, मोर्चे, संप इत्यादीपासून सुरू होऊन रेल्वे पाडणे, पूल उध्वस्त करणे इत्यादी हिंसक कारवायांपर्यंत त्याचं रूप पालटलं आहे. एकच भाषिक लोक–ज्यांनी पूर्वी 'विशाल आंध्र' चा हट्ट धरला होता ते आता वेगळे होण्यासाठी इतक्या अतिरेकी मार्गाला का पोहोचले याचे काहींना आश्चर्य वाटणे साहजिक आहे. परंतु या प्रश्नाचा बारकाईने अभ्यास केल्यास आता ह्या प्रश्नाला एका प्रचंड जनता आंदोलनाचे स्वरूप कसे आले आहे हे समजणं अवघड जाणार नाही.

### थोडासा पूर्वेतिहास

इ. स. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला त्यावेळी तेलगू भाषिक लोक हैद्राबाद संस्थान आणि मद्रास प्रांत यात विभागलेले होते. हैद्राबाद संस्थानातील नऊ तेलगू भाषिक जिल्हे 'तेलंगण' म्हणून ओळखले जात असत तर मद्रास प्रांतातील अकरा जिल्ह्यांचा तेलगू भाषिक विभाग 'आंध्र' म्हणविला जात असे. १९५२ साली अशाच एका प्रचंड आंदोलनानंतर आणि श्री. पोट्टी श्रीरामलू यांच्या आत्मत्यागानंतर मद्रास प्रांतातून वेगळे काढून तेलगू भाषिकांचा आंध्र हा प्रांत निर्माण करण्यात आला, आणि कर्नुल ही त्याची राजधानी झाली. त्यानंतर पुढे त्रिसदस्य राज्यपुनर्रचना मंडळ अस्तित्वात आले आणि इ. स. १९५६ मध्ये त्यांचा अहवाल बाहेर पडला. या मंडळाने हैदराबाद राज्याचे तीन भाग करून त्यातील मराठी भाषिक विभाग (मराठवाडा) मुंबईप्रांताला आणि गुलबर्गा व रायचूर हे कानडी भाषिक जिल्हे म्हैसूर राज्याला जोडण्याची शिफारस केली. मात्र तेलंगण हे स्वतंत्र राज्य व्हावे असे त्यांचे बहुमताचे म्हणणे होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी आंध्र आणि तेलंगण हे दोन्ही तेलगू भाषिक प्रदेश असले तरी आर्थिक विकासाच्या दृष्टीने दोन विभागात खूपच फरक होता. हैदराबाद शहर सोडल्यास तेलंगणचा सर्व भाग आंध्रच्या मानाने अत्यंत मागासलेला

होता, आणि स्वतंत्र राज्य झाल्यासच त्याची वेगाने प्रगती होणे शक्य होते. पण पं. नेहरूंना ही कल्पना पसंत पडली नाही. त्यांची इच्छा तेलगू भाषिकांचा एकच प्रांत असावा अशी होती. आंध्रमधील राजकीय नेत्यांचीसुद्धा एकच 'विशाल आंध्र' आणि त्याची राजधानी हैदराबाद असावी अशी मागणी होती. या मागणीचा एक उघड उघड हेतू असा होता की मद्रासमधून वेगळचा झालेल्या आंध्राला त्यावेळी चांगली राजधानी नव्हती. कर्नुलची राजधानी म्हणून निवडही त्या गावच्या योग्यतेपेक्षा इतर राजकीय हेतूनेच झाली होती. राजधानीला आवश्यक असणाऱ्या सोयी तिथे अभावानेच अस्तित्वात होत्या. सर्वसाधारण कल्पना येण्यासाठी असे म्हणता येईल, की कर्नुल त्यावेळी महाराष्ट्रातील बीड—नांदेड सारख्या शहरांपेक्षा फारसे चांगले नव्हते. (आजही त्यात फारशी सुधारणा झाली आहे असे नाही) राजधानी कर्नुलला तर विमानतळ आणि आकाशवाणीकेंद्र तेथून दीड—दोनशे मैल दूर असलेल्या विजयवाड्याला. प्रांतातील त्यावेळचे एकमेव विद्यापीठ उतरेला चारशेमैल दूर ग्वाल्हेर येथे आणि मुख्य बाजारपेठ विजयवाडा गूंटूर ह्या भागातच. तेव्हा हैदराबाद सारखे सुंदर आणि सर्व सुखसोयींनी युक्त असे शहर राजधानी म्हणून मिळाल्यास त्यांना ते हवेच होते. त्यावेळी डॉ. चन्नारेड्डी यांच्या नेतृत्वाखाली वेगळा तेलंगण प्रांत निर्माण करण्यासाठी सौम्य चळवळ झाली पण पं. नेहरूंच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे त्यांच्या इच्छेपुढे कोणाचेच काही चालले नाही. शेवटी एक नोव्हेंबर १९५६ या दिवशी पंडीतजींच्याच हस्ते 'आंध्र प्रदेश' हा सर्व तेलगू भाषिकांचा वीस जिल्ह्यांचा मिळून एक प्रांत निर्माण झाला.

## मुल्की नियम

सध्याच्या चळवळीत ज्या शब्दाचा वारंवार उल्लेख येतो त्या 'मुल्कीरूल्स' बद्दलचा थोडासा इतिहास ह्या संदर्भात माहित असणे आवश्यक आहे. निजामस्टेट अस्तित्वात असताना, तेथील स्थानिक लोकांनाच — म्हणजे ज्यांचे वास्तव्य स्टेटमध्ये किमान पंधरा वर्षे तरी आहे-अशांनाच सरकारी नोकऱ्यात आणि इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेजातून प्रवेश मिळत असे किंवा प्राधान्य दिले जात असे. तेलंगण प्रांत आंध्रमध्ये विलीन झाल्यानंतरसुद्धा हे नियम त्या विभागासाठी चालू राहतील असा करार झाला होता व त्याप्रमाणे भारतीय संसदेने त्याला मान्यताही दिली होती. पण पुढे अधिकारावर आलेल्या सर्व मुख्यमंत्र्यांनी हा करार काटेकोरपणे पाळण्याऐवजी त्याला डावलून आंध्रमधील लोकांना हैदराबाद शहरात आणि तेलंगण विभागात जास्तीत जास्त नोकऱ्या आणि बढत्या कशा देता येतील याचाच विचार केला. शिवाय तेलगणमधील विकासयोजना मागे पडत चालल्या आणि अंदाजपत्रकात दाखविलेले खर्चसुद्धा त्याभागातील कामावर

पृष्ठ ६० वर

# लिंगवाद आणि झुंडवाद

पुण्यात ' लिंगवाद निर्मूलन ' या नावाखाली एक आचरट धुडगुस काही मंडळींनी घालायला सुरुवात केलेली आहे. गेल्या आठवडयात या निर्मूलकांनी बाल गंधर्व रंगमंदिरावर मोर्चा नेऊन सखाराम बाईंडर या नाटकाचा प्रयोग बंद पाडला. सखाराम पाठोपाठ घाशीरामावरही हा बलप्रयोग करण्याची या मंडळींची जाहीर धमकावणी आहे. मनोहर साप्ताहिक, टाईम्स विकली इत्यादी वृत्तपत्रातील काही मजकुराबाबतही अशीच कारवाई करण्याचे या मंडळींनी जाहीर केले होते. प्रत्यक्ष कारवाई काय झाली ते कळायला काही मार्ग नाही — कारण मनोहर साप्ताहिक तर येता अंक कॅबेरे नृत्यांगनांची साथसंगत घेऊन तमाम मराठी तरुणतरुणींच्या भेटीस येत असल्याच्या जाहिराती झळकताहेत.

वरील नाटके चांगली की वाईट, मनोहर साप्ताहिक व टाईम्स विकली यातील मजकुराचे एकूण स्वरूप हा विषय अगदा वेगळा आहे. येथे प्रश्न एवढाच उपस्थित करायचा आहे, की आपल्याला नको वाटणारी नाटके, साहित्य, लिखाण जाळपोळ व नासधूस करून दंडेलीच्या बळावर कुणी दडपून टाकायला निघत असतील तर ही गोष्ट आपल्या लोकशाही व्यवस्थेने कितपत सहन करावी ? हिटलर व मुसोलिनी यांच्या राज्यातील ही रानटी चाल आपण का उचलावी, डोक्यावर घ्यावी ? लोकशाही समाजव्यवस्थेची मूळ बैठकच अशी आहे, की शक्य त्या व तेवढ्या क्षेत्रात मनगटाऐवजी मस्तकाचा विचार करायचा. ज्या क्षेत्रात हजारो वर्षे तलवारीच्या बळावर प्रश्न सोडवण्याचा प्रघात होता त्या राजकीय सत्ताक्षेत्रातही लोकशाहीने डोकी उडविण्याऐवजी डोकी मोजण्याचा पर्याय पुढे आणला व आज सर्व सुसंस्कृत जग या पर्यायाला मान देत आहे. सत्तेच्या आत्यंतिक स्पर्धामय व रक्तरंजित क्षेत्रातही जे साध्य होऊ शकते ते तुलनेने अतिशय सौम्य व शांत अशा साहित्यसंस्कृती क्षेत्रातही आम्हाला का साध्य करता येऊ नये ? राजकारणातून हद्दपार समजली जाणारी मनगटशाही समाज व संस्कृतीक्षेत्रात पुन्हा डोके वर काढत असेल तर सर्वांनीच तिची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. सांस्कृतिक व सामाजिक शुद्धतेच्या, नैतिकतेच्या फाजील व अवास्तव कल्पनांना बळी पडून कुणी या मनगटशाहीचा बेगुमान उपयोग करू पाहत असेल तर लोकशाहीचे महत्व जाणणाऱ्या सर्वांनीच याचा कडकडीत निषेध केला पाहिजे, वेळीच या दुष्प्रवृत्तीला आळा घातला पाहिजे. एकवेळ सदोष नाट्यप्रयोग परवडले पण हा निर्दोष बलप्रयोग नको असे निक्षून या निर्मूलकांना वेळीच सांगितले पाहिजे. कारण लिंगवादापेक्षा झुंडवादाचे परिणाम फार दूरगामी व खोलवर जाणारे आहेत. हे भूत कुणीही कुणाविरुद्ध सहज उठवू शकतो. म्हणून कुणीच, निदान या बौद्धिक व कलासाहित्याच्या

क्षेत्रात, हे भूत न उठवण्याचे पथ्य पाळणे आवश्यक आहे. लेखणीचा सामना शक्यतो लेखणीने केला पाहिजे. ते अवघड असेल, अशक्य असेल तर आपला निषेध अन्य वैध मार्गाने व्यक्त करण्याचेही अनेक मार्ग लोकशाहीने मोकळे ठेवलेले आहेत. शांततापूर्ण निदर्शनांनीसुद्धा काम भागत नसेल तर बहिष्काराचा मार्ग खुला आहे. यामुळे लोकशिक्षण होते व समाजाची नैतिकदृष्टी खरोखरच निकोप व निर्दोष होण्यास मदत होते. यापैकी काहीही न करता एकदम हातघाईवर येणे यात कसलाही पुरुषार्थ नाही, ज्ञान नाही, संस्कृतीही नाही. माग 'साधना' साप्ताहिकावर असाच एक जबरी मोर्चा नेण्यात आलेला होता राष्ट्रध्वजासंबंधी आपली भावना व्यक्त करून मोर्चा परतला असता तर या प्रकारात आक्षेपार्ह असे काही ठरले नसते. पण मोर्चेवाल्यांनी हा संयम, ही मर्यादा पाळली नाही व बळजबरीचे, दहशतीचे तंत्र अवलंबिले. त्यामुळे हा सर्वच प्रश्न विवेकाच्या कक्षेतून निखळून भलतीच कडे वाहवत गेला. इकडे पुण्यातील एकेचाळीस विचारवंतांनी पत्रक काढून एकांगी भूमिका घेतली व तिकडे ढाले-कंपनीलाही भलताच चेव आला. याच प्रकाराची पुनरावृत्ती लिंगवाद निर्मूलकांना अभिप्रेत आहे काय? तापलेली डोकी थंड, शांत करण्यासाठी रंगमंदिरे असतात. हे कार्य ही मंदिरे करीत नसतील आणि उगाच लोकांना भडकविण्याचे समाजविघातक कार्य ही मंदिरे करतात असे काहींना प्रामाणिकपणे वाटत असेल तर त्यांनी भडकून या आगीत तेल ओतणे हे अधिकच चुकीचे ठरते. जेथे सहृदयतेचे, सहानभूतीचे कुंभ घेऊन जायचे तेथे रॉकेल-पेट्रोलचे डबे नेण्यात काय पराक्रम आहे? असलाच तर तो पराभव आहे. कारण शेवटी जय हा नेहमी बुद्धीचा होत असतो. शरीरबळापेक्षा मनोबल हे अखेरीस श्रेष्ठ ठरते, वरचढ ठरते, हे या लिंगवाद निर्मूलकांनी केव्हाही विसरू नये.

□

तेंडुलकरी नाटकांचा प्रेक्षकवर्ग मुळात कमी. बहुसंख्य प्रक्षक सकारण किंवा अकारण या नाटकांपासून आजवर दूरच राहिला आहे. लैंगिकतेचा भरपूर पुरवठा करणाऱ्या हिंदी-इंग्रजी चित्रपटांवर मात्र हा बहुसंख्य प्रेक्षक तुटून पडत असतो. समाजाची नीतीमत्ता खरोखरच वरील निर्मूलकांना सुधारायची असेल तर प्रथम या बहुसंख्य प्रेक्षकांच्या कानामनापर्यंत पोहचणे अधिक तर्कसंगत ठरले असते. निर्मूलकांनी जिथे मोठी आग भडकली आहे तिकडे। साधी पाण्याची बादलीसुद्धा नेलेली दिसत नाही आणि कोपऱ्यातली एक चूल विझवायला मात्र कॉर्पोरेशनचा आगीचा मोठा बंबच घेऊन ते धावत सुटले. आमजनतेची सांस्कृतिक अभिरुची बिघडवणाऱ्या हजारो झगमगीत मदिरा व मदिराक्षी केंद्रांकडे दुर्लक्ष करून मूठभर प्रेक्षकवर्गाच्या आश्रयावर जेमतेम जगणाऱ्या तेंडुलकरांच्या नाटकांवरच निर्मूलकांनी एकदम धाड का घालावी?

—श्री. ग. मा.

# लिंगवादाची लाट कशी थोपवणार ?

दि. बा. मोकाशी

'समाजातील लैंगिक शक्ती कमी झाली आहे' असे एक विधान माझ्या वाचनात आले. लेख लिहिणारा विद्वान म्हणतो की आज सर्वत्र उसळलेली अश्लीलतेची व बिभत्सतेची लाट, समाजातील कामशक्तीचा ऱ्हास झाल्याचे चिन्ह आहे.

अश्लीलता व बिभत्सता यांची वाढ झाली की स्वैराचार माजला आहे असे म्हणण्याचा प्रघात आहे; पण या विद्वानाचे म्हणणे असे आहे की चमचमीत पदार्थ खावेसे वाटू लागले की जिभा चवचाल झाल्या असे म्हणण्यासारखे हे आहे. मंदाग्नीचा रोग झाल्यामुळे मसालेदार पदार्थ खावेसे वाटतात. तसेच लोकातली कामशक्ती मंदावण्यामुळे, मासिकावरील स्त्रियांची मादक चित्रे, नाटक, चित्रपट यातील उत्तान प्रसंग, ट्रीपटीज, किंवा स्त्री-पुरुष संबंधांच्या खाजगी दाखविण्यात येणाऱ्या फिल्मस, बिभत्स बोलणी वगैरेंच्या आधाराने, लोक आपल्या मंदावलेल्या कामशक्तींना उसना जोर आणू पहात असतात.

या विद्वानाचे म्हणणे मला विचार करण्याजोगे वाटते. आज नाटकातून दिसणारी 'वस्त्रहरणे', कधी कादंबऱ्यातले अश्लील शब्द व उत्तान प्रसंग, त्या तऱ्हेचे चित्रपट, नाटके, साप्ताहिके, पुस्तके, मासिके यावर तुटून पडणारी लोकांची झुम्मड, टीकाकारांचीसुद्धा या वादात भाग घेण्याची हिरीरी, हे सर्व पाहिले की काहीतरी बिघडले आहे असे वाटते. कामशक्ती मंदावल्याची ही लक्षणे असतीलही.

गेली पाच-सहा वर्षे काही लिखाणाच्या निमित्ताने माझा प्राचीन काम-

शास्त्र आणि प्राचीन समाज यांचा अभ्यास सुरू आहे. प्राचीन कामशास्त्राबरोबरच काही आधुनिक कामशास्त्राचे वाचन झाले. नकळतच भोवताली चाललेल्या गोष्टींचा त्या दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावू लागलो.

एक तर कामशास्त्राच्या अभ्यासाचा अभाव सर्वत्र जाणवला. विवाहीत प्रौढ जोडप्यांनाही टक्केटोणपे खात जे कामशास्त्र कळलेले असते तेही अर्धवट असते. तरुण मुलामुलींना तर त्याबाबतीत जवळजवळ शून्य ज्ञान असते. खेड्यातील मुलामुलींना निदान निसर्गाकडून या विषयाचे थोडे तरी ज्ञान होते. पण शहरातील मुलामुलींना घाईगर्दीत जे कळते ते तर विकृत ज्ञान असते.

अशा स्थितीत समाजात दोन भूमिका तयार होतात. प्रौढ माणसे 'नैतिक' होतात, व तरुण मुलेमुली लैंगिकस्वातंत्र्याचे बोलू लागतात. कामशास्त्राबद्दल स्पष्ट बोलायचे नसल्यामुळे या अशास्त्रीय भूमिका घेतल्या जातात. मनोहर साप्ताहिकाच्या एका अंकात एका स्त्रीला मांडीवर घेऊन एक पुरुष बसल्याचा फोटो आहे. हा फोटो पाहून 'असला अंक आमच्या मुलांना आम्ही वाचावयाला द्यायचा का?' असे एका गृहस्थाने संतापाने व उद्वेगाने विचारले. या गृहस्थाचा हा दृष्टिकोन नैतिक झाला. मलाही हा फोटो पाहून धक्का बसला. पण तो त्याच्या अनौचित्यामुळे. मांडीवर घेतलेली स्त्री हा विषय तसा फार जुना. प्राचीन लेण्यांतून हा सर्रास आला आहे. कामसूत्रातही आहे. पण कामशास्त्र जाणणारे, विशिष्ट वातावरण निर्माण करून हा विषय घेत असत. मांडीवर घेतलेल्या 'स्त्री'च्या आधीचे व नंतरचे मुलांच्या कल्पनेवर सोपवून असा फोटो घालणे हा सनसनाटीपणा आहेच. पण क्रूरपणाही आहे. आणि कामशास्त्राचे अज्ञान आहे हे वेगळेच.

ही प्रौढ माणसे मुलांनी नग्न स्त्रियांचे फोटो पहाणे अनैतिक धरतात. त्यात अनैतिक काही नाही. ते नैसर्गिक आहे. फक्त काळवेळ चुकलेली असते एवढेच. काही दुकानदार हॉस्टेलमधील मुलांना नग्न फोटो पहाण्यास पुरवतात असे मी ऐकले आहे. हॉस्टेलच्या खोलीत हे फोटो पहाताना होणारे क्षोभ व त्याचे दुष्परिणाम हे महत्त्वाचे. भलत्या जागी भलत्या वातावरणात, शिक्षण चालू असलेल्या वयात हे फोटो मुलांनी पहाणे त्यांच्या प्रकृतीवर, मनावर व शिक्षणावर वाईट परिणाम करणारे आहे असे नक्की म्हणता येईल.

प्रौढ, अशी चुकीची नैतिक भूमिका घेतात मग मुलेमुली लैंगिक स्वातंत्र्याची कास धरतात. जसे नैतिक असे काही नसते तसेच लैंगिक स्वातंत्र्य अशी भूमिकाच असू शकत नाही हे त्यांना कळत नसते. एका मुलाने त्याने लिहिलेले नाटक मला वाचावयास दिले.

नाटक ट्रायल-मॅरेजवर होते. ट्रायलमॅरेज असे काहीतरी असते एवढे कुठेतरी त्याच्या कानावर होते. त्याने त्याचे पाश्चिमात्त्य देशांतील प्रयोग वाचले नव्हते. त्या कल्पनेतला सन-

सनाट त्याला आवडला असावा. एकमेकांवर प्रेम करीत असलेली त्याची नायकनायिका ट्रायल-मॅरेज करतात. नायिकेला ट्रायल-मॅरेजबद्दल सांगतानाच नाटकाचा पुष्कळ वेळ जातो. त्यांची ट्रायल सुरू होते. इकडे अमेरिकेत या नायकाची एक पेन-फ्रेंड असते. ती त्याला आपण तिकडे येऊन त्याच्याजवळ राहाणार आहोत असे पत्र येते. त्या पत्रामुळे ट्रायल-मॅरेजवर संकट येते. नायकाला अमेरिकन पेन-फ्रेंडचा मोह सुटतो. वगैरे वगैरे.

हे नाटक म्हणजे त्या मुलाच्या लैंगिक व स्त्रीपुरुष संबंधीच्या अज्ञानाचा कहर होता. मुलांना कामशास्त्राचे केवढे अज्ञान असते याचा तो नमुना होता. त्या वयात कामेच्छा जागृत झालेली असते. लैंगिक विषयांना भयंकर महत्त्व येते. पण कुठूनही ते ज्ञान मिळण्यास मोकळीक नसल्यामुळे मुले स्वैर कल्पना सोडू लागतात एवढेच.

अशा स्वैर कल्पना मुलेमुलीच करतात असे नाही. अनेक लेखक आपले लिखाण अशा कल्पनांनी भरतात. लैंगिक, विभास शब्दांचा वापर, चित्रविचित्र लैंगिक व्यवहार यांचे चित्रण, त्यांच्या मनात जसे येते तसे देण्याचा त्यांचा हट्ट असतो. पुष्कळदा हे चित्रण उथळ व अद्वातद्वा असते. त्यांत अज्ञान खूप व सनसनाटीपणा जास्त असतो. गंगाधर गाडगीळ यांच्या एका पहिल्या कथेत नायक दारावरचे विजेच्या घंटेचे बटण दाबतो. त्या बटणाकडे पाहून स्त्रीच्या स्तनाग्राची त्याला आठवण येते असे आहे. या उपमेने त्या काळी केवळ वाचकच नव्हेत तर मोठमोठ्या टीकाकारांनाही चक्रावले याची आठवण पुष्कळांना असेल.

धक्का देण्याच्या कल्पना पुष्कळदा पाश्चात्त्य कल्पनांवरून घेतलेल्या असतात. मगतर केवळ धक्का देण्यापलीकडे त्यात काही नसते. समाज उध्वस्त करण्याचे किंवा लैंगिक स्वातंत्र्याची तत्त्वे जे सांगत असतात, तो त्यांचा समाजावरचा रागही असतो. असे तत्त्व मांडणारे लेखक चैनीत, स्वास्थ्यात राहण्याचे सोडत नाहीत किंवा लैंगिकस्वातंत्र्य स्वतःच्या घरातही त्यांना सहन होत नाही. असे लिहिणारा एकही लेखक स्वैरजीवन जगताना महाराष्ट्रात तरी मला ठाऊक नाही.

या दोन्ही दोन टोकांच्या विचारसरणी, आपल्या देशात कामशास्त्राच्या अभ्यासात मधला जो मोठा कालखंड रिकामा गेला त्याचे द्योतक असाव्यात. आपल्या देशात एकेकाळी कामशास्त्रावरचे तीनशेहून जास्त ग्रंथ प्रसारांत होते हे आज कुणाला पटेल का ?

हूणांच्या हल्ल्यानंतर आपल्या समाजात कर्मठपणा सुरू झाला. नंतर मुसलमानांचे हल्ले सुरू झाल्यावर तो अधिकच वाढला. मुसलमानांचे साम्राज्य आल्यावर स्त्रिया गोषात गेल्या व जवळजवळ गुलाम झाल्या. आपली सर्व शास्त्रे व मोकळे वादविचार थबकले. नवे अभ्यास बंद पडले. त्याबरोबर कामशास्त्राचे अध्ययनही. नंतर ब्रिटीशांचे 'ख्रिश्चन' राज्य आले. मुसल-

मानाहूनही ते कामशास्त्राचे बाबतीत मागासलेले होते. त्यांच्या धर्माप्रमाणे 'काम' हे पाप होते. या दोन्ही साम्राज्याचा परिणाम आपल्यावर फार गंभीर झाला. इंग्रजी शिक्षणातून तयार झालेले विद्वानही ख्रिश्चन समजुती-प्रमाणेच कामविषयाकडे पाप म्हणून पाहू लागले. कै. र. धों. कर्वे यांना जो विरोध झाला तो इंग्रजी शिक्षित वर्गा-कडून अधिक झाला.

वरील पारतंत्र्याच्या काळात कामशास्त्राचा अभ्यास व प्रसार थांबला तरी कामशास्त्र हे अश्लील नाही या आपल्या परंपरागत विश्वासाने आपल्याला वाचविले. या विषयाच्या अभ्यासाला प्रतिकूल असलेली अशी दोन साम्राज्ये होऊन गेल्यावरही, कामशास्त्र निषिद्ध धरले गेले नाही. कामशास्त्राच्या ग्रंथांतून चावटपणा असतो असा सर्वसाधारण गैरसमज असला तरी शास्त्री-पंडित आजही वात्स्यायन या प्राचीन कामसूत्रकाराचा उल्लेख महर्षी असा करतात. कामशास्त्र हा पाचवा वेद मानला जातो.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर, जिथे आपण कामशास्त्राचा अभ्यास व चर्चा सोडल्या त्या काळाशी संधी करून हा अभ्यास पुढे चालू करावयास हवा होता. तो आपल्या समाजाच्या मनोभूमीकेला व वातावरणाला धरून संथ व शांतपणे झाला असता. पण तसे न होता यांत्रिक युगात अत्यंत प्रगत, अशा पाश्चात्य समाजातील कल्पनांची पेरणी आपल्याकडे सुरू झाली व ती अत्यंत धक्के देणारी, न रूचणारी, न पचवता येणारी त्रासदायक अशी ठरली.

कामसेवन निरोगी होते असा एखादा काल पूर्वी होता का ? असा प्रश्न येईल. रामराज्याप्रमाणेच असा सतत निरोगी कालखंड कोणत्याही समाजात सतत असल्याचा दाखविणे कठीण आहे. कालखंड कसाही असो, समाज जागृत असल्याची चिन्हे असली की पुरे होते. जेव्हा जेव्हा आपल्याकडे कामसेवनात विकृती आली तेव्हा तेव्हा कामशास्त्रज्ञांनी कामशास्त्राचा शुद्ध अभ्यास व्हावा यासाठी नवेनवे ग्रंथ लिहिले. वात्स्यायनाच्या काळी आपला समाज भौतिक उत्कर्षाला पोहचला होता. संपत्तीचा पूर वहात होता. सर्वसामान्य नागरिक रंगेल होत चालला होता. वेशेत (वेश्यावस्तीत) जाणे हे सर्रास होते. स्त्रीला आपले संसारातले स्थान अनिश्चित वाटू लागले होते, कामशास्त्राचे ज्ञान घेणे थांबल्याने लैंगिक अधोगतीही सुरू झाल्याचे वात्स्यायनाचे मत असावे. कारण पूर्वीचे ग्रंथ वाऱ्यावर गेल्यामुळे आपण त्या विस्तृत ग्रंथांवरून थोडक्यात कामसूत्रे लिहीत आहोत असे त्याने म्हटले आहे.

नंतर सातशे वर्षांनी कामसूत्रावर यशोधराने जयमंगल टीका लिहिली. ती लिहिण्याचे कारण, वात्स्यायनाचे कामसूत्र इये लोकांनी विपरीत केल्यामुळे आपण ही टीका लिहीत आहोत, असे त्याने दिले आहे.

कामशास्त्राच्या अभ्यासाने लैंगिक विकृती, अश्लीलता व बिभत्सता यांना आळा बसतो हा त्यांचा विश्वास होता.

त्याकाळी कामविषयक प्रश्नावर मोकळेपणाने चर्चा होत. अशा चर्चा वात्स्यायनाने कामसूत्रात दिल्या आहेत. त्यात धर्मबाह्य समजले जात नव्हते किंवा चावटपणाही समजला जात नव्हता. कामसूत्रे म्हणजे केवळ संभोगासने नाही,त तर सबंध जीवनाला धरून केलेले कामविषयक भाष्य आहे. आज कामशास्त्रात जी अनेक तत्त्वे मान्य झाली आहेत ती आपल्या प्राचीन ग्रंथात आलेली आहेत. उदा.–कामसेवन हे अन्नाइतकेच शरीराच्या आरोग्याला आवश्यक आहे, कामशास्त्र वयात आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाने शिकले पाहिजे, कामसेवन निरोगी होण्यास कामशास्त्राचे ज्ञान आवश्यक आहे, कामसेवनाचेवेळी स्त्रीचे मन जाणणे महत्त्वाचे आहे, कामसेवनासाठी अनुकूल वातावरण निर्माण करावयास हवे, स्त्री व पुरुष यांचे संभोगसुख एकाच प्रकारचे असते.–

त्या काळी विद्यार्थ्यांना कामशास्त्र शिकवीत. आणि चौसष्ट कला. याउलट आज कामशास्त्र माहीत हवे याचे भान गेलेले दिसते. विद्यार्थ्यांतील बिभत्स बोलणी हे कामशास्त्र नव्हे. कथा-कादंबऱ्यांतून येणारे बीभत्स, उत्तान प्रसंग हे कामशास्त्र नव्हे. मळवली येथे मुलामुलींनी ज्या तऱ्हेने संभोग घेतल्याची वर्णने आली आहेत ते काय कामसेवन झाले? तो सर्वच प्रकार कामशास्त्राच्या दृष्टीने त्याज्य होता. त्या तरुणतरुणींचा राग येण्यापेक्षा कीवच यायला हवी. वरील कोणत्याच गोष्टी कामशास्त्रात बसत नाहीत. त्या सर्व, मंद झालेल्या कामशक्तीच्या, हव्या तर चाळवाचाळवी म्हणाव्यात. आज किती मुलांना कामसेवनाच्या दृष्टीने लागणारे शरीरशास्त्राचे ज्ञान असते? स्त्रीपुरुषांमधील आकर्षण आणि नंतरच्या कामसेवनाची तयारी याबद्दल कितींनी शास्त्रशुद्ध वाचन केलेले आढळेल. यापैकी कितीजणांनी कै. र. धों. कर्वे यांच्या कार्याचा अभ्यास केला आहे? कामशास्त्राचा मोकळेपणाने अभ्यास व्हावा यासाठी या गृहस्थाने आयुष्यभर कायद्याला व दारिद्र्याला तोंड दिले.

लैंगिक भाषा वापरणे, लैंगिक प्रसंग अगदी स्पष्ट टिपणे हे आपल्याकडे वेदांपासून चालू आहे. त्या प्राचीन ग्रंथातले उतारे दिले, तर आजचे लैंगिक लिहिणारे लेखक बेशुद्ध पडतील. मुद्दा शब्द वापरण्याचा नाही. ते वापरताना आपण काही विलक्षण करीत आहोत या खोट्या जाणीवेचा आहे. प्राचीनकाळी अश्लील वगैरे भावनाच नव्हती. आजच्यांना अपराध्यासारखी त्याची जाणीव असते.

मुद्दा मोकळेपणाचा आहे. कामशास्त्राची मोकळेपणे चर्चा व्हावयास हवी. कामशास्त्राचे योग्य ज्ञान तरुणतरुणीस मिळाले की सनसनाटी प्रवृत्तींना शह बसेल. आपण आज करीत आहोत, बोलत आहोत ते केवळ 'चाळे' आहेत. आपण कुमकवत झाल्याची ती लक्षणे आहेत. आपले करणे केवळ हास्यास्पद नाही तर करुण

आहे. ते प्रकृतीस्वास्थ्याला व समाजस्वास्थ्याला हानिकारक आहे हे मुलांना कळून येईल.

कामशक्ती विकृत व दुर्बल झाल्या तेव्हा वात्स्यायनाने कामसूत्रे लिहिली. कामसेवन सर्व जीवनाला धरून असावे हे सांगताना तो ' धर्म अर्थ आणि काम ' धरून वर्तन करावे असे सांगतो. ते कसे तर, कामापेक्षा अर्थ, अर्थापेक्षा धर्म हा श्रेष्ठ मानावा. (येथे धर्म हा आध्यात्मिक पेक्षा सामाजिक धरला आहे.) प्राचीनांनी दिलेला हा सुखी कामसेवनाचा तोडगा आज किती लागू पडेल हे पहावे लागेल. धर्म, अर्थ, काम हे शब्द गुळगुळीतही वाटतील. त्याचेही काही करावे लागेल. पण हा तोडगा विचार करण्याजोगा आहे.

अर्थातच कामशास्त्राचे ज्ञान होणे व त्यानंतर तसे आचरण होणे यात महदंतर आहे; पण शास्त्र शिकलेले वाया जात नाही. कुठेतरी त्याची आठवण होऊन उपयोग होतो. आजची दु:स्थिती बदलण्यास कराव्या लागणाऱ्या अनेक गोष्टीतली ती एक गोष्ट आहे. खरे म्हणजे सर्व बाजूंनी या प्रश्नाचा विचार व्हावयास हवा आहे. कामशक्ती दुर्बळ झाली असेल तर त्यास अनेक कारणे असू शकतील. नि:सत्त्व अन्न, रहाण्याच्या जागांचा अभाव, अपुरी प्राप्ती किंवा बेकारी, महागाईचा ताण, अशा पुष्कळ, पुष्कळच गोष्टींचा विचार करावा लागेल. दुर्बल झालेला कामशक्ती किंवा विकृत कामप्रवृत्ती यांचा विचार करताना एकटा एक विषय बाजूला काढून विचार करता येणार नाही. त्यामुळेच हा विचार मला शक्य नाही. त्यासाठीच जाणत्यांनी यात भाग घ्यावा ' म्हणून लेख आवाहन म्हणून धरावा.

● ● ●


## पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

## संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०.

मद्रास मेल

# नौकरीचा अर्ज एक वैताग !

चंद्रकांत अंबाडे

नवरात्र संपले, दसरा उजाडला. मोरुचा बाप मोरुस म्हणाला...सॉरी, मला म्हणायचंय...परीक्षा संपल्या. निकाल लागला. मोरुचा बाप मोरुस म्हणाला "आता अर्ज करण्यास सुरुवात कर" आणि मोरू भराभर अर्ज टाकण्यास सुरुवात करतो. एकेकाळी मीही 'मोरू' होतो. आजही एखादी जाहिरात मला 'मोरू' बनविते आणि शेवटी मग कधीकधी माझाच 'मोरू' होतो !

अर्ज करताना प्रथम पसंती मध्यवर्ती सरकारी खात्यांना. उदा. रेल्वे, पोस्ट, डिफेन्स, इन्कमटॅक्स, सेंट्रल एक्साईज. त्यातल्या त्यात 'वरकमाई' असणाऱ्या खात्यास अधिक पसंती. मनाला गुदगुल्या करणारी ती जाहिरात पुन्हा पुन्हा वाचावी...मनोराज्य करावीत...मिळणाऱ्या पगाराचे बजेट देखील ठरवून पक्के करावे. शेवटी टिप असते "अर्ज ठराविक नमुन्याचे फॉर्मवरतीच करावेत. त्यासाठी स्वतःचा पत्ता असणारे, ३५ पैसे तिकिटे लावलेले २३·००१ सें. मीटर × १०·९५ सें. मी. आकाराचेच पाकीट व दोन रुपये सहा पैसेची पोस्टल ऑर्डर पाठवावी. लास्ट डे......! बस्स ! समजा ते खाते तुमच्या गावातच असेल अन् तुम्ही समक्ष गेलात तरी कोरा अर्जाचा फार्म मिळणार नाही. फॉर्म फक्त पोस्टानेच पाठविले जातील. म्हणजे कोरा फॉर्म मिळवण्यातच पावणेतीन रुपयांचा 'धूप' लागतो तो असा. शेवटच्या तारखेच्या जेमतेम दोन दिवस आधी तुम्हाला फॉर्म मिळतो. घाणेरड्या काळपट मळक्या कागदावर सायक्लोस्टाईल केलेला...जेमतेम चार पानी. २५ पैशाच्या तिकिटातही आला असता. मग कशाला ३५ पैसे पोस्टज हवे होते कोण जाणे ? पण विचारणार कुणाला ? तुम्ही झट्दिशी अर्ज भरण्यास बसता अन् इथच वैतागाचे पहिले पर्व संपून दुसरे लागते.

अर्जावर लिहायला जावे तो शाई फुटते. शिवाय रकाने अपुरे तरी, नाहीतर अवास्तव तरी ! जेथे 'होय' किंवा 'नाही' असे एका शब्दातच उत्तर असते. तेथ वितभर जागा सोडलेली असते आणि 'शैक्षणिक पात्रता' सदराखाली टीप असते–शाळेचे/कॉलेजसची

नावे, पूर्ण पत्ते, घेतलेले विषय, विषयवार मार्क्स,परीक्षांचे दिनांक व टक्केवारी लिहा; पण उत्तराकरिता जागा असते पोस्टाच्या तिकिटापुरती ! कधीकधी मुदत संपल्यावरतीच कोरा-फॉर्म मिळतो. अशावेळी मी काय करतो ठाऊक आहे? मागची तारीख घालून गुपचुप देतो पोस्टात टाकून !

कधी कधी अर्ज असतो दहा-बारा पानांचा (उदा. रेल्वे सर्व्हिस कमिशनचा), नाही नाही ते विचारलेले असते. म्हणे शरीरावरील खाणाखुणा लिहा. झटदिशी न्हाणीघरात जाऊन कुठे कुठे तीळ आहेत ते बघून यावे व लिहायला बसावे, तो शंका यते 'इंटरव्यूव्हला तोळ दाखवा म्हणाले तर?' --मग आपोआपच खाडाखोड अपरिहार्यच ! अर्जाच्या पहिल्याच पानाला फोटोसाठी चौकट असते. रेल्वेला तर पाच-पाच फोटो कशाला लागतात देव जाणे. पाच-पाच फोटो पाहूनही आत एक प्रश्न छपलाय, 'आपले लिंग (सेक्स) कोणते ?' आठव्या क्रमांकाच्या 'पूर्वानुभव' प्रश्नाला जागा आहे दीड इंचाची एक ओळ. त्यामध्ये सरकारी की खाजगी, ऑफिसचे नाव, पत्ता, पगार, हुद्दा, ती का सोडली हे रामायण लिहून दाखवायचे. त्याच अर्जाच्या शेवटी उमेदवाराने प्रतिज्ञेवर सही करायची आहे की, मला एकच बायको आहे, दोन नाहीत व मी भारताचा नागरिक आहे. दोन ओळींच्या ह्या प्रतिज्ञेस अक्षरशः अर्धे पान सोडले आहे. त्यानंतर कुणातरी गॅझेटेड ऑफिसराची अर्जातील मजकुराच्या खरेपणाबद्दल, अर्जावर सहीचा कॉलम आहे--त्याला-देखील अर्धे पान का खर्च करतात देव जाणे !

रेल्वेच्या नऊ पानी अर्जातील, शेवटची ५ ते ८ पाने म्हणजे निव्वळ कागदाचा नासोडा, लिहिण्याचे श्रम व पोस्टेजला भार ! पहिल्या चार पानातीलच माहिती जवळजवळ पुन्हा येथे कॉपी करायची आहे. इतर खात्यांमध्येही अशी माहिती 'पोलिसांतर्फे चौकशी' करिता घेतात. पण केव्हा? मुलाखतीनंतर निवड होऊन, कामावर प्रत्यक्ष हजर होण्यापूर्वी ! म्हणजे शेकडो उमेदवारांपैकी दोघाचौघांसच ते भरावे लागतात. मग बाकीच्या साऱ्यांच्या ४-४ पानांची वाट काय? अर्थातच रद्दी ! आता अनायासे रेल्वेचाच मुद्दा निघालाय म्हणून आठवलं, पान क्रमांक नऊ हे पूर्णतया कमिशन ऑफिसचे काम आहे, पण ते देखील उमेदवाराकडूनच भरून घेण्याचा धूर्तपणा केला जातो. शिवाय 'रेल्वेदेवता' प्रसन्न करून घेण्यास आणखीनही पूजासाहित्य आहेच पुढे. चार-चार किंवा पाच-पाच फोटो, पत्ता लिहिलेले एक मोठे पाकीट, पत्ता लिहून २५ पैशांची तिकिटे लावलेले आणखीन एक पाकीट अर्जाला जोडायचे. कशाला? म्हणे निकाल कळवण्यास. साधा नकार तर १० पैशाच्या कार्डावर कळविता येईल. माझी रेल्वेला प्रार्थना आहे की, आणखीही दोन फॉर्म्स उमेदवारांकडूनच

पृष्ठ ४७ वर

# आलेपाक

■ 'घाशीराम सखाराम तेंडुलकर यांच्यासाठी व यांच्याबद्दल चार शब्द' किंवा 'नरमांसभक्षक वाघ रोखणार कसा?' या 'सोबत'च्या ताज्या अंकातील लेखात संपादक ग. वा. बेहेरे म्हणतात : घाशीराम कोतवालचे जे पात्र म्हणून तेंडुलकरांनी निर्माण केले आहे ते त्यांचे स्वत:चेच दर्शन आहे.

काहीजणांना घाशीराम कोतवाल या पात्रात ग. वा. बेहेरे यांचे दर्शन होते, असेही आम्ही ऐकले आहे.

■ वर उल्लेखिलेल्या 'घाशीराम'वरील लेखात बेहेरे पुढे म्हणतात : आता घाशीराम नाटकावर कोणी ऐतिहासिक नाटक म्हणून शिक्का मारू लागले, तर तेंडुलकर म्हणतात की ते ऐतिहासिक नाटकच नाही.

तेंडुलकर काहीही म्हणोत; प्रायोगिक मराठी रंगभूमीवर नवा इतिहास घडवणारे नाटक, म्हणून आम्ही तरी 'घाशीराम'ला ऐतिहासिक नाटकच म्हणणार.

■ आता आणखी एकदाच बेहेऱ्यांचा तो लेख. बेहेरे बजावतात : पुण्यातील ब्राह्मण हे नाटक बंद पाडतील अशी हाकाटी तेंडुलकरांनीच उठवली; पण पुण्यातील ब्राह्मण तेंडुलकर समजतात तेवढ मूर्ख नाहीत.

यावर काही मल्लिनाथी करून मला 'पुण्यातला ब्राह्मण' व्हायचे नाही!

■ एक प्राध्यापक लिहितात : एखादा विषय रंगतदार करून सांगणे य वरूनच प्राध्यापकाची लायकी ठरवू नये.

बरोबर आहे; एखादा विषय जमेल तेवढा कंटाळवाणा करून सांगणे यावरूनच प्राध्यापकाची लायकी ठरवली जावी.

■ एक नाट्यसमीक्षक म्हणतात : मराठी रंगभूमीवर आत्तापर्यंत डॉ. भालेराव, डॉ. घाणेकर व डॉ. लागू अशा तीन डॉक्टरांनी आपले नाव प्रस्थापित केले आहे. जब्बार पटेल या तरुण डॉक्टराचीही पावले त्या मार्गावर पडत आहेत.

तरी आपली मराठी रंगभूमी रोगट ती रोगटच!

■ महाराष्ट्र विधिमंडळीपुढील राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत विरोधी आमदारांनी सरकारवर केलेल्या नाकर्तेपणाच्या आरोपाचा इन्कार करताना मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणाले : गेल्या दहा वर्षांत जेवढे निर्णय घेतले नाहीत तेवढे तीन महिन्यात घेतले.

गेल्या दहा वर्षांत निर्णय घेतले नाहीत असे स्वत: मुख्यमंत्रीच म्हणाले हे बरे झाले.

■ मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू टोपे एका व्याख्यानात म्हणाले : महाविद्यालयातील प्राध्यापकांनाही प्रशिक्षण द्यायला हवे हा विचार आता सर्वत्र मान्य झाला आहे.

आमच्या मते प्रशिक्षणाची सर्वाधिक गरज उपकुलगुरुंनाच आहे.

■ पू दत्ता बाळ सांगतात : तमाशात श्रीकृष्णाचे विकृत स्वरूप दाखवतात.

तुम्ही गेलात कशाला तमाशा पाहायला ? तमाशा आ' बाळ 'वृद्धासाठी नसतो हे सांगितले नाही कोणी तुम्हाला ?

■ तमाशातील श्रीकृष्ण या विषयासंबंधी बोलताना वसंत सबनीस म्हणाले : बाकीचे देव हे तसे माणसापासून लांब. तेव्हा लोकनाटचात जो कृष्ण दिसतो आहे तो तरी माणसापासून दूर जाऊ नये.

माणसापासून म्हणजे बाईमाणसापासून, बरं का पाव्हणं.

■ एका साहित्यिकांना टाळी वाजवताना आपण कधी पाहिले नाही असे दुसरे एक साहित्यिक म्हणतात.

आम्ही तर बहुतेक साहित्यिकांना एका हाताने टाळी वाजवताना पुष्कळदा पाहिले आहे !

■ मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूक-प्रचारसभेत बोलताना समाजवादी पक्षाचे नेते खासदार मधु दंडवते म्हणाले : इंदिरा गांधींच्या नावाची जादू आता संपली आहे. त्या गरिबी हटवू शकत नाहीत, त्या भाववाढ रोखू शकत नाहीत.

आणि त्या विरोधी पक्षांची दैना थांबवू शकत नाहीत !

■ पुण्यामुंबईत पुरुषांना पुरुषांकडे बघायला वेळ उरतोच कोठे ?

## 'फेमिनात' नाना फडणीस

सखाराम बाईंडर आता इतिहासजमा झाला आणि इतिहासातला नाना फडणीस मराठी रंगभूमीवर ठेक्यात पावले टाकीत प्रगट झाला. या नाना फडणीसाचे जे व्हायचे ते झाले. म्हणजे काही जणांनी त्याचे खणखणीत कौतुक केले आणि दुसऱ्या काही जणांनी त्याची षोडशोपचारे पाद्यपूजा केली. आम्ही दोन्ही वेळी टाळ्या वाजवल्या. आपण कधीच कोणाचा पक्ष (पूर्वी यालाच 'कैपक्ष' असे म्हणायचे) घेत नाही. वाडवडिलांच्या शिकवणुकीप्रमाणे बूड आणि कुंपण सावरत कुंपणावरच बसतो. तेथून दृश्य चांगले दिसते.

आता हेच पाहा : 'फेमिना 'नावाचे बायकिश इंग्रजी साप्ताहिक आपल्याला माहीत असेल. हे साप्ताहिक नाना फडणीसाबद्दलच्या तेंडुलकर-पुणेकरांच्या वादात तेंडुलकरांची बाजू घेईल, असे कोणाला वाटले असते ? पण तसे घडले

आहे हे खरे. या साप्ताहिकाच्या १६ फेब्रु. १९७३ च्या अंकात, आजही कोठे कोठे रेंगाळणाऱ्या बहुपत्नीत्वाबद्दल एक लेख आला आहे. या लेखातील आशय ठसठशीत व्हावा म्हणून लेखासोबत एक चित्रही छापले आहे. चित्र तसे साधे आणि सोज्वळ आहे. कारण चित्रात श्रीकृष्ण आपल्या फक्त आठ (उरलेल्या सोळाहजार एकशे कोठे होत्या श्रीकृष्णच जाणे) नायिकांसमवेत रतिविहार करतो आहे. या चित्राबद्दलचा इतर तपशील मात्र मराठी नाट्यरसिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे : मूळचे चित्र नाना फडणीसाच्या मेणवली येथील वाड्यातल्या शयनगृहाच्या भिंतीवरचे आहे. 'फेमिना'मध्ये दिलेल्या प्रतिकृतीशेजारी माहिती आहे : 'अष्टनायिकांसमवेत रतिविहार करणारा श्रीकृष्ण... की पेशव्यांचा प्रंतप्रधान नाना फडणीस ?' चित्रासोबतचा लेख कोणा 'सुजाता मनोहर' यांचा आहे. हे माधव मनोहरांचेच 'फेमिना'इट नाव असेल काय याचा बारीक शोध मी घेतो आहे. ●

## 'चॅप्लीन'चा नवा चित्रपट

राजकारणी स्त्री-पुरुष सोडले तर आपल्या भारतात माणसे फार लवकर म्हातारतात. पाश्चात्य देशात हे म्हातारपण इतक्या लवकर येत नाही. पाश्चात्य कलावंत तर अमरपट्टाच घेऊन आलेले असतात जणू. त्यामुळे त्यांच्या प्रतिभेचे नवे नवे उन्मेष ऐन म्हातारपणात निर्भरपणे उमलत असतात.

८३ वर्षांचा चार्ली चॅप्लीन पाश्चात्यांच्याही दृष्टीने काही तरुण नव्हे. खरे म्हणजे आत्तापर्यंतच्या स्मरणीय आयुष्यातील विविध स्मृतींचा चित्रपट पाहात कालक्रमण करायचे त्याने; पण स्वारीने नव्या चित्रपटाची सिद्धता चालवली आहे. एकूण, सात वर्षांपूर्वी प्रकाशित झालेला 'काऊंटेस फ्रॉम हाँगकाँग' हा काही चॅप्लीनचा अखेरचा चित्रपट ठरणार नाही असे दिसते. फारच छान. त्याच्या नव्या संकल्पित चित्रपटाचे नाव आहे 'द फ्रीक' त्याचे दिग्दिर्शन तो करील. शिवाय एक लहान भूमिकाही करील. चौथ्या पत्नीपासून झालेल्या दोन कन्यकांनाही चॅप्लीन आपल्या या चित्रपटात भूमिका देणार आहे.

'द फ्रीक' हा चॅप्लीनचा अखेरचा चित्रपट असणार नाही.

—अनंतराव

कलकत्ता मेल

# बी पेरलेत; आता खतपाणी केव्हा ?

सौ. तारा पंडित

रविवारचा दिवस. कलकत्त्यातील सर्व महाविद्यालयोन विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक, प्रिन्सिपॉल इत्यादी मिळून सुमारे पाच हजार लोकांचा एक अभिनव मोर्चा निघाला होता. डमडम ते रवींद्र सरोवर एवढे सुमारे सोळा किलोमीटर अंतर सर्वजण शांतपणे चालून गेले. 'स्टुडंट्स् हेल्थ होम' करिता फंड जमविण्याच्या उद्देशाने हा मोर्चा काढण्यात आला असून 'चोलबे ना, चोलबे ना' ह्या नित्यपरिचित घोषणा ऐकू येत नव्हत्या, म्हणून तो मोर्चा अभिनव भासला. आणखी विशेष म्हणजे मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थ शंकर रे व सौ. माया रे ह्यांनीदेखील ह्या मोर्चात भाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या हाती अनेकविध फलक होते. मोर्चाचा दुसरा अव्यक्त उद्देश A walk for a fuller life अशासारख्या फलकांवरून सूचित होत होता.

रवींद्र सरोवरला पोचल्यानंतर साहजिकच मुख्यमंत्र्यांचे छोटेसे भाषण झाले. त्यात त्यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने कलकत्ता शहर सुंदर आणि आकर्षक बनविण्याबाबतचा मुद्दा मांडला. (यापूर्वी एक-दोनवेळा वर्तमानपत्रद्वाराही त्याबाबत त्यांनी उच्चार केलाच होता.) आपल्यामधील 'सौंदर्याची जाणीव (aesthetic instinct) नष्ट झाली आहे; तिचे पुनरुज्जीवन घडवून आणणे आवश्यक आहे असे मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले. ह्या मोर्चामुळे त्यात भाग घेणाऱ्या व न घेणाऱ्या अनेकांच्या मनात आपले शहर स्वच्छ आणि सुंदर बनविण्याच्या विचारांचे बीजारोपण होईल ही आशा त्यांनी व्यक्त केली.

हा विचार उत्तमच आहे; पण आता प्रत्यक्ष कृतीला प्रारंभ होणेही तितकेच आवश्यक आहे. नाहीतर रम्य कल्पना शब्दातच विरघळून जायची. ह्या वेळी साने गुरुजींनी सांगितलेली एक गोष्ट आठवते.

एकदा साने गुरुजी एका लहानशा खेड्यामध्ये गेले व सकाळच्या प्रहरी एका झाडाखाली उभे राहून एकट्यानेच भाषण करण्यास सुरुवात केली. आपोआपच श्रोतृवृंद जमण्यास प्रारंभ झाला. भाषण संपल्यावर एक वृद्ध गृहस्थ गुरुजींना म्हणाले– 'हे सर्व काय आहे ?' गुरुजींनी सांगितले, की, मी 'तुमच्या गावात सभा घेतली व आपले विचार बोलून दाखवले.' यावर ते म्हातारे गृहस्थ म्हणाले–'सभा ? आजवर ह्या गावात कधीच सभा-भाषणे झाली नाहीत. तुम्ही येऊन फार नुकसान

केलेत.' गुरुजी म्हणाले– 'अहो, पण आज मी सभा घेतली व तुमच्या फायद्याचे काही विचार मी तुमच्यासमोर मांडले तर कुठे चुकले?' ते गृहस्थ म्हणाले–'आज तुम्ही आमच्या मनात नव्या विचारांचे बी पेरलेत हे ठीक झाले; पण ते पेरून तुम्ही निघून गेल्यावर त्याला खतपाणी घालून त्याची निगा राखायला काय कोणी येणार आहे? की बी तसेच मरू देणार?'

गुरुजींना वाटले म्हातारबुवांनी अगदी सत्य गोष्ट सांगितली खरी. सुविचारांचे नुसते बी पेरून चालत नाही. त्याला खतपाणी घालून त्याची योग्य ती निगा राखणे अधिक जबाबदारीचे काम आहे. ●

## कोण आप्त? कोण परका!

संथाली भाषेला मान्यता मिळावी म्हणून संथाळी लोकांचा एक मोर्चा निघाला होता. हे लोक नंतर एस्पलेनेड विभागात इकडेतिकडे फिरत होते. दुपारचे वेळी त्या बाजूने जात असताना त्यांच्यापैकी दोन तरुणांचे बंगाली संभाषण कानांवर आले.

सुरेंद्रनाथ बॅनर्जींच्या पुतळ्याकडे बोट दाखवीत एक म्हणत होता, 'हा काय लेनिनचा पुतळा आहे का रे?'

'होय, मला वाटतं. लेनिनचाच असावा.' दुसरा म्हणाला,

मला मनातून आश्चर्य वाटले. ह्या लोकांना लेनिन माहीत असावा आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जींसारखा भारतीय माणूस ओळखता येऊ नये?

माझे आश्चर्य मनातल्या मनातच राहिले.

संध्याकाळी स्वपन् बसुशी चर्चा करीत असताना तो सहज म्हणाला– महात्मा गांधी आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जी ह्यांच्यात एक फार मोठा फरक होता बघ. महात्मा गांधी अगदी सामान्यांची भाषा बोलत असत त्यामळे समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत त्यांची पोच होती. उलट सुरेंद्रनाथ बॅनर्जींची भाषा फार उच्च दर्जाची असे. त्यामुळे समाजातील बुद्धिमान वर्गालाच त्यांचे बोलणे समजे. इतर सामान्य जनतेला साहजिकच त्यांचेबद्दल विशेष आपलेपणा कधी वाटला नाही.

आणि त्याचवेळी मला माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. लेनिननेसुद्धा महात्मा गांधींसारखाच जनसाधारणांच्या मनात प्रवेश मिळवला होता, स्वदेशातीलच नव्हे तर परदेशातील देखील. म्हणूनच ह्या संथाली तरुणांना सुरेंद्रनाथ बॅनर्जींचा पुतळा ओळखता न येणं शक्य होतं. त्यांचा अंगुलीनिर्देश करणारा हात हा त्या तरुणांना लेनिनचाच हात भासला असला तर नवल नाही. मीही त्यांना वस्तुस्थिती सांगून त्यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला नाही. हे बरंच झालं. कदाचित् त्यांनी म्हटलं असतं – 'लेनिन आम्हाला ठाऊक आहे पण हे सुरेंद्रनाथ कोण? कुठले?'


●

## भूक निवारण : एक नवीन उपाययोजना

एक आशियन असेंब्ली अनेकविध विषयांवर चर्चा करीत असते. दुष्काळाचा विषयही तिने हाताळला. ही चर्चा मनोरंजक भासली. त्यातून असे निष्पन्न झाले की औद्योगिक कलाशास्त्राच्या (technology) साह्याने भूक निवारण हे सहज सोपे काम आहे. खताचा अभाव, निष्क्रियता आणि अज्ञान याच गोष्टी मुख्यतः प्रगतिपथावरील अडथळे असतात. एक सभासद तर म्हणाले की इतिहासावरून असे आढळते की शेतकीप्रधान देशातच नेहमी अन्नधान्याचा दुष्काळ पडत असतो. यावर उपाययोजनाही त्यांनी सुचवली. ते म्हणाले की विद्यापीठातील सर्व शिक्षण काही विशिष्ट काळ बंद ठेवून विद्यार्थ्यांना पिके काढण्याचे ऋतूत खेडयांमध्ये पाठवावे व त्यांच्याकडून शेतांवर काम करवून घ्यावे. शेतकऱ्यांनाही मदत होईल व अन्नधान्याचे अधिक प्रमाणात उत्पादन होऊ शकेल. अशा तऱ्हेचे प्रयोग काही पौर्वात्य देशांमध्ये करण्यात आले होते व त्यांचे परिणामही समाधानकारक आढळले. शेतकऱ्यांचे अनेक बाबतीतील अज्ञान दूर करण्याचे प्रयत्न करणेही त्यादृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

अगदी सुरुवातीला आळस नष्ट करणे आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या फसव्या कल्पना पुसून टाकणे असे मुळाशीच घाव घालणारे प्रयोग करावेत. भूक निवारणाचा प्रश्न सहज सुटू शकेल असे त्या सभासदांचे मत.

• • •



'जाएं पोरा, ह्या पाच पैशाचं गोलं हानून खा जा समद्यानी. ह्येच आपल्या गरीबाचं लाडू हो. जा पळ-'

## शेखर पाटील

---

पोयनाडच्या बाजारपेठेतून दोघं मायलेकरं बाहेर पडत होती. पोराच्या हातात सामानाची थैली नि आयेच्या डोक्यावर टोपली होती. त्या टोपलीत थोडेथोडके नव्हते. चांगले पाच-सात रुपायांचे सटरफटर सामान तिने खरेदी केले होते. एक मातीची ढापणी, एक तवी, चायची बुकी, गूळ, सुके बोंबील, आंबार सुकट नि झालेच तर थोरल्याच्या पायाला लावण्यासाठी खर्जीचे मलमसुद्धा घ्यायला ती विसरली नव्हती...

चालता चालता ती थांबली.टोपल्याखालची चुंबळ तिने सारखी केली नि लेकाला म्हणाली,

"चंद्या, आजून काय इसारला नाय नं ?"

"काय नाय-"

"झडया, नीट आठव कर न मंग सांग. आधोपरीच बोलू नको."

विचार न करता चटकन टाळ्याला जीभ लावणाऱ्या पोरावर ती डाफरली नि म्हणाली,

"थैलीन बाटल्या झेतल्यास नं ?"

"हां-"

"नीट बघ-?"

चालता चालताच त्याने थैलीत हात घातला. एक पाईंड रॉकेल, पाव किलो गोडातेल. आणि बायवच्या डोकीला लावण्यासाठी एक आण्याचा खोबरेल तेल. सुक्षेम होता.

"नीट हाय-"

"व्हल्लाबिल्लास तं लात मारीन हो."

"नाय-"

"मंग चल झपझप-"

पोरगा हातातली थैली सांभाळीत तिच्या पाठोपाठ चालू लागला. दोन पाऊल चाल्ला नि आठवल्यासारखा बोल्ला,

"आये, चायची बुकी झेतलीस ?"

"हां"

"नि पांढरे कांदची माल ?"

"ती पण घेतली."

"आनि गग्यादादचे खर्जीचा दवा?"

"त्या मी कसा इसरन रं माझे सोन्या ?"

" तरी एक इसारलीस ?"

" त्यां काय बा ?"

" बामाची बाटली ?"

तिने कौतुकाने त्याच्याकडे पाहिले... खरंच बामाची बाटली आपण विसरलो होतो का? रात्री लोकांच्या दळणावरून येताना हात दुखून यायचे, अंग फुटून निघायचे, हातापायांना वळ यायचे, त्यासाठी बाम बाम म्हणून आज कित्येक दिवस आपण घोकतो आहोत. पण काय करू? ह्या हौशीसाठी एक रुपाया कसा खर्च करू? त्या एक रुपायाचा थोरल्यासाठी मलम नाही का घेतला आपण?

त्याच्या प्रश्नाकडं दुर्लक्ष करून निमूटपणे ती चालू लागली. तसे त्याने फिरून एकदा तिला विचारले,

" आये, समदा झेतलास ?"

" हो माझे बाबा."

" आनि कायसुद्धे न्हाला माय ?"

" आनि काय न्हाला ?"

आयेनं स्वत:शीच विचार केला. पोरगा खोदून खोदून विचारतो आहे. तर काहीतरी घ्यायचे राहिले असणार निश्चित. तिने पुन्हा विचारले,

" चंद्या, आनि काय न्हालाए–"

" बघ, याद कर–"

पोरगा इतकंच बोलला नि टकमाक टकमाक आयेकडं पाहू लागला–त्याला वाटले, आयेला आता बाकी नक्की आठवेल. सकाळी घरातनी बाहेर पडताना आपण तिला बुंदीच्या लाडूची याद केली होती आणि ते घ्यायचे तिने कबूलही केले होते. पण सकाळधरनी ती सटारफटार घेत होती नि ते खरेदी करताना आपल्या बुंदीच्या लाडूची ती यादसुद्धा काढीत नव्हती. तेव्हा कदाचित आता...?

" आरं हो–!"

" काय त्यां?" पोराने आशाळभूतपणे विचारले आणि ओठावरून जीभ फिरवीत कान टवकारले.

" तरी एक इसारलूच–"

बुंदीचे लाडू. मनातल्या मनातच तो बोलला. नि लवाटेच्या होटेलमधल्या काचेच्या कपाटात ठेवलेल्या लाडूनकडं पाह्यत राहिला. आये म्हणाली,

" कायरं, कपरा घेतलास तो शिवाला टाकलास ?"

" नाय–"

" मंग चल आधी. टेलरचा दुकान सोध कसा ?"

असे म्हणून ती पुढे झाली. तळ्यावरल्या कासाराच्या दुकानावरनी आग्रवाल होटेलशेजारी उभी राहिली. नाकासमोर एक सुंदरसे दुकान होते. दुकानाच्या समोर आणि आतल्या भागात दोन्हीकडे काचेची कपाटे होती. त्या कपाटात रंगीबेरंगी झंपर, पोलक्यापासून चांगल्या चांगल्या खमीस पँटीची आरास केली होती.

" पोरा, ह्यो दुकान बघरं ?"

पोरानं मान वर केली. 'बबन टेलर्स' त्याने मनातल्या मनात पाटीवरली अक्षरे वाचली नि तो चटकन म्हणाला,

" आये, ह्याच हो तो दुकान."

पण पोराच्या प्रश्नाला उत्तर न

करता ती त्या काचबंद दुकानाकडे टकमक पाहात नुस्ती उभी राहिली. तिला वाटले, एवढ्या चांगल्या दुकानात आपल्या पोराचे कपडे कसे शिवून मिळतील? तिने हलकेच पोराकडं पाहिले.

"आये, हितंच कपडं शिवतान–"

"आसा?"

"हां जावया?"

ती गोंधळली. तसा आतला गजानन टेलर बाहेर आला. त्या दोघा मायलेकरांना न्याहाळून त्याने विचारले,

"कपडे शिवायचे आहेत?"

"हां."

"मग आत या ना?"

त्यांना धीर आला. टेलर खराच भला माणूस आहे हो, असे मनातल्या मनात पुटपुटत तिने पोराला दुकानात धाडले नि टोपलं घेऊन ती बाहेर उभी राहिली...दिवाळसण आसा पंधरवड्यावर आलेला. लोकांच्या पोरांच्या नवीन नग अंगावर चढलेले. त्यातून पोरगा एकाच खमिसाशी शाळेत जायचा. तेव्हा इकडचं तिकडं करून तिने चार पैसे गाठीला साठविले होते आणि लेकासाठी एक खमिसाचे कापड घेतले होते. ते एकदा शिवून मिळाले की, वरीस दीड वरोस बोलायला नको होते.

थोड्याच वेळाने पोरगा मेजर देऊन बाहेर आला. कोपऱ्यात ठेवलेली पिशवी त्याने उचलली.

"आये, जावया?"

"हा."

"काय घेवाचा नाय नं?

"आता काय?"

"काय इसाबिसारलेला?"

"काय नाय."

"काय नाय?"

"नाय चल"

त्याला वाटले; आता बाकी आयेला आपणहून सांगावेच. बुंदीचे लाडू तू कबूल केले होतेस... सकाळी निघताना बायवला सुद्धा तसे सांगितलेस...पण...

तोंड मिटून हूं का चूं न करता पोरगा तिच्या पाठोपाठ चालू लागला. त्याला ठाऊक होते. बाबा असताना आपल्याला गोडधोड मिळायचे; पण गेल्या सालीच बाबा वारला. आम्ही उघडे पडलो. आता कसे जगावे हा एकच प्रश्न आमच्या आयेला छळू लागला. मग एका रात्री तिने आम्हाला सांगितले...पोरानो, आता आपण गरीब झाले आहोत. यापुढे तुम्ही कसला हट्ट धरू नका. मला छळू नका. नाहीतर तुमच्या बापासारखी मी पण कंटाळेन. तुम्हाला सोडून निघून जायेन...

आये सोडून गेली तर आम्हाला दुसरी आयं कुठली? या विचारासरशी पोरगा घाबरला. लाडवाचा हट्ट त्याने मनातून काढून टाकला नि मोन्यानीच तो तिच्या पाठपाठ घराची वाट तुडवू लागला...

श्रीगावची नदी पार करून दोघं मायलेकरं सडकेवर आली. डोक्यावरल्या ओझ्यानी तिची मान ताठरली होती. चोळी घामानं भिजली होती. टोपल्याला धरलेल्या हातांना फूट लागली होती. तेव्हा कुठल्यातरी वाकणा-

वर आता टेकायला हवेच होते. असे म्हणता म्हणाताच गाव आला नि घटका भरातच तो खळचात उतरली.

बायव तिचीच वाट पाहात दारात उभी होती. तिला पाहाताच दुडूदुडू धावत ती अध्र्यावरच तिला बिलगायला आली. तसे पोराने तिला कसेबसे उचलून घेतले.

"दादा...दादा..."

"काय गं?"

"लाडू कुठं हाईत? लाडू?"

"ते...बघ आयेचे टोपलीत—"

असे म्हणून चटकन् त्याने तिला घरात आणले. थोरल्याने आयेच्या टोपल्याला हात लावल. आयेनं टोपला जमिनीवर उतरला. तशी टक धरून सारी पोरें त्या टोपल्याभोवती बसून राहिली. आये एक एक जिन्नस टोपल्यातून बाहेर काढीत होती आणि पोरं टक लावून बघत होती. लाडूंची पुडी येतेय तरी कधी?

पण टोपलं रिकामं झालं तरी लाडू बाहेर पडले नाहीत. तेव्हा न राहवून बायवने विचारले.

"आये, बुंदीचं लाडू?"

"लाडू?" आये गांगरली तसा चंद्या चटकन उठला. बायवला जवळ घेत म्हणाला.

"बायव, बायव; लाडूनं कावळचानी नेलं भुऽर्रऽऽ नाय ग आये?"

"हा—"

त्याच्या प्रश्नाला कसाबसा आसवांचा हुंकार भरून तिने चटकन त्याला जवळ ओढले नि त्याच्या केस नसलेल्या डोक्यावरून हात फिरवीत ती तशीच बसून राहिली...बाबारे तुमचा बापूस आज जिता असता तर तुमच्यावर ही वेळ येती का? मी एकटी बाई-माणूस कुठवर म्हणून पुरी पडू? कुठवर म्हणून हा भार मी एकटी सांभाळू? बाबारे ह्या दारिद्रयात तुम्हाला खितपत ठेवण्याची मला का हौस आहे? पण काय करू मी? एखाद्या बाप्या माणसासारखी तुमचा हा भार मी सांभाळते आहे. तुमच्या एवेब्यारेब्या ओढते आहे त्या उगीच? मघाशी तुझ्या खोदून खोदून बोलण्याचा रोख मी ओळखला पण काय? काय करू मी? त्यावेळी खरेदी संपून माझ्या गाठीला फक्त पाच पैसे उरले होते. ह्या असल्या महागाईच्या दिसात या पाच पैशाचा लाडू कोण देइल?

तिने चटकन डोळचातली आसवे पुसली. कमरेच्या पदराची गाठ सोडली. आणि उरलेले पाच पैसे धाकटयाच्या हातावर देऊन ती म्हणाली.

"जारं पोरा, ह्या पाच पैशाचं गोळं हानून खा जा सयद्यानी. हचेच आपल्या गरीबाचं लाडू हो, जा पळ—

• • •



चालू लेखमाला

जबानी चौथी । शेवटची
हप्ता आठवा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

# मी नेताजींना बघितलंय

आम्हीपण सोळा मार्चला गेलो होतो. ताउगजिन टापूत 'ए' कंपनीनं नालाइंग नावाच्या एका गावात तळ ठोकला होता. अन् आमची 'बी' कंपनी ग्यानसिंगच्या नेतृत्वाखाली उत्तरेला अन् पूर्वेला सरकली होती.

आकरा वाजायच्या सुमाराला शत्रुपक्षानं वायव्येकडन आमच्याकडे तोफांचा मारा सुरू केला. अन् तोफांचा भडिमार संपल्या संपल्या एक प्लॅटूनभर गुरखे लॉरीतन तिथं आले. झाडाझुडपांच्या आड दडून ते आमच्यावर गोळ्या झाडत राहचले.

आम्हीपण तात्काळ आत्मसंरक्षणाकरता व्यूह रचून शत्रूच्या हल्ल्याचा मुकाबला करायला लागलो. परिस्थिती काय आहे हे बटालियन कमांडरच्या लक्षात आलं. लगेच लेफ्टनंट दित्रूरामच्या हाताखाली काही सैनिक देऊन त्यांना ह्या गुरखा पलटणीवर मागच्या बाजूनं हल्ला करण्याकरता त्यांनी पाठवून दिलं.

शादी टेकडीच्या लढाईत आपला पराभव झालाय् ही बातमी एव्हाना शत्रूच्या हेटक्वार्टर्समध्ये पोचली होती. त्याच्यामुळं त्यांच्या कमांडरनं न्यांगूहून एक जबरदस्त तुकडी पाठवून दिली आमचा समाचार घेण्याकरता. दुर्बिणी-तनं आम्ही पाहृयलं--न्यांगू ताउगजिन रस्त्यावरनं ही पोलादी राक्षसांची तुकडी पुढपुढं येतेय्. पंधरा रणगाडे, अकरा आर्मर्ड कार्स अन् दहा ट्रक्स् !

रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोकळं मैदान पसरलेलं झाडाझुडपांच्याआड दडून आम्ही एकमेकांवर गोळ्या झाडतोय् !

पण रणगाडे सरळ आमच्याचवर चाल करून येत होते. रायफलींनी किंवा संगिनींनी त्यांची आगेकूच रोखता येणं शक्यच नव्हतं.

मोकळ्या मैदानावरचं ठाणं उठवून नालाइंग गावाच्या पिछाडीला आसरा घ्यायचा हुकूम ग्यानसिंगनी दिला.

लगेच आम्ही धावतपळत नालाइंग गावात घुसलो. रिकामी पडलेली मातीची घरं. आम्ही सगळे एकाच जागी जमा न होता ठिकठिकाणी विखरून राहृयली. पण प्लॅटूननं बांबूच्या बनामागं आसरा घेतला. काही लोक कोरड्या पडलेल्या तळ्याच्या उभ्या कांठाच्या मागं लपले.

रणगाडे चालवणाऱ्यांची आमच्या-वर बरोब्बर नजर होती. तोंड वळवून ते पण नालाइंग गावाकडे येत राहृयले. आर्मर्ड कार्स पण रस्ता सोडून शेतात उतरल्या. दहा ट्रक्सनी मात्र रस्ता सोडला नाही. ते सडकेवरच उभे राहृयले वाट बघत.

काय भयंकर संकट समोर उभं राहृयलं हे आम्हाला कळून चुकलं होतं.

ह्याचवेळी एक घटना घडली ! त्यामुळं परिस्थिती आम्हाला थोडीफार अनुकूल झाली. शादी टेकडीच्या माथ्या-वरनं एकाचवेळी तीनचार तोफा गरजून उठल्या. अन् त्यातला एक गोळा सरळ रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रकवर येऊन आदळला. आग भडकून तो ट्रक जळायला लागला. खान महंमदनी लढाई फत्ते केलयाय् हे आम्हाला तेव्हा कळल ! म्हणजे शादी टेकडी आमच्या ताब्यात आहे !

रस्त्यावरच्या ट्रक्समधलं गुरखा सैन्य उड्या मारून रस्त्यावर उतरलं. ही संधी काही 'ए' आमच्या कंपनीतल्या मंडळींनं हातची सोडली नाही. गुरख्यांनी पोझिशन घ्यायच्या आतच त्यांच्या गोळ्यांचा वर्षाव झाला. बरेचसे गुरखा सैनिक जमिनीवर कोसळले.

ह्या धांदलीचा फायदा घेऊन त्यांच्यावर चालून जायचा हुकूम दिला लेफ्टनंट कर्तारसिंगनं. तो 'ए' कंपनीचा कमांडर होता. सबंध 'ए' कंपनीनं संगिनी उंचावून चार्ज केला.

गुरखा पलटण आधीच अस्ताव्यस्त झाली होती. संघटितपणानं हल्ला थोपविता आला नाही त्यांना. कुणी-कुणी गोळ्या झाडल्या. पण त्यांच्यातले बरेचजण जखमी होऊन नाहीतर मरून रस्त्यावर आडवे झाले. अधिकांश गुरखा सैन्य पागान-न्यांगूच्या रोखानं पळून गेलं.

आमचे काही लोक उरलेल्या ट्रक-मध्ये चढून ट्रकसकट पोपा हेडक्वार्टर्स-कडे जाताना आम्ही बघितले.

ह्या सगळ्या प्रकाराकडे रणगाड्यांची पाठ होती. मागं काय होतंय् त्याच्या-कडे त्यांनी लक्षच दिलं नाही. बिनधास्त ते नालाइंग गावाकडे येत राह्यले.

दरम्यान आम्ही पण तयारच राह्यलो होतो. ग्यानसिंगनं मर्दुमकीनं एकामागो-माग एक दोन माइन्स फेकल्यां ह्या रणगाड्यांच्यावर ! आमचं दुर्दैव असं की त्यातली एकपण माइन फुटली नाही !

मेजर-जनरल शहानवाजखाननी आपल्या आठवणीत लिहून ठेवलंय्--

'आपली असहाय्य अवस्था सेकंड लेफ्टनंट ग्यानसिंगच्या ध्यानात आली होती. रायफलींनी काही ह्या यांत्रिक राक्षसांना अडवता यायचं नाही. राय-फली चालवून ह्यांचं लोखंडी चिलखत तोडता पण यायचं नाही.'

'तेव्हा त्यांनी 'चार्ज !' म्हणून हुकूम दिला. ते स्वतःही सुरक्षित आसरा सोडून बाहेर आले. 'नेताजी की जय !' म्हणून आरोळी ठोकली त्यांनी ! लगेच झाडाझुडपांच्या मागनं मृत्युंजयी सैनिकांची टोळी बाहेर आली रायफली-वर संगिनी चढवून ! त्यांच्या 'इन्कि-लाब झिंदाबाद' न् 'आझाद हिंद झिंदा-बाद' ह्या आरोळ्यांनी टँकचा आवाज-पण बुडवून टाकला.' निश्चित मृत्यु-मुखात ते चाल करून गेले. रण-गाड्यांच्या गरजण्यानं कोण कोण जमिनीवर पडले, तेही कुणी बघितलं नाही !

'सगळ्यांनी हल्ला चढवला आर्मर्ड फोर्सवर हातघाईवर येऊन. नाईलाजानं गुरख्यांना खाली उतरावं लागलं अन् हातघाईची लढाई सुरू झाली !'

एव्हाना रणगाडे गावात येऊन पोचले होते. अचानक लगतच्या झोपड्या जळायला लागल्या. रणगाडे ह्या जळत्या झोपड्यांच्या मध्ये सापडले होते.

ही लढाई दोन तास चालली होती. आमचे चाळीस सैनिक कामाला आले ह्या लढाईत. शत्रूचंपण नुकसान फार झालं. शेवटी लढायचा आमचा खंबीर-पणा बघून शत्रू रणांगण सोडून पळून गेला !

ही लढाई जिंकल्याचं सगळं कर्तृत्व लेफ्टनंट ग्यानसिंगचं होतं. लढाईतली माझी कामगिरी अगदीच क्षुल्लक होती.

आमचे सगळे सैनिक ग्यानसिंगच्या नेतृत्वाखाली चाल करून गेले आर्मर्ड फोर्सवर, तेव्हा मीपण नेताजींचा जय-जयकार करत त्यांच्यामागोमाग धावलो होतो.

गाड्यातनं भराभर उड्या मारत गुरखे उभे रहात होते आमच्यासमोर.

पण मी काही हाडाचा लढवय्या नव्हतोच ना ! मोटारगाड्यांच्या दुरु-स्तीचा धंदा आमचा जन्मजात ! रिकाम्या ट्रक्सपैकी शेवटच्या गाडीतले पेट्रोलचे डबे दिसले मला ! मग लढाईत काहीच भाग घेतला नाही मी ! दणा-दण हे पेट्रोलचे डबे मी फेकून मारत होतो ट्रक्सवर न् आर्मर्ड फोर्सवर ! माझ्या दोन्ही कानांच्या लगतनं सू-सू करीत गोळ्या जात होत्या ! पण

ढंगात आल्यासारखा मी आपला पेट्रोलचे कॅन्स फेकतच राह्यलो.

मग फक्त एक बारीकसं कामच तेवढं बाकी होतं. काडी ओढायचं ! पण मी पडलो शीख ! मी काही सिग्रेट ओढतच नाही ! त्यामुळं माझ्याकडे काड्यापेटी नव्हती. पण माझ्या मनातली गोष्ट ओळखली होती जीवनलालनं !

तो म्हणाला--आप तो कमाल कर चुके सरदारजी ! अब देखिये मेरी दिवाली की रोशनाई !

ह्या यज्ञात पूर्णाहुती दिली जीवनलालनं ! निव्वळ एक काडी ओढून !

दोन तासांनी त्यांनी लढाईतनं पळ काढला. त्यांचे दोन रणगाडे जळून खाक झाले होते. बाकीचे परत फिरले पळून जाणाऱ्या सैनिकांना बचावत.

लेफ्टनंट ग्यानसिगनी आनंदानं मला मिठी मारली. म्हणाले--ही युक्ती तुम्हाला सुचली नसती तर रणगाड्यांच्यासमोर आपला टिकाव लागला नसता.

आमच्या आजूबाजूला गुरखा सैनिकांची प्रेतं पडली होती. कुणीकुणी विव्हळत होतं. ग्यानसिग तिसऱ्या प्लॅटूनला काही सूचना देत होते. एवढ्यात एक भयंकर घटना घडली !

एक गुरखा सैनिक ग्यानसिगच्या पायाशीच पडलेला होता आमच्या कंपनीच्या कमांडरला ओळखलं त्यानं. कसातरी कोपरावर भार देऊन तो उठून बसला. आमच्यापैकी कुणाचंच लक्ष नव्हतं .अन् अचानक त्याच्या हातातली रायफल गरजून उठली ! ग्यानसिगच्या डोक्याला गोळी लागली. पडले ते परत काही उठले नाहीत.

'सेकंड लेफ्टनंट ग्यानसिंग बिशत




आपल्या सैनिकांना म्हणायचे—मी पण प्राण वेचेन रणांगणात तुमच्याबरोबर! अशाप्रकारे त्यांनी आपला शब्द राखला. जीवन मरणात ते आपल्या सैनिकांचे राह्यले!'

पण असं आमच्या प्रत्येक लढाईचं वर्णन देत बसलो तर ही गोष्ट कधीच संपायची नाही. मार्च महिन्यात न् एप्रिलच्या पहिल्या आठवडयात आम्ही जवळजवळ रोजच लढत होतो. वेगवेगळच आघाडयांवर.

काब्यू आघाडीवर कॅप्टन बागडींच्या नेतृत्वाखाली जी लढाई झाली, ती जगातल्या प्रचंड शौर्यपूर्ण लढायात गणना होण्याजोगी होती. अन् आमच्या साथीला होते जपानच्या 'खान-जो-बुताई' ब्रिगेडचे दीडशे जपानी सैनिक. ह्या साडेतीनशे सैनिकांनी लढत घेतली होती शत्रूच्या एक हजार सैनिकांशी. शत्रूकडे निव्वळ मध्यमच नाही पण शेरमन न् चर्चहिलसारखे भारी रणगाडेपण होते. तीस मार्चची ही लढाई कायमच लक्षात राहण्याजोगी होती.

एक न् दोन एप्रिलला लढाई झाली लेगो गावात. ह्या लढाईतपण लेफ्टनंट कन्वलसिंग, हवालदार अब्दुल मान्नान न् लेफ्टनंट गंगासिंगनं बेहद्द शौर्य गाजवलं.

पण हलकेहलके आम्हाला कळून येत चालल होतं की, निव्वळ शौर्यानं, निव्वळ देशप्रेमानं लढाई जिंकता येत नाही. शत्रूकडे कायम पुढारलेली युद्धसामग्री येत होती. एव्हाना शेरमन न् चर्चहिलसारखे अवजड रणगाडेदेखील इरावती ओलांडून पोपा आघाडीवर येऊन दाखल झाले होते. छत्रीधारी सैनिकांच्या तुकडया वाढल्या होत्या.

पण तरी आम्ही धीर सोडला नव्हता. पण शत्रूपक्षाकडल्या भारी युद्धसरंजामापेक्षाही मोठ्ठं दुर्दैव आमच्या छावण्यातनंच दिसून यायला लागल

रियाज, मदन, शर्वर न् दे ह्यांनी जो वाट दाखवून दिली होती, त्याच वाटेनं आमचा सर्वनाश ओढवला!

तेव्हापास्नं जवळपास रोजच कुणीनाकुणी पळून जायला लागलं. हो, सत्याची बूज राखण्याकरता हेही प्रांजळपणानं कबूल करायलाच पाहृयजे.

ह्या दोन एप्रिलला काब्यू आघाडीवर कॅप्टन बागडींनी जसं मृत्युंजयी शौर्य गाजवलं, तसं ह्या दोन एप्रिललाच कर्नल सैगलच्या तुकडीतले विश्वासू तीन सैनिक—यासीन, शाहीद न् गालिबसिंग--शत्रुपक्षाला जाऊन मिळाले! हे तिघंही जण रँकनं लेफ्टनंट होते! पण एवढयानं काय होतय्—ह्या दोन एप्रिललाच कर्नल धीलनच्या विश्वासांतले ब्रिगेड कमांडर कॅप्टन महंमद हुसेन आपल्या अॅडज्यूटंटसकट रात्रीच्या अंधारात शत्रूच्या छावणीकडे पळून गेले!

तरीदेखील आमचा धीर सुटला नव्हता, हे फिर्यादी पक्षानं लालकिल्ल्यांतल्या खटल्यात दाखल केलेल्या एका कागदावरनंच स्पष्ट होतं.

Exhibit DDDD.

No. D. 5, dated 2 nd April 1945

To : Col. Shah Nawaz Khan
From : Lt. Col. G. S. Dhillon

Capt. Md. Hussain 's absence has not affected the spirit or morale of the troops at all. we are prepared to continue fighting in the front line. No need of rest unless objectjve is achieved. We will sacrifice our lives to maintain the honour of Azad Hind Fouj. Water or no water, rations or no rations will not affect our fighting capacity. Captain chander Bhan, Lt Khan Mohammed and Lt. Kartar Singh along with my staff join me in assuring you that we will fight up to the last. Jai Hind.

Sd/- G. S. Dhillon, Lt.-Col.
Commander, 450 Unit, A. H. F.

Time 2105 hrs.

ह्याच्यावर काहीच टिप्पणी करणार नाही मी. माझी फक्त एकच विनंती आहे तुम्हाला. एक लक्षात ठेवा की हे पत्र काही कुणा साहित्यिकानं घटना घडून गेल्यावर सजवून-बिजवून लिहिलेलं नाही. हे पत्र दोन एप्रिलला रात्री नऊ वाजून पाच मिनिटांनी रणांगणातनंच लिहिली गेलीयत. खान महंमद, कर्तारसिंग न् आमच्यातर्फे लेफ्टनंट-कर्नल धीलननी जेव्हा असं लिहिलं की—पाणी मिळो न मिळो, खायला मिळो न मिळो, आम्ही आमरण लढतच राहू—तेव्हा ते पुरत्या जबाबदारीनंच लिहित होते—हे काही नुस्तं उड्या मारणं नव्हत, तसा ठाम विश्वास होता !

अन् ह्या पत्राच्या खरेपणाबद्दलदेखील एवढासुद्धा संशय नाही. कारण न्यायालयात हे पत्र पेश केलं होतं फिर्यादी पक्षान. खुद्द अॅडव्होकेट-जनरल सर एम. पी. एंजिनीयरनी दाखल केलं होतं ते.

पण ह्या दोन एप्रिललाच काही सगळं संपून गेलं नाही. चार एप्रिलला परत एक बटालियन कमांडर कॅप्टन अमीनशहा आपल्या अॅडज्यूटंटसकट शत्रूला जाऊन मिळाले.

एप्रिलच्या सहा तारखेला बातमी आली की ब्रिटिशांनी आणखी पन्नास रणगाडे ह्या रणांगणात उतरवलेयत म्हणून. त्यांच्या सडकेनं ते आगेकूच करतायत.

पोपा रणांगण सोडून देऊन माघार घेण्याचा हुकूम आम्हाला दहा एप्रिलला मिळाला. ह्याच दिवशी शत्रूच्या पस्तीस विमानांनी आमच्या डिव्हिजनल हेड-क्वार्टर्सच्या इस्पितळावर अखंड बाँब-फेक केली. इस्पितळातले खूपच रोगी न् जखमी सैनिक ह्यात मरण पावले. ह्या इस्पितळावर इतक्या दिवसांत एकदाही हल्ला झाला नव्हता. कारण वरनं हे अजिबातच दिसायचं नाही. म्हंजे आम्हाला सोडून गेलेल्या विश्वास-घातक्यांनीच इस्पितळाची जागा शत्रूला सांगितली असली पाहिजे हे उघड

होतं. अन्वर त्यादिवशी दातओठ खाऊन म्हणाला—नाही. दोस्त ! आता कोर्ट-मार्शल नाही, स्वतंत्र भारतात हे दिसल्यादिसल्या ह्यांना गोळीनं उडवीन मी !

मी अन्वरला म्हणालो -- आधी लढाई तर थांबू दे ! अन् आपण जिवंत असायला पाह्यजे. मग ह्या रियाज मदन शर्वर-दे-महंमद हुसेनकडे बघून घेऊ !

अन्वर म्हणाला—का म्हणून ? तू मरून जाशील कदाचित्, मी पण जिवंत राहणार नाही, पण आझाद हिंद सेनेचे हे पन्नास हजार सैनिक तर सगळे मरून जात नाहीत ! अन् समज तेही मरून गेलेच, तरी आझाद हिंदचे अडतीस कोटी लोक तरी नक्कीच मरणार नाहीत ! बदला आपण घेऊच घेऊ !

बारा एप्रिलला आम्ही पोपा सोडलं. रात्री दोन वाजता. काउकपाडांगचा रस्ता थोडासा गेल्यावर दिसलं -- टेहळणी करणाऱ्या तुकडीनं रस्ता बंद केलाय !

सगळ्यात पुढच्या तुकडीच्या गार्ड कमांडरनं चार नंबर गोरिला रेजिमेंटच्या कॅप्टन खान महंमदना बोलावलं. त्यांना हुकूम सुटला—निवडक सैनिक घेऊन शत्रूच्या फळीत फट पाडून घ्या. त्यातनं आपलं सगळं सैन्य पलीकडे जाईल.

खान महंमदनी ही असाध्य गोष्टपण करून दाखवली. रात्र संपायच्या आत आम्ही शत्रूच्या फळीच्या ह्या फटीतनं इंदोवाक्की टापूत पोचलो.

पण सबंध सैन्य एकाच दिवसात मागं घेणं शक्यच नव्हतं. त्यामुळं कॅप्टन बागडींच्या नेतृत्वाखाली तीन नंबर बटालियन पोप्यांतच ठेवली. बाकीच्या तुकड्यांची माघार घेण्याची सोय करायची न् पोपा हेडक्वार्टर्स रिकामं होईपर्यंत त्याचं रक्षण करायचं अशी कामगिरी त्यांच्यावर सोपवली. कॅप्टन बागडींची न् आमची तीच शेवटची भेट. माझ्या अजून लक्षात आहे, निरोप घ्यायच्या वेळी माझा हात हातात घेऊन जोरात हलवत ते म्हणाले होते— फिर मिलूंगा !

कॅप्टन बागडी न् खान महमद हे हाडाचे वीर होते. माणूस म्हणूनही ह्या दोघांनी माझ्या मनावर चांगलीच छाप पाडली होती. आजदेखील डोळे मिटले की कॅप्टन बागडींचा तो हसतमुख चेहरा मला स्पष्ट दिसतो. पोपा लढवताना वीस एप्रिलला ह्या महान् योद्धयानं देशाकरता प्राण वेचला-- हे मला नंतर शहानवाजखानच्या आठवणी वाचल्यावर कळलं. माझा हात धरून 'फिर मिलूंगा' म्हटल्यानंतर आठवड्याभरानचं ते युद्धात पडले. त्यांचा मृत्यु काही मी स्वतःच्या डोळ्यांनी बघितला नाही. पण शहानवाजच्या आठवणीत वाचलं —

'वीस एप्रिलच्या सुमाराला एक दिवस कॅप्टन बागडींची तुकडी ख्वानडुंगीच्या पासनं वीसेक मैलांवर टेहळणी करत फिरत होती. अचानक शत्रूच्या काही रणगाड्यांनी ह्या तुकडीला घेरून टाकलं.'

'बागडींनी पाह्यलं – चोहीकडे

मोकळा माळ. पहाऱ्यावरच्या सैनिकांनी येऊन बातमी दिली की दोन्ही बाजूंनी रणगाडे येतायत.'

'ह्या रणगाड्यांशी लढत घेण्याजोगी काहीच शस्त्रसामुग्री बागडींच्याकडे नव्हती. त्यांच्यासमोर फक्त दोनच मार्ग होते--- एक म्हजे शरण जाणं किंवा मग मरेपर्यंत लढत राहणं. मान नाहीतर प्राण -- काहीतरी एक सोडावं लागणारच होतं.'

'ताबडतोब तुकडीतल्या सगळ्यांना बोलावून घेऊन कॅप्टन बागडींनी त्यांना परिस्थिती समजावून सांगितली व म्हणाले--- 'तर बोला, आता काय करणार आहात तुम्ही ?'

'ते म्हणाले--- आम्ही का म्हणून सांगू सर ? तुम्ही हुकूम द्या !'

'कॅप्टन बागडींनी मान हलवली. ते म्हणाले--- नाही ! लढाई जिंकायची काडीइतकी शक्यता नसताना मी काय म्हणून आदेश द्यायला जाऊ ? इथं लढायचा अर्थ एकच --शहीद होणं !

'सैनिकांनी विचारलं--- तुम्ही काय करणारहात ?

'---मी ? मी काहीच हूकूम देणार नाही ! फक्त एक उदाहरण ठेवून जाईन तुमच्यासमोर !'

'असं म्हणून लगेच ते दोन हातात दोन बाँब घेऊन धावत गेले समोरच्या रणगाड्याकडे ! झेप घेतली त्यांनी रणगाड्याच्या तोफेवर. दोन्ही बाँब्जच्या स्फोटानं रणगाडा उलटून पडला.

'डोळ्यासमोर हे घडताना बघितल्यावर मग काहीच दुविधा राह्यली नाही बाकीच्या सैनिकांच्या मनात ! शेवटचा सैनिक जमिनीवर कोसळेपर्यंत ते पेट्रोल भरलेल्या बाटल्या न् हातबाँब भिरकावत राह्यले रणगाड्यांच्यावर !

'ह्या लढाईत ब्रिटिशांचे दोन रणगाडे न् काही आर्मर्ड कार्स उद्ध्वस्त होऊन गेल्या.'

त्यांचा हा लढायचा निष्फळ प्रयत्न न् स्वतःचा जीव बचावण्याबद्दल संपूर्ण बेफिकिरी बघून ब्रिटिश आधिकारी आश्चर्यानं थक्क होऊन गेले होते.

मिकटिल्यावरनं परतायचा रस्तापण आता बंद होऊन गेला होता. ब्रिटिश सैन्य मिकटिला-प्यिमाना करत एव्हांना टोंगूच्याजवळ पोचलं होतं. नेताजी रंगूनमधे होते. ब्रिटिश सैन्य टोंगूच्या जवळपास होतं.

मग नाइलाजानं आम्ही दिशा बदलली. दक्षिणेला जाणं बंद केलं. इरावती नदी ओलांडून नदीच्या पश्चिम काठाला आलो. एकोणीस एप्रिलच्या मध्यरात्री. लांबलचक वळसा घेऊन 'मिनबू'वरनं प्रोमला जायचा प्रयत्न करत होतो आम्ही.

दहा दिवस आम्ही घनदाट जंगलातनं चालत राह्यलो. आमचे म्होरके होते डिव्हिजनल कमांडर कर्नल शहानवाजखान. आमच्याबरोबर डिव्हिजनल हेडक्वार्टर्सचे सगळे आधिकारी --- म्हंजे कर्नल रॉडरिग्ज, मेजर जागीरसिंग, रामस्वरूप, मेहरदास, ए. बी. सिंग, कर्नल जी. एस. धील्लन. शिवाय खालच्या रँकचे पन्नासेक अधिकारी. खान महंमद, अन्वर न् मी तर होतोच.

आम्ही एकूण पाचशेजण होतो. पैकी कर्नल धील्लन तेव्हा अॅपेंडिसायटिसनं भयंकर आजारी होते. इस्पितळांत ऑपरेशन करायची काही सोयच नव्हती. पोटात इतकं दुखत असताना-देखील त्यांना ब्रह्मदेशच्या घनदाट जंगलातल्या वाटेने लपतछपत पायी चालावं लागतंय्.

एक मे. आम्ही प्रोमच्या उत्तरेला पाचेक मैलावर असलेल्या एका गावात पोचलो. तिथं कळलं की प्रोममधनं माणसं न् सामानसुमान हलवून जपानी लोकांनी शहर पेटवून दिलंय् म्हणून. आणखी असंही कळलं की जवळपास आठदहा दिवसापूर्वीच नेताजी राणी-वाहिनीतल्या मुलींना बरोबर घेऊन मौलमीनकडं गेलेयत. त्यांच्याबरोबर भोसलेजी, अय्यरसाहेब, मेजर-जनरल चतर्जी वगैरे आहेत म्हणे.

सुभद्रा जयस्वाल मेमिओ इस्पितळ हटवल्यावर रंगूनलाच गेली होती असं मला कळलं होतं. रंगूनहून दोनेक महिन्यामागं तिचं एक पत्र पण आलं होतं मी मिकटिल्याला असताना. नंतर काहीच खबर मिळाली नाही.

प्रोमला आल्यावर बऱ्याच बातम्या कळल्या. एव्हांना ब्रिटिश सैन्य टोंगूत येऊन पोचलंय्. टोंगू आता ब्रिटिशांच्या कब्ज्यांत आहे. रंगूनहून जपाननं आपली माणसं न् मौल्यवान सामानसुमान जितकं हलवता आलं ते हलवून टाकलेलं आहे.

शिवाय आणखीएक हृदयविदारक बातमी कळली--रंगूनमधल्या आझाद हिंद सेनेच्या सगळ्यांना शरण जायचा हुकूम देऊन नेताजी निघन गेलेयत्।

पहिल्यांदा काही शहानवाजखानचा ह्या गोष्टीवर विश्वास बसेना. पण प्रोममधल्या आमच्या एका अधिकाऱ्यानं हे दोन्ही हुकुमनामेच दाखवले. आम्ही-पण ते बघितले.

एका हुकुमनाम्यात नेताजींनी ब्रह्म-देशातल्या जनतेचे आभार मानले होते त्यांनी केलेल्या मदतीबद्दल. अन् दुसऱ्या हुकुमनाम्यात आझाद हिंद सेनेच्या सगळ्यांना आत्मसर्पण करायचा आदेश दिला होता हुकुमनाम्यांवर तारीख होती तेवीस एप्रिल.

शिवाय रंगून सोडून जायच्याआधी नेताजींनी सैन्यातल्या प्रत्येकाला एका रँकचं प्रमोशन दिलं होतं. आमचे कर्णधार शहानवाजखान आता कर्नल नव्हते, ते मेजर-जनरल झाले होते. मी न अन्वर दोघंही कॅप्टन झालो होतो.

पण ह्या प्रमोशननं कुणी खूष झालं नाही.

मेजर-जनरल शहानवाजखाननी सगळ्या अधिकाऱ्यांना एकत्र बोलावलं.

ते म्हणाले--नेताजींचा हा आदेश रंगूनमधल्या सैन्याकरता आहे. हा आदेश आपण मानायलाच पाह्यजे असं काही नाही. माझा अजून असा दृढ संकल्प आहे की, आपण सगळेच नेताजींच्याकडे जायचा प्रयत्न करू या. अन् वाटेतले शत्रूचे सगळे अडथळे मोडून काढू या. पण ही गोष्ट मला तुमच्या इच्छविरुद्ध करायची नाही. तेव्हा तुमच्या काय मनात आहे ते तुम्ही मला सांगा.

आत्मसमर्पण करायला आम्हीपण तयार नाही असं आम्ही सगळ्यांनीच एका आवाजात सांगितलं. नेताजींच्याकडे जाऊन पोचावं अशीच आमचीपण इच्छा होती.

नेताजी एवढ्यात मौलमीनला पोचल्याची बातमी आम्हाला लागली.

आम्ही इतके दिवस रानावनात होतो. त्यामुळं परिस्थितीचं गांभीर्य आम्हाला नेमकं उमजलं नव्हतं. आम्हाला शंका होती त्याच्यापेक्षा परिस्थिती जास्ती गंभीर आहे असं आता ध्यानात आलं; पण तरी ब्रिटिशांच्यासमोर शरणागती पत्करण्यापेक्षा मरेपर्यंत लढायचीच आमची तयारी आहे, असं आम्ही सगळ्यांनी सांगितलं.

मेजर-जनरल म्हणाले—ते अर्थातच शक्य नाही. कारण आपल्यात बरेचजण आजारी आहेत, जखमी आहेत. त्यांना मौलमीनपर्यंत जाणं शक्यच नाही. तेव्हा अशा मंडळींना एकत्र करून कालाबस्ती गावात आपण ठेवून देऊ या. त्यांची देखभाल करण्याकरता दोन ऑफिसर्सपण इथं राहतील. ब्रिटिश सैन्य इथं आल्यावर त्यांनी काही विरोध न करता आत्मसमर्पण करावं. इंफाळहून परतताना जे भयंकर दृश्य मी बघितलंय, त्याचीच पुनरावृत्ती मी होऊ देणार नाही !

ही गोष्ट आम्हाला सगळ्यांनाच पटली. कारण खरोखरीच ह्या मंडळींना घेऊन मौलमीनला जाणं अशक्य होतं.

शहानवाजखाननी विचारलं—तर मग कोण दोन ऑफिसर्स स्वेच्छेनं ही जबाबदारी अंगावर घ्यायला तयार आहेत ?

कुणीच पुढं आलं नाही.

एवढ्या दुःखातही शहानवाजखान हसले.

म्हणाले—आत्तापर्यंत जेव्हा जेव्हा एखाद्या धाडसी मोहिमेकरता मी स्वयंसेवक मागितले, तेव्हा तेव्हा तुम्ही स्वेच्छेनं पुढं आलात. पण आज कुणीच ही जबाबदारी घेत नाहीय् ! अर्थात् त्यामुळं काही आपला प्रश्न सुटत नाहीच. तेव्हा आपल्यासमोर दोन उपाय आहेत—एक म्हंजे चिठ्ठ्या टाकायच्या किंवा मग माझी निवड मान्य करायची.

मेजर जागीरसिंग म्हणाले—चिठ्ठ्या टाकायची काय जरूर आहे? तुम्ही सेनापती आहात ! तुम्ही ज्याला आदेश द्याल तो हा आत्मसमर्पणाचा आदेश मानेलच !

—ठीक आहे ! कर्नल रॉडरिग्ज न् मेजर रंगनाथन !

दोघाही अधिकाऱ्यांनी सॅल्यूट केला. त्यांचे चेहरे म्लान होऊन गेले होते.

उरलेलं सैन्य घेऊन सेनापती मेच्या एका तारखेलाच रात्री निघाले. प्रोम सोडून पूर्वेला. आजारी-जखमी सैनिकांनी डोळ्यात पाणी आणून आम्हाला निरोप दिला. कर्नल रॉडरिग्जनी शहानवाज़खानशी शेकहँड केला.

ते म्हणाले—काही काळजी करू नका. आझाद हिंद सेनेच्या मानाला एवढासुद्धा धक्का लागू देणार नाही !

मेजर रंगनाथन् आणखीनच थोड-क्यात नुस्तं ' जयहिंद ' म्हणाले !

प्रोमच्या दक्षिणेला अजून शत्रू आला नव्हता. त्यामुळं प्रोमहून रंगूनला जाणारा रस्ता धरून आम्ही चालत राहृचलो. आम्ही आता एकूण तीनशे लोक होतो. गाड्याबिड्या सगळ्या जपानी लोक घेऊन गेले होते आधीच. दोन पायांचाच तेवढा आधार

चार दिवस चालत राहृचल्यावर मेच्या पाच तारखेला सकाळी सात वाजता आम्ही ओक्पोच्या दोन मैल दक्षिणेला असलेल्या एका गावी येऊन पोचलो.

माघार घेताना आमच्यापुढं असलेलं जपानी सैन्य इथनं पूर्वेला वळलं होतं असं कळलं. म्हंजे पेगू-योमासच्या रस्त्याला. आपण लेत्पादानला जावं असं आमचं ठरलं.

आणखी दोन दिवस चालत राह्यल्या-वर––म्हजे मेच्या सात तारखेला–– आम्ही मध्यरात्री ताइकची नावाच्या गावी येऊन पोचलो. हे गाव होतं. रंगूनपास्नं तीस मैल उत्तरेला. गावाच्या कडेच्या एका आमराईचा आसरा आम्ही घेतला. शेजारी एक ओढा होता. त्याचं पाणी पिऊन तहान भागवली. प्रचंड भूक लागली होती सगळ्यांनाच. दिवस-भरात अन्नाचा कण पोटात गेला नव्हता कुणाच्याच. सारखं चालत यावं लागलं होतं शिवाय प्रत्येकाच्या पाठीवर जवळपास अर्ध्या मणाचा बोजा. पण आता मध्यरात्री तीनशे जणांकरता खायला काही मिळवणं अशक्यच होतं.

तेव्हा नाइलाजानं आम्ही ओळीनं आडवे झालो. पहारा करण्याकरता काहीचजण जागे राह्यले.

पहिल्या तीन तासांच्या पहाऱ्यांतच माझा नंबर लागला होता.

कृष्णपक्षाची रात्र. चोहीकडे निस्तब्ध. आम्ही भारतात असतो तर एखाद-दुसऱ्या कोल्ह्याचं ओरडणं तरी काना-वर आलं असतं. ब्रह्मदेशात कुठंच कोल्हेकुई ऐकायला मिळाली नाही. लांब गावातनं कुत्र्यांचं ओरडणं मधनं-मधनं ऐकू येत होतं.

अंधारातनं कुणीतरी एक माणूस कँपकडे येतोय् असं वाटलं अचानक.

––हॉल्ट ! हू कम्स देअर ?

––फ्रेंड !

दोन्ही हात डोक्यावर ठेवून तो पुढं आला. ब्रह्मी होता.

इंग्रजीत म्हणाला––तुम्ही आझादी सैनिक आहात की ! मला तुमच्या कमांडरला भेटायचंय् !

––कमांडर झोपलेयत ! पण तू कोण ?

––मी युंग-सांग सेनेचा कमांडर जनरल आहे !

आता मी ज्यावेळच्या गोष्टी सांग-तोय्, त्यावेळी युंग-सांग नावाच्या एका ब्रह्मी नेत्यानं पीपल्स नॅशनल आर्मी तयार केली होती. ब्रह्मदेशाला स्वतंत्र करायचं स्वप्न ते बघत होते. त्यांचं हेडक्वार्टर्स होतं थाएटमेयो भागात. ह्या भागात त्यांनी एक प्रबळ स्वतंत्र सरकार स्थापन केलं होतं. काउकपाडांग-पास्नं प्रोमपर्यंत आम्ही त्यांच्या हाल-

चालो बघत आलो होतो. ह्या बंडखोर सैन्यानं प्रोमच्या पश्चिमेला बेचाळीस गावात स्वतःची सत्ता प्रस्थापित केली होती. जपानी सैन्य दिसलं की ते हल्ला करायचे. पण आझाद हिंद सेनेला मात्र ते सर्वप्रकारे मदत करायचे.

जपान्यांना भिऊन जेव्हा ब्रिटिश सैन्य ब्रह्मदेशातन पळून गेलं होतं, तेव्हा ब्रह्मदेशात स्थायिक झालेल्या लाखो भारतीयांनी पायी पायीच भारतात पळून यायचा प्रयत्न केला. ब्रह्मी लोकांनी तेव्हा ह्या भारतीयांना सर-सकट मारून टाकलं पन्नासेक हजार भारतीयांनी तरी ह्या ब्रह्मी डाकूंच्या हाती प्राण गमावले असतील.

अन् तरी आज हेच ब्रह्मी लोक म्हंजे आमचा एकमेव आधार होता. हा बदल निव्वळ नेताजींच्यामुळं घडून आला होता. ब्रह्मदेशात असताना नेताजींनी ब्रह्मा लोकांशी खास प्रेमाचे संबंध जोडले होते. त्यामुळं नेताजी हे भारतीय नेते आहेत असं ब्रह्मी लोकांना वाटायचंच नाही. नेताजी हे सबंध पूर्व आशियाचे एकमेव नेते आहेत असं त्यांना वाटायचं. म्हणूनच ते आझाद हिंद सेनेला सर्वस्वी मदत करत होते.

म्हणून त्याच्या विनंतीप्रमाणं मी शहानवाजखानना झोपेतनं उठवलं.

ब्रह्मी नेता म्हणाला— शहानवाज-साब, तुम्ही मला ओळखत नाही, पण मी तुम्हाला ओळखतो. तासाभरापूर्वी तुम्ही इथ आलायत असं आमच्या हेरानं सांगितलं. इथल्या राष्ट्रीय सेनेचा मी कमांडर आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की इथली छावणी हलवून तुम्ही पेगू योमासची वाट धरा. जर का सित्तांग नदी तुम्हाला पार करता आली. तर कदाचित् मौसमीनला जाता येईल तुम्हाला.

शहानवाजनी विचारलं— रंगूनची काय खबर आहे ?

—ब्रिटिश सैन्यानं रंगूनमधे प्रवेश केलाय्. अन् शिवाय त्यांची एक बटा-लियन रंगून-प्रोम रस्त्यान इकडेच येतेय्. ती तुम्हाला पकडण्याकरता म्हणूनच येतेय्. ह्या घडीला ते पंधरा मैल दक्षिणेला आहेत.

मग आम्हाला लगेचच निघावं लागलं. झोपेतनं उठून पेंगुळल्या पायांनी आमचे दमले-भागले सैनिक पूर्वेकडे तोंड करून चालायला लागले. काहीही करून पेगूला पोचायला हवं ! तेही लौकरात लौकर ! पेगूवर ब्रिटिशांचा कब्जा व्हायच्या आत !

पाच दिवस न् पाच रात्री घनदाट जंगलातनं वाट काढत बारा तारखेला आम्ही जिथं पोचलो, त्या गावाचं नाव होतं ' वाटा '. अगदी क्षुल्लक गाव. हे गाव पेगू शहरापास्नं वीस मैल पश्चि-मेला होतं. उद्याच आपण पेगूला पोचू अशी आम्हाला उमेद होती. तिथं पोचल्यावर आणखी काही नाहीतरी पोटभर काहीतरी खायला मिळेल. कदाचित् काही वाहनदेखील मिळून जाईल.

पण दुर्दैव आमचं ! इथंही स्थानिक ब्रह्मी नेत्यांनी सांगितलं की पेगू तर ब्रिटिशांनी घेतल्याला पंधरा दिवस होत

आले ! 'वा'—मधे अजुनी लढाई चालली होती म्हणे.

पण एवढंच नाही, आणखीही दोन मर्मभेदी बातम्या दिल्या ह्या नेत्यांनी. एक म्हंजे जर्मनीनं बिनशर्त शरणागती पत्करली अन् दुसरी बातमी—अखंड बाँबवर्षावामुळं जपानपण हादरून गेलंय् ! कदाचित् पंधरवड्याभरातच जपानपण आत्मसर्पण करेल !

मग आमच्या सेनापतींनी टेहळणी करणाऱ्या काही सैनिकांना वेषांतर करून पुढच्या गावी पाठवलं. दुसऱ्या दिवशी ते खबर काढून परत आले; पण खबर काही आशादायक नव्हती. आपल्याला चारीबाजूंनी ब्रिटिश सैन्यानं घेरलंय् हे आता पक्कं झाल. पळायला काहीच वाट मोकळी राह्यली नव्हती.

फक्त आमचीच नाही—पन्नासेक हजार जपानी सैन्याचीपण हीच दशा झाली होती. ब्रह्मदेशच्या वेगवेगळ्या भागात ते पण आमच्यासारखेच सापळ्यात अडकले होते. चारी बाजूंनी शत्रूनं नाकेबंदी केली होती. वरनं बाँबचा वर्षाव तर झालाच, पण शिवाय खायलापण काही नाही ! गावकरी सगळे घाबरून जंगलात पळून गेले होते. अन् भुकेपोटी जपानी सैनिक मिळेल ते खात होते—डुकरं, गुरं, म्हशी, माकडं, कुत्री—अक्षरक्षः वाट्टेल ते !

तेरा तारखेला सध्याकाळी सातच्या सुमाराला आम्ही परत निघालो. ह्या खेपेला जंगलाकडे. चांगल्या किर्र जंगलात एके ठिकाणी आम्ही मुक्काम ठोकला. सगळे आल्यावर सेनापती म्हणाले—मला तुम्हाला काही सांगायचंय् !

आजूबाजूला निव्वळ झाडं झाडं झाडं ! डोक्यावर घनदाट फांद्यांचं आच्छादन ! रात्रीची नऊ-दहाची वेळ. झाडाझुडपात काजवे लुकलुकत होते. शुद्ध सप्तमीचा चंद्र अजून मावळला नव्हता. शिवाय बराचवेळ अंधारातच असल्यामुळं डोळ्यांनाही सवय झाली होती. माणसं स्पष्ट दिसत होती. शिवाय आम्ही आणखीकाही उजेड करून चालणारही नव्हतं.

तर आम्ही शहानवाजखानच्या भोवती कोंडाळं करून बसलो. आमच्या सेनापतींनी सैनिकांना उद्देशून शेवटचं भाषण दिलं मेच्या तेरा तारखेच्या त्या मध्यरात्री.

सैनिकांनी धीरानं हालअपेष्टा सोसल्या ह्याबद्दल त्यांनी सैनिकांना असंख्य धन्यवाद दिले. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आता अशी होऊन गेलीय् की आपल्या दोन वर्षांच्या लढाईचं सगळंच कसं वाया गेलंय् हे त्यांनी समजावून सांगितलं. तरी निरुत्साही व्हायचं काही कारण नाही, असं ते म्हणाले. ह्या पराजयामुळं भारताचा स्वातंत्र्यसंग्रामात काही संपुष्टात आलेला नाही, फक्त आपली युद्धनीती आता अर्थातच बदलावी लागेल—असं त्यांनी सांगितलं.

रंगून सोडून जाताना नेताजींनीपण ह्याच गोष्टी जवळ जवळ ह्याच शब्दात सांगितल्या होत्या. तो त्यांचा संदेश आम्हाला मिळालाच होता. त्यामुळं

शहानवाजखान जे काही सांगत होते, ते आम्ही गप्प ऐकून घेतलं. नवीन काहीच बोलले नाहीत ते. पण एवढंच बोलायला काही ते आमच्यासमोर उभे नव्हते. मुद्याची गोष्ट त्यांनी नंतर काढली.

म्हणाले—साथिओ और दोस्तो! एक एक बात मुझे कहना है! त्याचकरता इथं जंगलात आपण एकत्र जमलेलो आहोत. आता ह्या परिस्थितीत आपलं कर्तव्य असं की ब्रिटिशांसमोर आत्मसमर्पण करून भारतात पोचणं. नेताजींना आझाद हिंद सेनेला साधारण असाच आदेश दिलेला आहे. आपल्याला भारतात नेलं की ते लष्करी न्यायनिवाडा करतील. त्यांनी जर आपल्याला सगळ्यांनाच गोळ्या घालून मारलं, तर सबंध भारतात बंडाची आग भडकून उठेल. अन् त्यांनी आपल्याला जर का मारून टाकल नाही, तर आपल्याला भारतातच नव्यानं मुक्तिसंग्राम सुरू करता येईल.

दम घेण्याकरता ते जरासे थांबले. आम्ही अजून गप्पच होतो. नुस्त ऐकत होतो.

—लेकिन एक बात है! ही माझी मनची गोष्ट आहे. मला काही स्वतःच्या मनाला ब्रिटिशांच्यासमोर शरणागती पत्करायला राजी करणं काही केल्या जमत नाहीय्. तेव्हा मी असा संकल्प केलाय् की त्यांच्यावर हल्ला चढवून प्राण द्यायचा! ह्याचा काही उपयोग नाही हे मला अर्थातच ठाऊक आहे; पण तरी मी असंच करायचं ठरवलंय्. आत्मदानाच्या ह्या दाखल्यामुळं पुढच्या मुक्तिसैनिकांना प्रेरणा मिळेल. म्हणून तुमच्यातल्या पन्नास सैनिकांना मी आवाहन करतोय्? ह्या मृत्युयज्ञात माझ्याबरोबर स्वतःची आहुती द्यायला तयार असलेल्यांनी उठून उभं रहावं!

आत्ताही आम्ही गप्पच होतो; पण अंधारातदेखील दिसलं की, सगळेच उठून उभे राहिलेय्त अॅटेन्शनमधे!

मग सेनापती स्वतः उठून उभे राहिले. भावनावेगानं त्यांचा गळा दाटून आला.

ते म्हणाले—कॉम्रेड्स! तुमच्या मनातली गोष्ट कळतेय् मला! तुम्ही सगळेच शूर वीर आहात! पण तीनशे लोकांजोगती रसद न् शस्त्रास्त्रं माझ्याजवळ आज नाहीत! त्यामुळं पन्नासापेक्षा जास्ती लोकांना मी बरोबर घेऊ शकत नाही.

आम्ही कुणीच काही बोललो नाही.

कर्नल धीलन म्हणाले—सर, म्हंजे निवड तुम्हालाच करावी लागेल!

क्षणभर विचार करून मग मेजरजनरल म्हणाले—ठीक आहे!

एकेकाचं नाव ते घ्यायला लागले. नाव घेतलेला आमच्यातनं बाजूला होऊन उभं राहायला लागला. कर्नल जी. एस. धीलनपास्नं सुरुवात केली त्यांनी. जागीरसिंग न् ए. बी. सिंग वगळले गेले. मग नावं आली—मेजर मेहरदास, कॅप्टन अब्दुल रसूल, कॅप्टन गुरुबक्षसिंग, अमरसिंग, फत्तेसिंग...

माझी छाती धडधडायला लागली. आपल्याला वगळतात का काय!

लेफ्टनंट प्रीतमसिंग, राजेंद्रनारायण, मन्सूरअली, जीवनसिंग...

शेजारनं कुणीतरी माझा हात धरला. मी पाह्यलं तर कॅप्टन खान महंमद! दुसऱ्या बाजूला अन्वर हुसेनला काही राहवेना. तो माझ्या कानात म्हणाला— त्यांनी आपलं नाव घेतलंच नाही, तर तू काय करणारायस ?

काय करावं—काही सुचत नव्हतं.

—अजायबसिंग, दिलवर हुसेन, रामनगीना शर्मा, अन्वर हुसेन..

ते एकामागोमाग एक पलीकडे जाऊन उभे राह्यले. मी आकडा मोजत चाललो होतो. पस्तीसजण झाले होते. दोस्त अन्वरपण सोडून गेला मला. माझ्या मनात तेव्हा भयंकर वादळ उठलं होतं, रंगूनमधला तो लिलावाचा प्रसंग आठवला मला. त्यादिवशी जशी एकेक बोली ऐकून मी घायाळ होत होतो. तसंच होत होतं आजपण. पण इथं मला करण्याजोगं काहीच काहीच नव्हतं.

—गुलजारासिंग, दीनानाथ दुबे, हरगोविंदसिंग...

चला! वाचलो!!

निवड संपली.

[क्रमशः]

---


## धनंजय कीर

यांनी लिहिलेल्या

# स्वातंत्र्यवीर सावरकर

(मराठी अनुवाद : द. पां. खांबेटे)

ह्या ग्रंथाचे प्रकाशन काही तांत्रिक अडचणीमुळे लांबले होते. हा ग्रंथ २६ फेब्रुवारी १९७३ (सावरकर पुण्यतिथी) रोजी प्रसिद्ध झाला असून ज्यांनी नोंदणी केली होती त्यांना पाठविण्यात आला आहे.

त्या महाचरित्रात ६३५ पृष्ठे असून २९ छायाचित्रे आहेत.

**ग्रंथाची किंमत ४० रुपये परंतु १४ एप्रिलपर्यंत सवलतीची किंमत २५ रुपये**

**पॉप्युलर प्रकाशन**

३५सी, ताडदेव रोड, मुंबई ४०००३४


---

पुस्तके

स्थितप्रज्ञ शास्त्रज्ञाची जीवनकथा

# सिग्मँड फ्रॉईड

सुरेश गजेंद्रगडकर

विसाव्या शतकातील श्रेष्ठ संशोधकामध्ये फ्रॉईडचे नाव पहिल्या दहात असेलच. कुठल्याही नवीन शास्त्राचा उगम होताना त्यास होणारा प्रखर विरोध लक्षात घेता फ्रॉईडचे अत्यंत वादळी जीवन हे कोपर्निकस किंवा गॅलिलिओ ह्यांच्याशी तुलनीय ठरते. फ्रॉईडसारख्या मनोविज्ञानशास्त्राच्या जन्मदात्याविषयी मराठीत लेखन नसावे ह्याची खंत कुणासही वाटावी. मनोविश्लेषण शास्त्राचा उगम व विकास हा फ्रॉईडच्या चरित्राशी इतका निगडित आहे की, एकमेकांपासून त्यांना वेगळे करणे केवळ अशक्य. त्यामुळेच फ्रॉईडचे चरित्र व तत्त्वज्ञान ह्यास न्याय देणारे लेखन अतिशय अवघड असल्याने त्यास कुणीही हात घातला नसावा. कॉन्टिनेण्टल प्रकाशन आणि प्रा. हरोलीकर यांनी हे कार्य केले ह्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच आहे.

फ्रॉईडच्या बालपणापासून त्याच्या मनावर होणारे परिणाम व त्याने स्वतःचे केलेले विश्लेषण व त्यामुळे 'पिता हे निषेध, निग्रहण, निर्बंध ह्यांचे प्रतीक आहे व माता हे सुखतत्त्वाचे प्रतीक अशी त्याची धारणा बनली.' ह्या व तशाच आपल्या भावाविषयींच्या भावना इत्यादींचे अत्यंत साध्या भाषेत केलेले विवेचन फ्रॉईडविषयी वाचकास उत्कंठा निर्माण करणारे ठरते.

फ्रॉईडचे जीवन किती कर्तव्यनिष्ठूर होते व त्याच्या खाजगी जीवनात त्याने किती हाल सोसले होते. हे वाचून 'सार्वजनिक लैंगिक सिद्धांत' मांडणारा फ्रॉईड विलासी व रंगेल असावा असे सुचवले जाते ते किती खोटे आहे हे ध्यानी येते.

व्हिएन्ना शहरातील 'बाहेर एक व आत दुसरे' ही वागण्याची पद्धती त्याच्या बालमनावर कायमचे परिणाम





करून गेली. ज्यू असल्यामुळे त्याचे जे काही पहिल्या ३–४ वर्षांत त्याच्यावर परिणाम झाले ते जन्मभर गेले नाहीत.

त्याच्या विद्यार्थी जीवनातही एकाग्रतेने अभ्यास करणे व स्वतःचे विचार बनवणे ही वैशिष्ट्ये दिसून येतात. ह्याचाच परिपाक पुढे नवीन शास्त्राची पाऊलवाट निर्माण्यात झाला.

फ्रॉईड वैद्यकशास्त्राकडे वळला तो 'सृष्टीचे गूढ काही प्रमाणात शोधून काढण्यासाठी' आणि वैद्यकशास्त्रांतून मनोविज्ञान शास्त्राकडे जाऊन त्याने त्याचे ध्येय काही प्रमाणात तरी गाठले असे आज आपण म्हणू शकतो.

फ्रॉईडच्या एकूण जीवनावर प्रभाव पडला तो ब्यूक, शार्को (हरोलीकरांना शार्कोचा प्रभाव मान्य नाही), डॉ. ब्रॉयर व फ्लर्नेस. विशिष्ट कालात तो ह्यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झालेला दिसून येतो. परंतु कालांतराने त्याचे मन स्वतंत्र विचार करते व ही वर्चस्वे प्रसंगी संपूर्णपणे व इतरवेळी अंशतः फ्रॉईडने झुगारलेली दिसतात.

फ्राईडचा प्रणय–लग्न व सुखीसंसार हे मात्र कुठल्याही कादंबरीच्या नायकास शोभेसे आहे आणि हरोलीकरांनीही त्यास न्याय दिला आहे. त्याची सुखदुःखे सुरेख भाषेत समोर उभी केली आहेत.

मनोविज्ञान शास्त्राविषयी नसविकृतीविषयींचे बारीकसारीक गोष्टींसह केलेले विवेचन अत्यंत वाचनीय ठरले आहे. पुरुषांच्या Hysteria व त्याविषयी जुन्यांचा विरोध त्याचे Aphasia आदि ग्रंथ आणि मोहनिद्रा (Hypnotism) पद्धतीऐवजी वापरलेले Free Association तंत्र ह्या घटना

त्याच्या पुढच्या मोठेपणाची पावलेच होती.

तांत्रिक माहितीमध्येच वैयक्तिक घटना आल्यामुळे हे लेखन कंटाळवाणे झालेले नाही.

त्याचे 'स्वप्नविवरण' हे स्वतंत्र प्रतिभेचे लेखन आत्मविश्लेषणात्मक आहे. त्यामुळे अनेक घटनांचे अन्वयार्थ त्याने का व कसे लावले हे कळते.

एकाच माणसाने अशा अनेक नवीन शास्त्रांचे पायंडे पाडावेत आणि त्याला विरोध व्हावा हे अजबच वाटते.

त्याच्या आयुष्यातील उत्तरार्धात (१९१० नंतर) अनेक दुःखद घटना त्याने अनुभवल्या. अॅडलर, युंग याच्याशी बेबनाव, कन्येचा मृत्यू, रॅन्कशी फेरेन्झीशी भांडण सारे अत्यंत तापदायक.

जरी ह्याच कालात त्याला आंतरराष्ट्रीय मानसन्मान मिळत गेले, आंतरराष्ट्रीय काँग्रेस (मनोविश्लेषणाच्या) भरल्या, तरी सुखदुःखाची सारखी पाठशिवणी चालूच होती.

शेवटी शरीराला कॅन्सरने वेढल्यामुळे, शारीरिक कष्टही असह्य झाले होते. आणि म्हणूनच १९३९ साली ऐंशीव्या वाढदिवसानंतर त्याने डॉक्टरला मॉर्फिया द्यायला लावला.

एका दैदिप्यमान, झुंझार, स्थितप्रज्ञ शास्त्रज्ञाची ही जीवनकथा अत्यंत चांगल्या भाषेत श्री. हरोलीकरांनी मांडली आहे.

सारे लेखन वाचताना काही त्रुटी जाणवत राहतात.

पहिले म्हणजे त्यांनी स्वतःचे अभ्यासपूर्ण मत कुठेच दिलेले नाही. फ्रॉईड-युंग-अॅडलर ह्या त्रयींच्या शास्त्रांची चर्चा, त्यांचा तौलनिक आलेख किंवा कुणाचे कसे योग्य-अयोग्य –काही दिलेले नाही. तसेच वाचताना अनेक ठिकाणी आपण अनुवाद वाचतो आहोत असे सारखे वाटत राहते.

त्याच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करताना 'इडिपसगंड' ह्यांचे तुटक तुटक वर्णन ३–४ ठिकाणी आढळते व काही इतर विषयांची पुनरुक्ती आढळते. नीट एकत्रित चर्चा केली असती तर हा विषय कळण्यास सामान्य वाचकांस सोपे झाले असते.

त्यांचे कित्येक मराठी प्रतिशब्द चुकीचे वाटतात. (उदा. Precocious ला अतिपुष्ट) ह्याविषयी त्यांनी अधिक काळ घेणे आवश्यक होते.

या त्रुटींसह हे पुस्तक वाचनीय आहे. मनोविज्ञानशास्त्रात रस असलेल्या प्रत्येकाने हे जरूर वाचावे असे हे पुस्तक आहे.

मराठीमध्ये अशी आणखी पुस्तके लिहिली गेली पाहिजेत आणि प्रकाशनांत नेहमी नाविन्य शोधणाऱ्या 'कॉन्टिनेन्टल प्रकाशनने' हे काम हाती घेऊन अशी अधिकाधिक पुस्तके द्यावीत अशी मी आशा करतो.

एका गोष्टीचा आवर्जुन उल्लेख केला पाहिजे व तो म्हणजे ह्या पुस्तकाचे कव्हर. अत्यंत सुयोग्य असे कव्हर ह्या पुस्तकास लाभले आहे. १९०६ मध्ये पन्नासाव्या वाढदिवसानिमित्ताने

फ्रॉईडला दिलेल्या पदकाची ही प्रतिकृती आहे. त्यावरती वाक्य होते, 'ज्याने तो विख्यात यक्षप्रश्न उकलला, आणि जो सर्वांत समर्थ मानव होता.' ह्यापरते फ्राईडच्या पुस्तकास योग्य मुखपृष्ठ कुठले ? ◻

**सिग्मंड फ्रॉईड**
जीवन आणि कार्य
ले. हुरोलीकर.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
सतरा रुपये. ●

# कथा आणि कथाकथन

मंगळवेढेकरांचा नवा अभ्यासपूर्ण ग्रंथ

'कथा आणि कथाकथन ' या विषयावर श्री. राजाभाऊ मंगळवेढेकरांनी लिहिलेला मराठीतल्या विषयावरचा पहिलाच ग्रंथ वाचनात आला. कथा, लघुकथा, कहाणी, मत्र, तंत्र या विषयांवर मराठीत अनेकांनी ग्रंथ लिहिले; पण कथा कशी सांगावी, कुणाला कोणती सांगावी, या प्रश्नांचा ऊहापोह करणारा ग्रंथ मराठीत अद्याप झालेला नाही. वीस पंचवीस वर्षे कथा-कथनाचे प्रत्यक्ष प्रयोग करून त्यातून आलेले अनुभव, अडचणी यांची बैठक या ग्रंथाला लाभलेली असल्याने निश्चितता आणि ठामपणा हा या ग्रंथाचा पाया झाला आहे. या ग्रंथ लेखनाचे निमित्ताने लेखकाने जी विचारधारा मनाशी निश्चित केली आहे त्याचे प्रतिसाद लेखनात वारंवार जाणवतात. गोष्ट सांगणे आणि ऐकणे ही माणसाची एक सांस्कृतिक भूक आहे. सुखदु:खाच्या गोष्टी केल्याशिवाय माणसाला बरे वाटत नाही आणि यातूनच गोष्ट चांगल्या तऱ्हेने सांगता येऊन आपले व्यक्तित्व उजळत इतरांचे रंजन करता यावे ही विचाराची वरची पायरी तयार होते. या सोपानावर चढण्यासाठी मराठी सारस्वताच्या उपेक्षित दालनात लेखकाने ह्या एक दीप तेवता ठेवला आहे. त्या ग्रंथाची रचना बघताच हा नव्याने वाट शोधीत येणाऱ्या कथाकथनकांना त्यायोगे पुरेसा प्रकाश मिळून नवीनवी दालने खुली करण्यास सहाय्य करील यात शंका नाही.

ग्रंथाचे एकंदर स्वरूप लक्षात घेता कथेचा इतिहास अर्ध्या भागात दिला असून प्रत्यक्ष कथाकथन करताना कोणती पथ्ये पाळावी लागतात याचे दिग्दर्शन ग्रंथाच्या उत्तरार्धात केलेले आढळून येते. कथेचा इतिहास देत असताना कथा विषयाची भारतीय परंपरा, ऋग्वेदकालापासून बाणभट्टापर्यंतचा सुमारे पाच-सहा हजार वर्षांचा कालखंड विस्तृत स्वरुपात मांडला आहे. संस्कृत साहित्यातील कथा, त्यानंतर तयार झालेल्या देशोदेशींच्या लोककथा आणि त्यातील साम्यस्थळे यांचाही विचार करण्यात आलेला आहे. या विवेचनाने ग्रंथाचा बराचसा भाग अडवला तरी अशा तऱ्हेचा ग्रंथ प्रथमच लिहिला जात असल्याने तो प्रबंधवजा होणे अपरिहार्यच ठरते.

लहानपणीच कथा ही दर्शन, श्रवण आणि वाचन या तीन माध्यमातून आपल्याला कशी भेटते आणि तिचा जनमनावर फार मोठा परिणाम कसा झालेला दिसतो यावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. एकूण कथांचा विचार करताना लेखकाने त्याचे बारा भागात वर्गीकरण केलेले आहे. त्यात बालांना प्रिय होणाऱ्या बालकथेपासून अर्वाचीन कालाची गरज म्हणून जन्माला आलेल्या विज्ञानकथेपर्यंत साऱ्या प्रकारांचा ऊहापोह केलेला आहे. नीतीकथा, अद्‌भुत कथा, परीकथा, चातुर्यकथा इत्यादी प्रकार वेगळे केले आहेत. कोणत्या वयाच्या मुलांना कोणत्या गोष्टी सांगाव्यात याचा मानसशास्त्रदृष्टचा विचार केलेला आहे.

ग्रंथाचा उत्तरार्ध हा कथाकथनाचा व्यवहार कोष आहे. कथाकथनाला आवश्यक असलेली मानसिक व शारीरिक तयारी, बसावयाची जागा इत्यादींचा सूक्ष्म विचार केलेला आहे. Voice Culture या महत्त्वाच्या विषयावर अधिक विस्तृत विचार झाला असता तर उत्तम झाले असते. तरी पण एकंदर ग्रंथाचा विचार करता अनुभव, निवेदन, त्यासोबत दिलेली भरपूर उदाहरणे, यामुळे हा ग्रंथ वाचनीय व अभ्यासनीय झाला आहे. ग्रंथाच्या शेवटी कथाकथनासाठी उपयोगी पडतील अशा पन्नासाहून अधिक पुस्तकांची यादी दिल्याने कथाकथकाचे काम सुकर झाले आहे.

—प्रभाकर गुप्ते

कथा आणि कथाकथन
राजा मंगळवेढेकर
साधना प्रकाशन

---


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत . चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## मद्रास मेल

पृष्ठ १५ वरून

भरून घ्यावेत. एकावर असावे 'अमुक अमुक ठिकाणी मुलाखतीस यावे' दुसऱ्यावर असावे 'निवड झाली नाही.' दोन्ही फॉम्ससाठी पोस्टेज ठेवण्याची सक्ती असावी, म्हणजे कमिशनचे बिचाऱ्या कारकुनांना त्रास नको. इति. रेल्वेपुराण.

अर्ज भरल्यानंतरचा पुढचा वैताग शिफारसपत्रांच्या नकला व त्यांवर गॅझेटेड ऑफिसर्सच्या सह्या व शिक्के. प्रत्येकाचे टायपिस्ट दोस्त असतातच असे नाही. रोख पैसे मोजून टायपिंग करायचे म्हणजे चार प्रतीस दीड रुपाया भाव. सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेटकडे अधिकृतरीत्या सही-शिक्के घेण्यास गेलात तर शब्द मोजून, शब्दाला नवा पैसा किंवा तसाच काहीतरी भाव आकारला जातो. काम लौकर होण्यास 'च्यापानी' पण करावे लागतेच. वास्तविक पदव्या, मार्क इ. अर्जात लिहिलेले असते. त्यांचे खरेपणाबद्दल गॅझेटेड ऑफिसराची फॉर्मवर सही असते, प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी खरी-खुरी पदवी दाखवायची असतेच—मग नकलांचा उपद्व्याप विनाकारणच नाही का? म्हणजे एक अर्ज करायचा असेल तर दहाची नोट बाजूला काढून ठेवायला लागते.

इतके करूनही कॉल आला तर पैशाचे सार्थक झाले समजू. पण कॉल न च आला तर? सर्टिफिकीटांच्या नकला, पाच पाच फोटो ह्या साऱ्यावर पाणी! आज बाजारात बऱ्यापैकी फोटो काढून घ्यायचा म्हणावे तर पाच फोटोस साडेतीन रुपये हवेत. तिकिट लावलेले, पत्ता टाकलेले पाकीट उमेदवार आत ठेवीतच असतो. मग निवड संपल्यावर इतरांचे फोटो अन् नकला परत का करू नयेत? निराळे 'निवड झाली नाही' कळवण्याचे मग कारणच नाही. म्हणजे उमेदवारास पुढील खेपेस किंवा दुसरीकडे कोठे अर्ज करताना तेच साहित्य उपयोगी पडेल. आज एकीकडे पंतप्रधान बांगला देशला पुढे करून रेल्वेची दरवाढ करीत सुटल्यात. रेडियोवर राष्ट्रीय उत्पादन वाढवा म्हणून कंठशोष चालू आहे व इथे मात्र एका उमेदवाराचे किमान दहाप्रमाणे हजारो प्रामाणिक बेकार लोकांचे लाखो रुपये दरवर्षी रेल्वे अक्षरक्ष: पाण्यात घालविते!

अर्जासोबत काही रकमेची पोस्टल ऑर्डर मागवणे अलीकडे सर्रास झाले आहे. तुम्हाला गरज आहे ना? मग चूप बसा. सरकारने चालू केलेले हे खूळ आता निमसरकारी व खाजगी सस्थांपर्यंत पोहोचलेले आहे. त्या जमणाऱ्या पैशांमधून येणाऱ्यांचे गाडी-भाडे 'काढले' जाते. कित्येकदा शेवटच्या दिवशी टाकलेले बहुसंख्य अर्ज 'लेट' शिक्के मारून कोपऱ्यात धूळखात पडतात; पण त्यांच्या पोस्टल-ऑर्डर्स मात्र जमा होतात. तुम्ही क्रॉस केलेली असेल तर सरकारजमा अन्

नसेल तर कुठे 'जमा' होते ते विचारू नका!


प्रवासखर्च, रेल्वेभाड्यातही विसंगती कशी ती पहा– नर्सला भाडे मिळते, पण 'मिडवाईफला नाही.' निधर्मी राज्याची टिमकी वाजविली जाते, परंतु प्रत्यक्षात 'वर्गीकृत जनजातीं'च्या पांघरुणाखाली अपात्र, अकार्यक्षम मंडळी दोन रुपयांचा अर्ज आठ आण्यात घेऊन, जातायेता गाडीभाडे पंदरात पाडून लायक लोकांना डावलून केवळ 'जात' ह्या गुणांवर भरती होतात. नुसतेच भरती होत नाहीत तर, लागल्या दिवसापासून 'कायम' धरले जातात व बढतीच्या वेळी वयस्कर अनुभवी पदवीधरांना मागे टाकून, नंतर लागलेला मॅट्रीक्युलेट (थर्डक्लासच!) 'हेडक्लार्क' बनतो! आज बहुतेक सरकारी खात्यामधील आता कमी बँकामधीलसुद्धा–कार्यक्षमता ढासळत आहे ह्याचे कारण हेच! मुलाखतीस जाताना उमेदवारांचा गुणवत्तेवर काहीही भरवसा नसतो त्याचे कारण हेच!

मध्यंतरी मद्रास फर्टिलायझर्स (प्रांतिय सरकारी प्रकल्प) मधे नर्ससाठी जाहीरात होती, तिला शॉर्टहँड टायपिंगची आवश्यकता होती! कारकुनाच्या जागेला बुलडोझर ड्रायव्हिंग हवे किंवा वेल्डरच्या जागेला केस कापण्याचा अनुभव हवा म्हणण्यासारखाच हा प्रकार होता. अर्थात् अशा प्रकारच्या जाहीरातीमागील रहस्य काय? जाहीरातीवरून भरती करण्याऐवजी, ज्याला लावायचे असते अशा व्यक्तिवरून जाहीरात बनविली जाते इतकंच! ते काहीही असो. 'गरजवंताला अक्कल नसते' असं काहीतरी मराठीत म्हणतात. हे समजनही–हा माझा लेख वाचूनही तुम्ही अर्ज करणारच. तुम्हीच कशाला, मी सुद्धा अर्ज करणारच आहे. मग? वरची म्हण सिद्ध नको का व्हायला?

● ● ●



# लंचटाईम थिएटरची पाच वर्षे




पुष्पा भावे

आज कोणत्याही क्षेत्रामध्ये मूळ प्रस्थापित केंद्राच्या बाहेर नवीनवी वर्तुळे निर्माण होताना दिसतात. केंद्र स्थायी असते तर बाह्यवर्तुळे सतत परिवर्तनशील असतात. पाश्चात्य रंगभूमीच्या इतिहासात या बाह्यवर्तुळांनी रगमंचाचे भान सतत ताजे ठेवण्याचे कार्य केले आहे. रंगभूमी, नाटक अधिकाधिक अनौपचारिक करावे, एका प्रयोगाचे अर्थशास्त्र अधिकाधिक सोपे करावे, प्रेक्षकांना विश्वासात घ्यावे, अशा विविध उद्देश्यांनी पाश्चात्य प्रायोगिक चळवळ आज पारंपारिक नाटयगृहाबाहेर पडली आहे. 'लंचटाईम थिएटर' हा या प्रायोगिक चळवळीचा एक अवतार !

दुपारी कचेरीतून माणसांचे लोंढेच्या लोंढे बाहेर पडतात; त्या वेळाचे काय करावे त्यांना कळत नसते. सर्व उपहारगृहात गर्दी असते. इकडेतिकडे हिंडून वेळ घालविणाऱ्या या नोकरदारांना अल्पोपहार घेता घेता नाटक पाहाता आले तर – या विचाराने १९६८ साली ही चळवळ सुरू झाली. (अर्थात 'The Mermaid' मध्ये, १९५९ सालापासूनच प्रेक्षकांच्या अल्पोपहाराची सोय केली होती.) आज लंडन व आसपासच्या भागात ही जेवणवेळेला नाटुकले पाहाण्याची कल्पना बरीच लोकप्रिय झालेली दिसते. नवे नाटककार, तरुण दिग्दर्शक, तरुण नट, या संधीचा फायदा घेऊन नवेनवे प्रयोग करीत आहेत. दररोज दुपारी एक प्रयोग याप्रमाणे दोन आठवडे एका नाटकाचे प्रयोग करून दर पधराव्या दिवशी नव्या नाटकाचा प्रयोग केला जातो. अनेकदा दिग्दर्शकाची पत्नीच अल्पोपहार व कॉफीची व्यवस्था पाहते. तिचे लहान मूलही तिथच वावरत असते. नाटकाच्या जाहिरातींनी सजविलेले एखादे तळघर हेच नाटयगृह;

अनेकदा प्रेक्षक रिकाम्या खोक्यांवर बसतात – मांडीवर कागदाच्या बशीत अल्पोपहार, हातात कॉफीचा कप; मग नाटक सुरू होते. अनेकदा नाटकाचा प्रयोग संपल्यावर प्रेक्षकांप्रमाणे नटही आपल्या कचेरीत जातात. गेली पाच वर्षे चालू असलेल्या या चळवळीची त्यांच्या शासनाने दखल घेतलेली असून या छोटचा नाटचसंस्थांना अनुदान मिळते. तरी अनेकदा नट पैसे न घेता भूमिका करतात. कारण व्यावसायिक नाटकात भूमिका मिळण्याची वाट पाहात बसण्यापेक्षा दर पंधरा दिवसांनी नव्या नाटकात भूमिका करणे त्यांना अधिक आवडते.

ही व्यवहाराची बाजू वगळली तरी नाटचशैलीवर या चळवळीचा इष्ट संस्कार होत आहे. नेपथ्य, सजावट यावर कमीतकमी खर्च करून नट प्रेक्षक यांच्यातील संवादाला प्राधान्य दिले जाते. Fred Proud या दिग्दर्शक-निर्मात्याच्या शब्दात सांगायचे झाल्यास " With the actors rarely more than few feet away from the audience, lunchtime stages are often a unique kind of confession box for the idividual actor; a platform for revealing an author's private, surreal fantasies., जॉन आरडेनचे Squire Jonathan', जॉन ग्रिलोचे 'History of a poor man', मट्राची नाटके या 'लंचटाईम थिएटरमध्ये होतात, हा केवळ योगायोग नाही. मोठ्या नाटच-गृहापेक्षा अशा नाटकांना छोटी नाटचगृहे अधिक अनुकूल असतात. नटांच्या अभिनयकौशल्याचा या नाटचशैलीत अधिक कस लागतो. तर केवळ वेळ 'घालविण्या'च्या उद्देशाने आलेला प्रेक्षक विचारमग्न होत कचेरीत परत जातो.

आज मुंबईत मराठी प्रायोगिक नाटचाची चळवळ मंदावलेली दिसते. आर्थिक कारण त्याच्या मुळाशी आहे असे सांगितले जाते. पण ते सर्वस्वी खरे नव्हे. हौशी वा प्रायोगिक नाटच-निर्मितीची शैली वेगळी असू शकते हेच आपण विसरतो आहोत की काय असे मला वाटते. काही वर्षांपूर्वी मुंबईत अल्काझींनी, विजयाबाईंनी (मेहता) असे प्रयत्न केले होते : 'भुलाभाई'तील छोटी खोली, इमारतीवरची गच्ची, नायर डेंटल कॉलेजचे तळघर अशी वेगवेगळी स्थळे नाटचगृहे म्हणून त्यांनी वापरली. पण ती पद्धती रूजली नाही. आज मुंबईत असे अनेक नट, दिग्दर्शक आहेत की ज्यांना वर्षात फार तर एका नाटकात काम मिळते. फोर्ट विभागातील काही कचेऱ्यांना तळघरे आहेत; इतर विभागात इमारतींच्या गच्च्यांचा वापर, महाविद्यालयातील कॅंटिनचा वापर करून तरुण दिग्दर्शक, कलावंतांनी 'लंचटाईम थिएटर' म्हणा वा 'कॉफी हाऊस थिएटर' म्हणा, परंतु नाटचगृहा-बाहेरील प्रायोगिक नाटकाची चळवळ जिवंत राखली पाहिजे.

असे झाल्यास सतीश आळेकर, महेश एलकुंचवार यांच्या एकांकिकांचे प्रयोग

होतील; अनेक आकांक्षी पाश्चात्य नाट्यकृतींचे अनुवाद सादर करता येतील; काही प्रयोगांनंतर नामशेष झालेली नाटके पुन्हा सजीव होतील; तेंडूलकरांसारख्या नाटककाराला नवे आव्हान मिळेल; आणि मुख्य म्हणजे केवळ प्रकाशयोजना, नेपथ्य यात अडकलेल्या दिग्दर्शकांचा कस लागेल. हौशी नाट्यसंस्थांनी हताश वृत्ती सोडून जरा या दिशेने विचार करावा — नाहीतर केवळ व्यावसायिकांची नजर आपल्याकडे कधी वळेल याची आशाळभूतपणे वाट पाहात राहावी! ●

## असुनी नाथ मी अनाथ

नाटककाराला
थोडे मागेच नेणारे
नाटक

'ललितकलासाधना' या नाट्यसंस्थेच्या नावाबरोबर नाटककार सुरेश खरे आणि दिग्दर्शक नंदकुमार रावते या नावांचे स्मरण होतेच: त्यामुळे हे नवे नाटक सुरेश खऱ्यांचे आहे हे वेगळे सांगावयास नको.

सुरेश खरे या नाटककाराला गेल्या काही वर्षांत व्यावसायिक रंगभूमीवर थोडे यश मिळाले आहे. ते यश जरा बाजूला सारून नाटककार खऱ्यांकडे पहाता आपल्या लक्षात येते की त्यांच्या प्रत्येक नाट्यकृतीत लक्षणीय कथाबीज असूनही त्यांनी या कथाबीजाला यथार्थ न्याय दिलेला नाही. काहीशी सोपी उत्तरे स्वीकारण्याची या तरुण नाटककाराची वृत्ती त्याच्या भविष्यकालीन यशाच्या दृष्टीने अनहितकारक वाटते. या नाटककाराला नाट्यरचनेचे, सहज संवादशैलीचे कौशल्य साध्य झालेले असल्यामुळे कदाचित त्यांच्या नाट्यकृतीतील महत्त्वाच्या त्रुटी सहजपणे जाणवत नसतील. प्रेक्षकांना या त्रुटी जाणवल्या नाहीत तरी नाटककाराला जाणवत असाव्यात. कारण प्रत्येक नाटकाच्या रचनेमध्ये, कथावस्तूकडून कथारूपाकडे जाण्याच्या प्रयत्नामध्ये या नाटककाराची धडपड सतत जाणवते.

'असुनी नाथ मी अनाथ' या नाटकाचा अनुभव एका पुरुषाच्या अपौरुषत्वातून निर्माण होतो, परंतु नाट्यानुभवाचे केंद्र आहे एक अनाथ मुलगी! अनाथाश्रमातून घरट्याच्या लोभाने बाहेर पडलेली ही सुंदर तरुणी विवाहापूर्वीच एका विचित्र व्यवहाराने विकली गेली आहे. पैशाने विकत मिळणारी सारी सुखे भोगून आपण आपल्या अपौरुषत्वाचे दुःख विसरू शकू असे मानणाऱ्या हेमंतने आपल्या साहेबांशी—धारकरांशी—परळ सौदा केला आहे. तो करीत असताना सुनीतीसारख्या अनाथश्रमात वाढलेल्या मुलीला व्यभिचार करण्यास भाग पाडणे फारसे गैर नाही अशी त्याने स्वतःच्या मनाची समजूत पटवली आहे. त्या एका रात्रीनंतर आपण सुरक्षित जीवन जगू शकू अशीही त्याला आशा वाटते. परंतु आपल्या सरळ साध्या जीवनाचा असा विद्रूप

ग्राहक व वितरक
(यांच्या फायद्यासाठी

# रिस्ट्रिक्टिव ट्रेड प्रॅक्टिसेस (निर्बंधित व्यापार व्यवहार)

तुम्ही भारतांतील
माल-वितरक
अथवा किरकोळ वस्तु
विक्रेते आहांत का ?

केवळ आपण बनविलेला मालच, तुम्ही ठेवला पाहिजे, इतर कोणाहि कारखानदारानं बनविलेला नव्हे, असा आग्रह, तुम्ही ज्याच्या वस्तु विकतां, त्यांचा कारखानदार धरतो का ?
तसं असेल, तर, "मोनोपोली अँड रिस्ट्रिक्टिव ट्रेड प्रॅक्टिसेस अॅक्ट"च्या सेक्शन ३३(१) (क) नुसार, तो गैरव्यवहाराबाबत दोषी ठरतो.
त्याविरुद्ध जरूर ती कारवाई करतां यावी म्हणून, कृपया ही बाब, पुराव्यासकट, या पत्त्यावर निदर्शनाला आणा.

पत्ता :–
रजिस्ट्रार ऑफ रिस्ट्रिक्टिव ट्रेड अॅग्रीमेंट्स,
पोस्ट बॉक्स ४२४
नवी दिल्ली

गव्हर्मेंट ऑफ इंडिया
डिपार्टमेंट ऑफ कंपनी अफेअर्स
शास्त्री भवन, फिफ्थ फ्लोअर
नवी दिल्ली-1

davp 72/708

सौदा करणाऱ्या, स्वतः पौरुषत्व नसूनही पहिल्या पत्नीच्या आत्महत्त्येनंतर पुन्हा एका कुमारिकेशी विवाह करणाऱ्या हेमंतचा सुनीतीला तिटकारा येतो. ती सूडाने पेटते आणि हेमंतच्या व धारकरसाहेबांच्या संभावित आयुष्यांना चूड लावायची ठरवते. नकळतपणे स्वतःच्या स्त्रीत्वालाच ती जाळीत असते. या विलक्षण आयुष्यात अचानकपणे शेजारच्या भाबड्या राजीवच्या रूपाने तिला स्त्री-पुरुष संबंधाचे निरागस रूप जाणवते. भावनेच्या भरात एकाक्षणी त्या निरागसतेला तडा जातो—परंतु तो क्षण तिच्या साऱ्या विद्रूप आयुष्यातील एकमेव सुंदर क्षण असतो. राजीवला तो क्षण विसरावासा वाटतो तर तिला तो अपत्यरूपाने जपावासा वाटतो. यातून तिच्या आयुष्यात आणखी प्रश्न निर्माण होतात.

हा संपूर्ण अनुभव लक्षणीय होऊ शकला असता. त्यातील हेमंत आणि सुनीती यांच्या विचित्र मनोवस्थांचे चित्रण जर नाटककाराने कौशल्याने केले असते तर हे नाटक खऱ्यांचे एक महत्त्वाचे नाटक ठरले असते. परंतु प्रस्तुत नाटकात नाटककार सरळ कथानिवेदनात फार अडकल्यामुळे हे नाटक बरेचसे ढोबळ झाले आहे. एक तर नाट्य-रचनेतील धारकर—सुनीती—ज्यूली, हेमंत—सुनीती—ज्यूली ही संबंधरचना काहीशी कृत्रिम वाटणारी अशी आहे. तसेच सुनीतीच्या आयुष्यातील विविध संघर्ष आणि हेमंतच्या आयुष्यातील इतके फेरबदल, धारकरसाहेबांचे सूत्ररूप कथानक व ज्यूलीचे आयुष्य हे कथाभाग परस्पर निगडित मानले तरी एका नाटकाच्या विस्ताराच्या तुलनेने अनेक सुत्रांची गर्दी झाल्यामुळे कोणत्याच व्यक्तिरेखेचा वा संघर्षाचा नैसर्गिक विकास होऊ शकलेला नाही. बहुधा ही कथासूत्रांची गर्दी नाटककाराच्याही ध्यानी आली असावी. म्हणूनच त्यांच्या मनामध्ये असलेल्या एकेका सूत्राचे स्पष्टीकरण करणारा प्रवेश अशी काहीशी या नाट्यरचनेची पद्धती झाली आहे. या नाटकाच्या अंतर्गत स्वभावाचा विचार करता फिरत्या रंगमंचावरील तुटक दृश्ये फार अनुकूल होती असे म्हणवत नाही. अर्थात् प्रत्यक्ष नाट्यलेखन दृश्यमालिकेच्या धर्तीचे असल्यामुळे फिरता रंगमंच अपरिहार्य झाला आहे.

सुरेश खऱ्यांचे नेहमीचे संवादलेखन अत्यंत सरल, प्रवाही असे असते. परंतु या नाटकाचे संवादलेखन बरेचसे कृत्रिम, कालेलकरी वळणाची सुभाषिते वापरणारे असे आहे. किंबहुना 'असुनी नाथ मी अनाथ' या नाटकाचे लेखन खऱ्यांना काहीसे मागेच नेणारे आहे. सुरेश खरे नाट्यविषयी खरीखुरी आस्था बाळगणारे नाटककार आहेत. म्हणूनच नाट्यप्रयोगाविषयी लिहिण्यापूर्वी त्यांच्या संहितेविषयी एवढी विस्तारपूर्वक चर्चा केली.

## सफाईदार प्रयोग

'ललितकलासाधने'ने सादर केलेला 'असुनी नाथ मी अनाथ'चा प्रयोग सफाईदार होता. नंदकुमार रावते यांच्या दिग्दर्शनातील नेहमीचा काटे-

कोरपणा याही नाटकात जाणवत होता. पदन्यासाच्या विरचनांची त्यांची नेहमीची धर्ती, फिरत्या रंगमंचावरील आकुंचित अभिनयक्षेत्रात काहीवेळा कृत्रिम भासत होती. रावत्यांनी केलेली पात्रयोजना नाटकाला अनुकूल अशी होती. आशा पोतदार गेली अनेक वर्षे मराठी रंगमंचावर आहेत. प्रारंभीच्या त्यांच्या भूमिका वा रंगमंचावरील त्यांचे व्यक्तिमत्त्व फारसे लक्षणीय नव्हते. परंतु गेल्या तीन वर्षांतील त्यांच्या भूमिकांत नाट्याची समज, रंगमंचावर वावरण्यातील डौल व चेहऱ्यांच्या स्नायूंचे नियमन विशष जाणवू लागले आहे. 'हवा अंधारा कवडासा' या नाटकातील त्यांनी केलेली नायिकेची भूमिका ज्यांना आठवत असेल त्या प्रेक्षकांना आशाबाईंच्या या नव्या व्यक्तिमत्त्वाविषयी वेगळे सांगायला हवे असे नाही. (या नाटकाच्या प्रयोगाच्या दिवशीच 'धुक्यात हरवली वाट'च्या शतकमहोत्सवी प्रयोगात काम करून त्या आल्या होत्या; आणि तरी त्या भूमिकेची छाप या नव्या भूमिकेवर त्यांनी पडू दिली नव्हती.) या नाटकातील सुनीती त्यांनी फार समंजसपणाने सादर केली. हे पात्र नाटकी वाटण्याचा संभव असूनही आपल्या अभिनयातील संयमाने त्यांनी ही शक्यता दूर ठेवली. राजीवशी, धारकरसाहेबांशी व हेमंतशी बोलताना स्वरांचे झोके, खोटा लाडिकपणा, शुष्कता यांच्या सहाय्याने सुनीतीचे या तीन पुरुषांशी असणारे नाते आशाबाईंनी कौशल्याने सांगितले. त्यांच्या अभिनयातील एकच लकब या नाटकात खटकली. नाटकातल्या क्षणाचा स्वभाव न ओळखता त्या आपले शरीर एकाच पद्धतीने (काहीशा ताठ) वागवतात. ही पद्धती बऱ्याच अंशी फॅशनपरेडमधील मॉडेलसारखी असल्यामुळे या नाटकातील काही क्षणी, विशेषतः दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी, खटकली. सुनीतीसारखे जीवन जगणाऱ्या स्त्रीला आपले शरीर संकोचून वावरावे असे काही क्षणी तरी वाटणे अवश्य होते. (दिग्दर्शकाच्या नजरेतून ही गोष्ट सटकली याचे आश्चर्य वाटले. कारण रावते तपशीलाविषयी काटेकोर आहेत). तसेच आशाबाईंची साड्यांची निवड दृश्यात्मकतेला पोषक असली तरी बलात्कारानंतरच्या सकाळी गुलाबी फुलांची, इस्त्रीची प्रसन्न साडी नाट्याला निश्चित पोषक नव्हती.

हेमंतची भूमिका, बऱ्याच दिवसांनी रंगमचावर आलेल्या विनायक जोशींनी सादर केली. मनात कुढणारा हेमंत त्यांनी पराकाष्ठेने सादर केला. रंगभूषाकाराने डोळ्यांभोवतीच्या काळ्या वलयांचा परिणाम भूमिकेला योग्य असाच साधला होता; परंतु सुनीतीकडे पहाण्याचे बदलते दृष्टिकोन (जे नाटककाराने संवादात व्यक्त केले आहेत, ते मात्र जोशी आपल्या अभिनयातून सुचवू शकले नाहीत. त्यामुळे नाटकाला शेवटची मिळालेली कलाटणी कृत्रिम वाटली.) त्यांची भूमिका अत्यंत गुंतागुंतीची होती; परंतु त्यांनी तिचे विविध

अर्थ पुरेसे समजावून घेतले नव्हते, असे वाटत होते. राजाध्यक्षांची धारकरसाहेबांसाठी झालेली निवडच ('धुक्यात हरवली वाट'मधील साहेब) मुळात इतकी अचूक आहे की, त्यांच्या सहज अभिनयाविषयी वेगळे सांगावयास नको. काही शब्दांचे बोबडे उच्चार करण्याची त्यांची लकब हाही त्या भूमिकेचा भाग झाला आहे. रावत्यांचे जुने सहकारी रमेश होनावर बऱ्याच वर्षांनी मराठी व्यावसायिक रंगमंचावर 'अण्णा'च्या भूमिकेत दिसले. त्यांनी आपल्या भूमिकेला योग्य न्याय दिला. [परंतु अण्णांचे पात्र ज्या पद्धतीने नाटककाराने नाट्यरचनेत योजले आहे ती पद्धती मात्र मला खटकली.] राजा बापटांचा 'राजीव' व कुंदा निरगुडकरची 'ज्यूली' या दोन्ही भूमिका समजुतीने, विश्वासाने सादर झाल्या; परंतु या दोन्ही कलावंतांना पुन्हा पुन्हा त्याच धर्तीच्या भूमिका मिळतात हे त्यांच्या अभिनयाच्यादृष्टीने श्रेयस्कर वाटत नाही.

बाबा पार्सेकरांचे नेपथ्य व प्रकाशयोजना या नाट्यानकूल होत्या. बॉसची केबिन, हेमंतची बेडरूम व बाहेरची खोली तिन्ही 'सेटस्' छान आखले होते..फक्त हेमंतच्या खोलीतील सजावट फार मूक होती असे वाटले. ती अधिक काही सांगू शकली असती. फिरत्या रंगमंचाचे बंधन लक्षात घेता फर्निचर कमी वापरले असता अभिनयक्षेत्र वाढेल असेही वाटते. तसेच फिरत्या रंगमंचाखालील तडे गेलेल्या लाकडाच्या चौकटी लपवता (निदानपक्षी रंगवता) येणार नाहीत काय?

स्त्री-पुरुष नात्यातील एक अत्यंत गुंतागुंतीचा अनुभव खरे-रावते द्वयाने संयमाने, कौशल्याने सादर केलेला असला तरी एक प्रश्न मनासमोर उभा राहतो—यंदाच्या सरकारी नाट्यस्पर्धेत 'फेण्यांचे' या विषयावरील नाटक आले होते; अन्यत्रही साहित्यात स्त्री-पुरुष नात्यातील अनुभव चित्रीत होताना दिसतात. परंतु मराठी नाटककारांनी, या विषयांचा स्वभाव आत्मगताकडे जाणारा आहे, घटनांना बांधून हा विषय नीटसा व्यक्त होणार नाही याची पुरेशी दखल घेतलेली दिसत नाही—असे का होते? मराठी नाटककार पुरेसे परिपक्व नाहीत की मराठी नाटक पुरेसे लवचिक नाही? सुरेश खऱ्यांनी आपल्या नाटकांच्या कथावस्तूंचा आणि नाट्यरचनेच्या तर्काचा पुन्हा एकदा या दृष्टीने विचार करून पाहावा अशी एक नम्र सूचना!

● ● ●

## लोकशाही : खरी आणि खोटी

पृष्ठ ३ वरून

सत्ता जनतेच्या पाठिंब्यातून तर येतेच; परंतु बंदुकीशिवाय नव्हे, हे समजण्यासाठी मराठेंनी इस्रेल, रशिया, चीन, लाओस, व्हिएटनाम वगैरे अगदी अलीकडील क्रांत्यांची तोडओळख करून घ्यावी. गोवा शेवटी बंदुकीच्या नळीनेच मिळविला ना? निजामाला शस्त्रानेच लोळवला ना? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आत्मार्पण केलेले चाफेकर, आझाद, भगतसिंग, सावरकर व इतर अनेक क्रांतिकारक यांची भूमिका मूर्खपणाचीच होती का? भीष्माचा दाखला देणाऱ्या बर्व्यांना भीष्मानंतर राजकीय विचारात झालेले बदल जाणवले नाहीत असे गृहीत धरले तर दीडशे वर्षांपूर्वीच्या लोकहितवाद्याचा दाखला देणाऱ्या मराठ्यांनासुद्धा दीडशे वर्षांमध्ये भारतात झालेले राजकीय बदल माहीत नाहीत असे समजावे काय? जसे मराठ्यांना त्यांचे उत्तर नाईलाजाने लिहावे लागले तसेच हे कटुविचार मलाही मुद्दाम परखडपणे सांगावेसे वाटले. कारण या देशात कोण पुढारी होईल सांगता येत नाही. प्रतिपक्षाला शिव्या देत रहाणाराही पुढारी अन् जनतेसाठी कळकळीने कार्य करणारा सुद्धा पुढारी. मराठे, पूर्वसूत्रातील पुढारी होण्याचे ठरवत असावेत. श्री. मराठे यांच्याबद्दल व्यक्तिश: आकस नाहीच कारण मी त्यांना ओळखतसुद्धा नाही. परंतु त्यांनी जरा जनतेत मिसळावे, देशात काय घडते याचे उघड्या डोळ्यांनी निरिक्षण करावे, लोकशाहीची तत्त्वे खरोखरच राबवली जातात का? हे शहरातील चार भिंतीत बसून समजत नाही हे मराठे यांनी समजून घ्यावे. अन् मगच प्रत्यक्ष परिस्थिती व कागदी तत्त्वे यांची सांगड घालून लेखणीतून शब्द पाझरावेत.

स्वत: ज्या गोष्टीबद्दल बर्व्यांना सुनावतात त्याच गोष्टी 'बचाव प्रेरणेच्या' नैसर्गिक भावनेतून त्यांच्याच लेखणीतून उतरल्या आहेत. हे त्यांनी बर्व्यांना 'बंदुकीच्या नळी'वर कोंडीत पकडण्याचा जो फसवा प्रयत्न केला त्यावरून दिसून येते. म्हणजे 'शिवी देतोस होयरे भडव्या' अशा सारखीच मराठे यांची स्थिती झाली आहे.

भावी मंत्री अथवा पद्मश्री श्री. मराठे! भारतीय घटनेच्या पुस्तकाला जरी लोकशाही हे नाव असले तरी या देशात जे घडते त्याला अजून लोकशाही म्हणता येणार नाही. कारण गेल्या पंचवीस वर्षांत ज्या प्रकारची लोकशाही येथे नांदली, उदा. सत्ताधारी पक्षाची मुजोरी, सामान्यांची गळचेपी, भ्रष्टाचारी कारभार, आर्थिक हुकूमशाही, यालाच लोकशाही म्हणून अबीर बुक्का लाऊन कांग्रेसी मतदानाची भजने गात बसण्यात दंग झालेले मराठे यांनी खिडकीतून जरा बाहेर नजर टाकली तरी त्यांना 'लोकशाहीची' पूर्ण जाणीव होईल अशी आशा आहे.

**सुनिल देशपांडे, पुणे**

## : २ :

श्री. चंद्रशेखर मराठे यांचा श्री. अनिल बर्वे यांना उत्तर देणारा लेख वाचला. गुन्हेगारांची गुन्हे करण्याची एक ठरीव पद्धती असते. त्यानुसार ते गुन्हे करतात. त्याचप्रमाणे विचारवंताचीदेखील एक ठराविक पद्धती असते व त्याप्रमाणे ते विचार करतात. श्री. मराठे यांची एक पद्धती आहे. ते कधीही मूळ व मुख्य मुद्यावर बोलत नाहीत. तो मुद्दा सोयीस्कररीत्या बाजूला सारून, विपरीत अर्थ काढून, जे अभिप्रेत नाही त्यावर जोर देऊन आपल्या पदिक पांडित्याचे प्रदर्शन करायचे.

श्री. बर्वे यांना काय म्हणायचे आहे? 'राजकीय कारणास्तव आणि सूडबुद्धीने पदोपदी लोकशाही नि न्यायालयीन मूल्ये अत्यंत उद्दामपणे पायदळी तुडविली आहेत.' या विचारात लोकशाहीवर श्री. बर्वे यांनी दुगाण्या झाडल्या आहेत काय? परंतु श्री. मराठे यांनी मात्र जणू काय श्री. बर्वेच लोकशाहीचे मारेकरी आहेत, असे समजून त्यांच्यावर हल्ला केला आहे व लोकशाहीची श्रेष्ठता, परंपरा इत्यादीबद्दल पदिक पांडित्य दाखविण्याची खटपट केली आहे. मूळ प्रश्न लोकशाही श्रेष्ठ-कनिष्ठ हा नसून सध्या भारतात लोकशाही आहे काय, असा आहे.

भारतीय लोकशाहीमध्ये भ्रष्ट राजवट पचविण्याचे नव्हे हुसकविण्याचे सामर्थ्य निश्चितच आहे. भारतीय जनतेचीही लोकशाहीवर अव्यभिचारी निष्ठा आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की, सध्या लोकशाहीच्या नावावर जे चालू आहे, ती श्रेष्ठ परंपरा असलेली वा उज्वल भविष्यकाळ असलेली लोकशाही आहे. श्री. बर्वे यांची नेमकी हीच व्यथा आहे.

या देशात गेली २५ वर्षे जी भ्रष्ट राजवट चालू आहे, ती लोकशाही मूल्यांचे व परंपरांचे पालन करत आहे काय? या देशातील प्रत्येक नागरीकाला त्याच्यावतीने राज्य करणाऱ्या शासनाकडून आर्थिक, राजकीय वा सामाजिक दृष्टचा न्याय मिळत आहे काय? जीवनाच्या प्रत्येक नव्हे कोणत्याही एका अंगाने प्रगती करण्यासाठी देशातील प्रत्येकाला समान संधी मिळत आहे काय? अन्न, वस्त्र, निवारा, औषध यासारख्या प्राथमिक गरजा शासन भागवू शकते काय? दारिद्र्य, बेकारी, महागाई इ. अनेक प्रश्नांमध्ये कोणत्या प्रश्नावर सरकारने गेल्या पंचवीस वर्षांत लोकनिष्ठ भूमिका घेतली आहे? या मूळ प्रश्नाना सोयीस्कर बगल देऊन श्री. मराठे यांनी लोकशाहीच्या श्रेष्ठतेच्या गुणवर्णनात (जे स्वयंसिद्ध सत्य आहे. निष्कारण पाने खर्च केली आहेत. असे 'पदिक पांडित्य' गाजवून फारतर मूळ प्रश्नांला बगल देता येईल, प्रश्न अनुत्तरितच रहातो.

या देशात लोकशाही आहे का? निश्चितच नाही. श्री. मराठे लिहितात— सरकार लोकशाहीचे आपत्य आहे, पालक नव्हे.' कानाला फार गोड वाटते. पण इथे काय आहे? इथे सर्वच विपरीत. श्री. मराठ्यांसारख्यांना भारतातील परिस्थिती दिसत नाही

काय ? ते खरोखरीच अडाणी आंधळे आहेत की लुच्चे, ढोंगी आहेत ? पंडितराव मराठे जरा उघड्यावर येऊन डोळे उघडून बघा.

इंदिरा गांधींच्या 'दुष्काळ दौऱ्या-वर' हजारो रुपयांचा चुराडा करून दुष्काळ निवारण्याचा फार्स करणारे शासन लोकशाहीचे अपत्य आहे, पालक आहे की मारेकरी आहे ? गाऱ्हाणी घेऊन जाणाऱ्या निःशस्त्र, निरपराध भुकेकंगाल प्रजेवर गोळया झाडणारे पोलिस शासन लोकशाहीचे अपत्य आहे काय ? न्याय्य मागण्यासाठी अहिंसात्मक लढा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिस अत्याचाराचा वरवंटा फिरविणारे शासन लोकशाहीचे अपत्य आहे काय ? विरोधकांवर सूड उगविण्यासाठी बेकायदेशीररित्या विना चौकशी तुरुंगात डांबणारे शासन लोकशाहीचे अपत्य आहे काय ? कुप्रसिद्ध काळ्या कायद्याचे निर्लज्ज समर्थन करणारे शासन लोक-शाहीचे अपत्य आहे काय ? काळाबाजार-वाले, सट्टेबाज नफेखोर, भांडवलदार नि भ्रष्ट,नालायक नोकरशहा यांचे हितसंबंध जपणारे शासन लोकशाहीचे अपत्य आहे काय ? सामान्य जनतेच्या घरां-साठी, पाण्यासाठी पैशाचा तुटवडा सांगणारे परंतु जुळ्या मुंबईच्या उभा-रणीसाठी पाण्यासारखा पैसा खर्चणारे शासन लोकशाहीवादी आहे काय ? संस्थानिकांच्या माना लाजेने खाली जातील अशा चैनीत ऐषारामात नि बेफिकीरीने रहाणारे राज्यकर्ते, शाही शिकारीचा आनंद मनमुराद लुटण्यात मश्गुल झालेले राज्यकर्ते, सामान्य जनतेच्या दारिद्र्याकडे, बेकारीकडे वा असंख्य प्रश्नांकडे डोळेझाक करून आपल्या नातेवाईकांची देखभाल कर-णारे शासन लोकशाहीवादी आहे काय ? आदिमानवांपेक्षा हीन दर्जाचे आयुष्य जगणारे आदिवासी, जनावरांपेक्षा खालच्या दर्जाचे जिणे वाट्यास आलेले दलित, झोपडपट्टीच्या रौरव नरकात खितपत पडलेले श्रमिक कामगार शेतकरी नि रोजच्या रोज वाढणाऱ्या महागाईने मेटाकुटीस आलेले गरीब मध्यमवर्गीय. बेकारी, महागाई दारिद्य यांनी गांजलेले लोक याच्यासाठी या शासनाने काय केले ? त्या शासनाला लोकशाहीवादी म्हणायचे काय ?

प्रासादतुल्य इमारतीमधून अत्या-धुनिक जीवन ऐषारामात घालविणारे बडे भांडवलदार, व्यापारी, काळा-बाजारवाले नि त्यांचे बगलबच्चे, राज्यकर्ते नि त्यांचे भ्रष्ट नोकरशहा— ही लोकशाहीची अपत्ये आहेत काय ? केवळ एक टक्का लोकांना कळणाऱ्या भाषेतून राज्यकारभार व न्यायसंस्था चालविणारे शासन लोकशाहीवादी आहे काय ? शिक्षणासारख्या गोष्टीमध्ये विषमता (मोठमोठ्या इंग्रजी माध्यमाच्या अत्याधुनिक शाळाकॉलेजां-तून शिक्षण घेणारी बडी मुले एकीकडे नि ग्रामपंचायत, नगरपालिका यांच्या शाळांतून दरिद्री शिक्षण घेणारी मुले दुसरीकडे) चालू देणारे सरकार लोक-शाहीवादी आहे काय ? सर्वसामान्य जनतेला न्याय मिळविताना अशक्य होईल, नाकात दम निघेल अशी खर्चिक, किचकट न्यायव्यवस्था तशीच चालू

ठेवणारे शासन लोकशाहीवादी आहे काय ?

मराठेसाहेब या प्रश्नांची उत्तरे आपण द्या. 'या देशात लोकशाही आहे काय ?' या श्री. बर्वे यांच्या प्रश्नात इतक्या गोष्टी येतात. या सर्वांचे उत्तर एकच. येथे लोकशाही नाही. आम्हाला खरीखुरी लोकशाही हवी आहे. लोकशाहीचे विडंबन नको. ज्या व्यवस्थेत प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा, औषध या जीवनावश्यक गोष्टींची पूर्तता होईल, स्वातंत्र्य, समता, बंधुता राहील, अशी व्यवस्था आम्हाला हवी आहे

त्यासाठी सर्व क्षेत्रात आमूलाग्र— वैचारिक व कृतिशील परिवर्तन व्हायला पाहिजे. सर्व स्तरांवर परिवर्तन व्हायला पाहिजे. श्री अनिल बर्वे यांना असेच मूलभूत, सर्वसमावेशक असे परिवर्तन अभिप्रेत आहे.

परंतु स्थापित राजवटीबाबत प्रेमाचा उमाळा श्री. मराठे यांच्या मनात असल्यामुळे (पहा : 'माणूस' दिवाळी अंक) श्री. बर्वे यांचा मर्मभेदक सवाल त्यांना खुपला.

दुसरा प्रश्न न्यायसंस्थेबाबतचा.

श्री. अनिल बर्वे यांचा सवाल—'या देशात न्यायालयीन आदेश मोठे की सत्ताधाऱ्यांची सूडबुद्धी मोठी?' हा प्रश्न एवढा सरळ आहे परंतु श्री. मराठे यांनी त्यातील 'सूडबुद्धी' हा शब्द आपल्या सोयीसाठ 'वगळला' आहे नि नंतर 'न्यायसंस्था मोठी की लोकशाही मोठी' हा मुद्दा चघळत बसले आहेत. वास्तविक हा प्रश्नच इथे येत नाही. श्री. बर्वे यांना सत्ताधाऱ्यांनी आपल्याला सूडबुद्धीने वागविले व त्यासाठी न्यायसंस्थेला धाब्यावर बसविले, बेकायदेशीररीत्या सरकार वागले, एवढेच दाखवावयाचे आहे; परंतु 'राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास' यांचा गाढा अभ्यास असलेल्या मराठ्यांनी मूळ मुद्द्याला बगल देऊन निराळाच विषय काढला आहे. खरे म्हणजे लोकशाहीनिष्ठ माणसापुढे 'शासन की न्यायसंस्था' हा प्रश्नच येऊ शकत नाही. कारण लोकशाहीत शासन, न्यायसंस्था किंवा संसद यापेक्षा 'जनता' श्रेष्ठ आहे. मुद्दा तो नाही. मूळ मुद्दा न्यायालय, 'सत्ताधाऱ्यांच्या सूडबुद्धीपेक्षा श्रेष्ठ आहे काय,' हा आहे आणि सारासार विचार जागृत असलेल्या कोणाही माणसाला न्यायसंस्थाच श्रेष्ठ वाटेल, कारण सरकार म्हणजे लोकशाही नव्हे. त्यामुळे अशा वेळी जनतेला न्यायसंस्थेचाच आधार आहे. न्यायसंस्थेने सामाजिक न्याय, जनतेच्या आशा-आकांक्षा हे ध्यानात घेऊन प्रगतिशील राहिले पाहिजे हे एकदम मान्य. श्री. बर्वेही सहमत आहेतच. कारण शवटच्या परिच्छदात त्यांनी प्रचलित न्यायसस्थेच्या हृदयशून्य, बेजबाबदार व खर्चिक कारभारावर अचूक बोट ठेवले आहे. त्यांनी मराठे म्हणतात, त्याप्रमाणे केव्हाही, कोठेही न्यायसस्थेला मोठे मानले नाही. श्री. मराठे यांनी या ठिकाणीही फसवेगिरी केली आहे.

श्री. मराठे यांनी श्री. बर्वे यांच्या लेखाचा शेवटचा परिच्छेद पुन्हा एकदा वाचावा.

--डॉ. अनिल के. खांडेकर, मुंबई

## आंध्र-तेलंगण वाद

पृष्ठ ५ वरून

होईनासे झाले. इ. स. १९५६ पासून इ. स. १९६९ पर्यंत अधिकारावर आलेले सर्व मुख्यमंत्री हे आंध्र विभागातील होते. शिवाय मंत्रीमंडळात आणि विधानसभेत आंध्रमधील प्रतिनिधींचेच नेहमी बहुमत राहिलेले आहे. त्यामुळे उघडउघड चाललेला हा अत्याचार तेलंगण्यातील सरकारी नोकरवर्गाला आणि तेथील पुढाऱ्यांना निमूटपणे सहन करावा लागला. त्यातच आंध्रमधील अधिकाऱ्यांची तेलंगणमधील अधिकाऱ्यांच्या बद्दल असलेली तुच्छतेची वागणूक आणि वरचढपणा यामुळे दोन विभागातील व्यक्तींच्यामध्ये निरनिराळ्या स्तरांवर हेवेदावे निर्माण झाले. हा द्वेषाचा अग्नी बरीच वर्ष आतल्याआत धुमसत होता, जणू एखाद्या सुयोग्य व्यक्तीच्या फुंकरीचीच तो वाट पहात होता.

### स्वतंत्र तेलंगण चळवळ

इ. स. १९६८ मध्ये सुप्रीम कोर्टाने डॉ. चन्नारेड्डी यांची निवडणूक अवैध ठरविल्यानंतर त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा देऊन दिल्लीहून हैदराबादला परत यावे लागले. इकडे येताच त्यांनी 'स्वतंत्र तेलंगण' चळवळीची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्यासाठी त्यांनी काँग्रेसपक्षाबाहेर पडून तेलंगण प्रजा परिषद या नावाचा नवीन पक्ष स्थापन केला. १९६९ च्या जूनमध्ये या चळवळीला उग्र स्वरूप प्राप्त झाले आणि कोणत्याही चळवळीला जे हिंसक स्वरूप येते ते त्यावेळीही आले. गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मध्यस्थीमुळे त्यावेळी तात्पुरती शांतता निर्माण झाली. तेलंगणच्या ज्या तक्रारी होत्या त्याकडे विशेष लक्ष पुरविण्याचे आश्वासन केंद्र सरकारकडून मिळाले. तेलंगण रिजनल कमिटीला जास्त अधिकार देण्यात आले, त्या विभागासाठी वेगळे अंदाजपत्रक तयार करण्याची पद्धत सुरू झाली आणि काही दिवसानंतर श्री. ब्रह्मानंद रेड्डी यांची उचलबांगडी करून तेलंगण प्रांतातील श्री. पी. व्ही. नरसिंहाराव यांची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र तेलंगणची मागणी तात्पुरती तरी मागे पडली.

### सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

मधल्या काळात तेलंगण प्रांतातील अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी अग्रक्रमयादीतील अनेक गडबड घोटाळ्यांमुळे तो प्रश्न उच्च न्यायालयाकडे आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाकडे नेला. त्याचा निकाल जुलै १९७२ मध्ये लागून त्यांनी मुल्की नियम वैध असल्याचे शिक्का मोर्तब केले व त्या नियमांना डावलून दिलेल्या नोकऱ्या आणि बढत्या अवैध असल्याचा निर्णय दिला. मुख्यमंत्र्यांनीही त्याचवेळी मुल्की नियमांची काटेकोर अंमलबजावणी होईल असे आश्वासन दिले. पण त्यामुळे मंत्रिमंडळात वैमनस्य निर्माण होऊन मुख्यमंत्रीपदच डळमळीत होण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला.

कारण मुख्यमंत्री जरी तेलंगणमधील असले तरी सर्वत्र बहुमत आंध्रप्रतिनिधींचेच होते. बरेच दिवस हा प्रश्न आपापसात सोडविण्याचा आणि त्यातून सर्वमान्य तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. श्री. यशवंतराव चव्हाणांना पुन्हा हैदराबाद येथे मध्यस्थी करण्यासाठी पाठविण्यात आले पण त्याचा विशेष उपयोग झाला नाही. आंध्रप्रदेशातील पुढाऱ्यांमध्ये कोणत्याच मुद्द्यावर एकवाक्यता होण्याची चिन्हे दिसेनात. शेवटी ह्या प्रश्नावर श्रीमती इंदिरा गांधींना लवाद नेमावे व त्या जो निर्णय देतील तो सर्वांनी स्वीकारावा असे ठरले.

### पाच कलमी योजना

श्रीमती इंदिरा गांधींनी या प्रश्नावर तोडगा म्हणून एक पाच कलमी योजना नोव्हेंबर १९७२ मध्ये जाहीर केली व डिसेंबर १९७२ मध्ये ती संसदेकडून मान्यही करून घेतली. या योजनेनंतर तहसीलदार, ज्युनिअर इंजिनिअर्स आणि असिस्टंड मेडिकल ऑफिसर्स यांच्या पातळीपर्यंतच्या जागांना हैदराबाद शहरात इ. स. १९७८ पर्यंत आणि तेलंगण विभागात इ. स. १९८० पर्यंत स्थानिक लोकांना संरक्षण रहाणार आहे. त्यानंतर मात्र हा भेदभाव अस्तित्वात मुळीत रहाणार नाही. श्रीमती गांधींनी संसदेला असेही आश्वासन दिले, की त्यांचे सरकार यानंतर पुढे केव्हाही संसदेपुढे तेलंगण विभागासाठी विशेष सवलती मागण्यासाठी येणार नाही. दिल्लीतून बाहेर पडताना आणि त्यानंतर हैदराबादला आल्यानंतर ही योजना आपणास मान्य असल्याचे सर्व काँग्रेसपुढाऱ्यांनी मान्य केले व तसा ठरावही हैदराबादच्या एका बैठकीत सर्वानुमते संमत करण्यात आला. अशा रीतीने हे चहाच्या पेल्यातील वादळ आता शांत होईल व सर्व व्यवहार पुन्हा सुरळीत सुरू होतील अशी आशा सर्वांना वाटत होती. कारण या तीन चार महिन्यात सचिवालयामधील सर्व व्यवहार जवळजवळ बंदच होते. एकतर मंत्र्यांना या प्रश्नापुढे इतर फायली पहाण्यास वेळच नव्हता आणि दुसरे, कर्मचाऱ्यांचा हरताळ, संप, मोर्चे, इत्यादींमुळे अनेक योजना धूळ खात पडल्या होत्या. महाराष्ट्रातल्याप्रमाणेच आंध्रप्रदेशाचा मोठा भाग आज दुष्काळाच्या खाईत आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भीतीदायक आहे. खुद्द हैदराबाद शहरात पूर्वी कधीही नव्हती अशी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे पण त्याकडे लक्ष देण्याला कुणाला फुरसतच नाही. सर्व पुढाऱ्यांना या एकाच प्रश्नाने ग्रासले आहे.

### स्वतंत्र आंध्र चळवळ

पण दुर्दैवाने या ठरावावरची शाई वाळण्यापूर्वीच या नेत्यांना साक्षात्कार झाला की इंदिराबाईंची पाच कलमी योजना जनतेला विशेषत: आंध्रमधील जनतेला मान्य होणार नाही. त्याचवेळी आंध्रमधील सर्व अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी अनिश्चितकाळपर्यंत संपावर जाण्याचे ठरविले. त्यात वीज मंडळाचे कर्मचारी, असिस्टंट मेडीकल ऑफिसर्स

हेही सामील झाले; इतकेच काय पण राजपत्रीत अधिकाऱ्यांनीसुद्धा ह्या संपाला सहानुभूती दाखविण्यास सुरुवात केली व तेही मिरवणुका-मोर्चातून भाग घेऊ लागले. कर्नुल जिल्ह्यातील राजपत्रीत अधिकाऱ्यांच्या संघटनेने तर संपावर जाण्याची नोटीससुद्धा दिली होती पण नंतर तो विचार त्यांनी पुढे ढकलला तिरुपती येथे आंध्रमधील सर्व निर्वाचित प्रतिनिधी आणि जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या अध्यक्षाची एक बैठक घेण्यात आली व यापुढे स्वतंत्र आंध्रशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही व त्यासाठी सर्व शक्तीनिशी लढा देण्याचे निश्चित झाले. त्याचाच एक भाग म्हणून आंध्रच्या नऊ मंत्र्यांनी आपले राजीनामे काँग्रेस अध्यक्षांच्याकडे सादर केले. त्यानंतर श्री. बी. व्ही. सुब्बारेड्डी यांनी या चळवळीची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतला आणि आपल्या ज्वलंत भाषणातून चळवळ जास्तीत जास्त चिथावून देण्याचा सपाटा सुरू झाला. केंद्र सरकारने स्वतंत्र आंध्रची मागणी मान्य न केल्यास स्वतःस जाळून घेण्याची घोषणाही त्यांनी केली. नेहमीप्रमाणेच रेल्वे वहातुकीवर या चळवळीचा प्रथम परिणाम झाला. सर्व प्रमुख शहरातून वेळोवेळी बंद पाळण्यात आले. त्यातूनच गोळीबार, कर्फ्यु यांचे सत्र सुरू झाले. स्थानिक पोलीस व्यवस्थेसाठी कमी पडल्याने बाहेरून रिझर्व पोलीस फोर्स मागविण्यात आला. काही ठिकाणी त्यांच्या अतिरेकी वागणुकीमुळे प्रकरण जास्तच चिघळले. आज आंध्र विभागात शासन यंत्रणा अशी राहिलेलीच नाही. सर्व सरकारी कचेऱ्या गेल्या ३–४ महिन्यापासून बंद आहेत. बँका आणि पोस्टांना आठवड्यातून एक-दोन दिवसच चळवळीच्या सूत्रधारांच्या मर्जीनुसार काम करू दिले जाते. पोस्टातून कार्ड पाकिटेसुद्धा मिळत नाहीत कारण त्याचा स्टॉक प्रांतीय सरकारच्या ट्रेझरीत असतो आणि त्या कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बंद आहेत. गेल्या सहा महिन्यात लोकांनी टॅक्सेसच काय पण इलेक्ट्रीसिटीची बीलं सुद्धा भरलेली नाहीत. रेल्वे आणि सरकारी बस सर्विस तर जवळ जवळ बंद असल्या सारख्याच आहेत. याचा परिणाम बाजारातील आवश्यक वस्तूंचे भाव वाढण्यातही होत आहे. त्यामुळे सामान्य जनता आता त्रासून गेलेली आहे. तरीपण ही चळवळ थांबवावी असे उघडपणे कुणीही म्हणू शकत नाही. यापुढे बंदचा कार्यक्रम स्थगित करावा असा आदेश काही पुढाऱ्यांनी दिला आहे पण खरं म्हणजे आता ही चळवळ पुढाऱ्यांच्यासुद्धा हातातून गेलेली आहे. तिचे सूत्रधार दुसरेच कोणीतरी–ज्यांना पडद्यामागे राहूनच दोऱ्या हलविणे सोयीचे वाटते अशा लोकांच्या हातात गेली आहे. आज चार महिने सरकारी कर्मचाऱ्यांना पगार नाही. तरीपण त्यांचा निर्वाह चालू आहे. जनतेकडून मिळणाऱ्या थोड्याफार देणग्यातून इतक्या लोकांचा उदरनिर्वाह होणे शक्य नाही. तेव्हा यापाठीमागे बोलविता धनी कुणी वेगळाच असावा अशी दाट शंका

एखाद्यास येणे स्वाभाविक आहे. काँग्रेसच्या चिटणीसांनी तर या चळवळीमागे काही स्वार्थी आणि प्रतिगामी लोकांचा हात असल्याचा स्पष्ट आरोप केला होता, तो त्यांच्या जवळ काही सबळ पुरावा असेल म्हणूनच. याच्या उलट श्री. शंकर गिरी (राष्ट्राध्यक्षांचे सुपुत्र) यांनी आंध्रचा दौरा करून आल्यानंतर ही चळवळ जनतेची उत्स्फूर्त चळवळ असल्याची ग्वाही दिली आहे. श्री. अटलबिहारी बाजपायी यांचेही हेच मत आहे. त्यांनी तर इंदिराबाईंच्यावर स्पष्ट आरोप केला आहे, की त्या केवळ वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी जनमताला धुडकावून लावत आहेत. कम्युनिस्ट पक्ष सोडला तर आज सर्व राजकीय पक्ष विभाजनाच्याच बाजूने आहेत. काँग्रेसमध्ये जे काही थोडे आंध्र नेते विभाजन होऊ नये अशा मताचे आहेत त्यांना आंध्रमधील आपल्या घरी जाणेसुद्धा अवघड झाले आहे. त्यांचा मुक्काम हैदराबादेतच आहे आणि स्वतःच्या घरादाराच्या सुरक्षिततेची खात्री नाही. तेलंगणच्या जनतेने जरी सध्या आपले आंदोलन तीव्र केलेले नसले तरी त्यांचीही विभाजनाचीच मागणी आहे. आपल्याच राजधानीत दुय्यम नागरिक म्हणून राहणे आंध्र वाल्यांना सहन होण्यासारखे नाही तर परमुलखातून हैदराबादला आलेल्या लोकांचे वर्चस्व तेलंगणवाल्यांना मान्य नाही. दोघांच्यामध्ये आता इतके वैमनस्य निर्माण झाले आहे की यापुढे सुखासमाधानाने एकत्र राहणे केवळ अशक्य आहे. मध्यवर्ती सरकार कदाचित तात्पुरता उपाय शोधून काढण्यात यशस्वी होईलही पण तो शेवटचा उपाय ठरणार नाही. पुन्हा ही चळवळ उफाळून वर येईलच. आंध्रचे विभाजन हाच यावर आजतरी अंतीम तोडगा दिसतो आहे. आज जरी केन्द्र सरकारने यासाठी चालढकल केली तरी पुढील निवडणुकीकडे लक्ष ठेवून याबाबतीत निर्णय केन्द्र सरकारला घ्यावा लागणार आहे. नसता आंध्रप्रदेश काँग्रेसच्या हातातून जाणार हे निश्चित.

हा प्रश्न इथेच संपणार आहे असेही नाही. आंध्रप्रदेशाच्या विभाजनाला तत्त्वतः मान्यता दिल्यानंतरही तिच्या राजधानीचा, मुख्यमंत्रीपदाचा, संपत्तीच्या विभाजनाचा असे अनेक वाद पुढे उद्भवणार आहेत. आजतरी विभाजनाच्या मागणीसाठी सर्वांची एकी असली तरी एकदा विभाजन झाल्यानंतर त्यांच्यात सुंदोपसुंदी सुरू होण्यास वेळ लागणार नाही. रायलसीमा (कर्नुल, कडप्पा आणि चितूर जिल्हे) भागातील लोकांना पूर्वीचीच कर्नूल ही राजधानी पाहिजे आहे तर ज्यांचा ह्या चळवळीत सिंहाचा वाटा आहे त्यांना ती विजयवाडा – गुंटूर भागात पाहिजे आहे. त्यासाठी पुन्हा दुसरे एखादे आंदोलन झाले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मुख्यमंत्री पदासाठी जरी सध्या श्री. बी. व्ही. सुब्बारेड्डी यांचे नाव घेतले जात असले तरी इतर महत्त्वाकांक्षी लोक गप्प बसतील असे वाटत नाही. आजच काही लोकांनी श्री.

सुब्बारेडींवर अविश्वास दाखविण्यास सुरुवात केली आहे, ते काळाची पाऊले ओळखूनच.

श्रीमती इंदिरागांधींच्या कारकिर्दीतील त्यांच्यापुढील सर्वात जटिल प्रश्न असे आंध्र-तेलंगण वादाला स्वरूप आले आहे. ज्या व्यक्तीने बांगला देशचा आंतरराष्ट्रीय प्रश्न यशस्वीपणे हाताळला तिला हा घरगुती प्रश्न इतका दुष्कर व्हावा यामागे अनेक कारणे आहेत. आंध्रप्रदेशाचे विभाजन होताच इतर अनेक प्रांतातून अशाच मागण्या वाढण्यास उशीर लागणार नाही. महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजराथ, म्हैसूर इ. प्रांतातून आज प्रच्छन्नपणे किंवा उघड विभाजनाच्या मागण्या चालू आहेतच त्यांना निश्चितच तीव्रता येईल. कदाचित पुन्हा एक राज्य पुनर्रचना मंडळ नेमावे लागेल. आज काही विरोधी पक्षांनी तशी मागणी केलीच आहे. यामुळे भाषावार प्रांत रचनेच्या तत्त्वालाच मुळापासून धक्का बसल्यासारखे होणार आहे. श्रीमती गांधींना पटो वा न पटो पण तेलगणमधे मुस्लीम वर्चस्वही त्यामुळे वाढण्याची दाट शक्यता आहे. त्यातून नवीन काय प्रश्न उद्‌भवतील याबद्दल आत्ताच काही बोलणे धाष्टर्याचे होईल.

वेगळ्या दृष्टिकोनातून ह्या प्रश्नाकडे पाहिल्यास सध्याची आंध्र विभागातील चळवळ ही हैद्राबाद शहरातील सरकारी कचेऱ्यातून निर्माण होणाऱ्या कारकुनांच्या अगदी थोड्या जागांवर करावयाच्या नेमणूकीबद्दल आहे. कारण मुल्की नियम अस्तित्वात असल्याने आंध्रप्रदेशातील इतर भागावर त्याचा परिणाम होणार नाही व तेलंगणमधील नोकऱ्यांबद्दल आंध्रातील लोकांना आस्था नाही. पण ह्या सर्व प्रश्नाला आता भावनात्मक आणि प्रतिष्ठेचे स्वरूप आलेलं आहे. दोन विभागातील नेत्यांचा एकमेकांवर विश्वास उरला नाही आणि परस्पर सद्‌भाव शिल्लक राहिला नाही. अशा परिस्थितीत मारून मुटकून त्यांना एकत्र राहण्यास सांगणे म्हणजे अजून आपापसातील द्वेषभावना चिथावण्यासारखे आहे. चळवळीची सुरुवात कॉंग्रेस पक्षातूनच झाली आणि आज त्याच पक्षाला तेथील आपल्या अस्तित्वाची खात्री राहिलेली नाही. कॉंग्रेसपक्षाच्या बळावर निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींनी विभाजनाच्या प्रश्नावर पक्षाला राजिनामे सादर केले आहेत. इतकेच नव्हेतर हा आता दक्षिण उत्तर वाद असल्याचेही काही जबाबदार व्यक्तींनी बोलून दाखविले आहे. द्रविडमुनेत्र कळहमचा विभाजनाला असलेला आवश्यकतेपेक्षा जास्त पाठिंबा ह्या संदर्भात डोळयात भरण्यासारखा आहे. तेव्हा हे प्रकरण जास्त दिवस भिजत ठेवून गुंतागुंतीचे करण्यापेक्षा योग्य आणि त्वरित निर्णय घेण्याची अवघड जबाबदारी केंद्रसरकारवर येऊन पडली आहे. श्रीमती गांधी ह्या दिव्यातून कसा मार्ग काढतात याकडेच सर्वांचे आता लक्ष लागले आहे. ● ○

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

डॉ. सुधीर फडके

# कोठे आणि कधीतरी

राजहंस प्रकाशन

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर